४ फेब्रुवारी १९७८
सव्वा रुपया

# माणूस

४१०




शे. का. पक्ष

## निवडणूक विशेषांक

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक छत्तीस**

**४ फेब्रुवारी १९७८**

**मूल्य सव्वा रुपया**

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# मध्य-डावा पर्याय

राजकीय वातावरण अत्यंत गोंधळाचे व मतदाराला गांगरवून टाकणारे आहे. पक्ष-पद्धती कोलमडून पडली आहे. ज्यांच्याजवळ ठोस ध्येयधोरणे व कार्यक्रम आहे, अशा पक्षांजवळ संघटना नाही. ज्यांच्याजवळ संघटित ताकद आहे, त्यांना जनतेचा पाठिंबा नाही. फाटाफुटी, पक्षांतरे इतकी वाढली आहेत की, राजकीय अराजकाच्या सीमेवर आपण उभे आहोत काय, अशी रास्त भीती अनेकांना वाटू लागली आहे. पेशवाईअखेर कोण सरदार कुठला, कुणाचा, हे कळेनासे झाले होते. पेशव्यांचे सेनापती म्हणे आतून इंग्रजांनाही काही वेळा सामील असत. तशीच अवस्था आज येऊन ठेपली आहे. राजकीय स्वार्थ, सत्तास्पर्धा, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा उफाळून आलेल्या आहेत. निष्ठा या शब्दाला काही अर्थ उरलेला नाही. अशा गोंधळाचा, अस्वस्थतेचा फायदा नेहमी हुकूमशहांना मिळत असतो. कारण त्यांच्याजवळ एकेरी शिस्तवाद असतो, धडाडीने तो किंवा ती काही नेत्रदीपक कृती करू शकते. शहा-कमिशनमुळे इंदिरा गांधींची प्रतिमा कायमची डागळली जाणार, असे बहुतेक राजकीय भाष्यकार गृहीत धरून होते व अजूनही आहेत. महाराष्ट्रात तर यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वामुळे त्यांची डाळ मुळीच शिजणार नाही अशी बहुतेकांची खात्रीच होती; पण अनुभव वेगळा येत आहे. विदर्भाचा त्यांचा पहिला दौरा यशस्वी ठरला आहे व येत्या आठवड्यात त्याचा संकल्पित मुंबई–महाराष्ट्र दौरा कोणते राजकीय उत्पात घडवून आणतो याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. रेड्डी–चव्हाण कॉंग्रेस त्यांनी खिळखिळी करीत आणलीच आहे. जनता आणि मित्रपक्ष यांच्या युतीवर काय परिणाम होतात एवढेच पाहायचे आहे.

हे परिणाम कमीत कमी व्हावेत असे वाटत असेल तर मतदारांसमोर किमान कार्यक्रमाची बांधिलकी स्वीकारणारा लोकशाही-वादी राजकीय पर्याय पुढे यायला हवा. आत्यंतिक डावे आणि आत्यंतिक उजवे असे राजकीय पर्याय येथला मतदार झिडकारतो असा नेहमीचा अनुभव आहे. निदान महाराष्ट्रात तरी मध्य-डावा पर्याय मान्यता पावत असतो. जनता + मित्रपक्ष युती हा पर्याय साकार करू शकली तर केवळ महाराष्ट्राचेच नाही, भारताचे राजकीय चित्रही बदलू शकेल. लोकशाही टिकवून समतेची व समृद्धीची आपली सकल्पित यात्रा हा देश पूर्ण करू शकतो, असा विश्वास यातून वाढेल व आजचे अराजकाचे सावट दूर होईल. यासाठी जनता + मित्रपक्ष युतीतील जागांची ओढाताण, रस्सीखेच आता तरी थांबवली पाहिजे. मानापमान विसरले जायला हवेत. झाले ते होऊन गेले. संयुक्त मोर्चा यापुढे तरी विस्कटणार नाही अशी काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. कॉंग्रेस नको, एवढेच सांगून यापुढे भागणार नाही. कशासाठी नको, याचीही मतदारांना स्पष्ट कल्पना दिली गेली पाहिजे. इंदिरा गांधींच्या अत्याचारांच्या कथा सांगून निवडणूक जिंकता येण्यासारखी परिस्थिती उरलेली नाही या खऱ्या–खोट्या कथा जेवढ्या चघळल्या जातील तेवढे इंदिरा गांधींचे बळ वाढते आहे, हे आमच्या शहरी विद्वानांच्या, पत्रपंडितांच्या व द्वेषाचे राजकारण करणाऱ्या भिन्न भिन्न पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या अजूनपर्यंत ध्यानात कसे येत नाही ? कॉंग्रेस घालवून आपण काय करणार आहोत, हे रेखीवपणे प्रचारसभांतून, भाषणांतून मोर्चापक्षाकडून आता तरी सांगितले जायला हवे. कॉंग्रेस आपल्या मरणाने चाललीच आहे. खरा पुरुषार्थ मेलेल्याला मारण्यात नसतो. नवीन काय उभारणार, घडवणार ते सांगा, असे मतदाराने मोर्चापक्षालाही विचारायला सुरुवात केली पाहिजे. असा लोकमताचा दबाव आला तर आशा आहे, उद्या येणारे मोर्चा सरकार मध्य-डावा पर्याय साकार करू शकेल व समतेच्या आणि समृद्धीच्या दिशेने निघालेली ही आपली यात्रा मुक्कामाचे आणखी एक पुढचे ठिकाण गाठू शकेल.

या यात्रेसाठी उपयोगी पडेल अशी विचार-शिदोरी या अंकात आहे.

—संपादक


| मुखपृष्ठ | छायाचित्रे | मुलाखती |
|---|---|---|
| शो. का. प. चिटणीस मंडळ | गौतम पाटोळे, मुंबई | जगन फडणीस |



# भाऊसाहेब राऊत

## संस्थापकांचे विचार

भाऊसाहेब राऊत शेकापच्या संस्थापकांपैकी प्रमुख संस्थापक. शेकाप आजही त्यांचे मार्गदर्शन घेतो. पंचाहत्तरीच्या घरात पोचलेल्या या नेत्याचे विधायक कार्य आजही आदिवासींमध्ये चालू आहे. कर्जत तालुक्यामध्ये ते आदिवासींच्या विकासाची कामे करतात. पक्ष–बैठकीला भाऊसाहेब राऊत नाहीत, असे कधी होत नाही. शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्याची आवश्यकता का वाटली, हे जाणून घेणे मला महत्त्वाचे वाटले. त्यामुळे त्यांच्याशी याच अनुषंगाने बोललो. भाई आर. एस्. वंदरकरही बरोबर होतेच. किंबहुना भाई वंदरकर यांच्यामुळेच भाऊसाहेबांची भेट झाली.

'काँग्रेसमध्ये बहुसंख्य कार्यकर्ते शेतकरी–आदिवासी होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत हे लोकही भाग घेत होते; परंतु पक्षात त्या वर्गातील कार्यकर्त्यांना फारसे महत्त्व मिळत नव्हते; याची जाणीव आम्हाला होऊ लागली आहे.' अशी सुरुवात करून श्री. राऊत यांनी मुंबईचे उदाहरण दिले. मुंबईमध्ये मराठी भाषिक जनतेचे बहुमत होते; परंतु मुंबई महापालिकेमध्ये मराठी भाषिकांना स्थान नव्हते. त्या वेळी मुंबई महापालिकेची रचना बव्हंशी श्रीमंत, व्यापारी, पारशी अशा समाजातील वरच्या लोकांना स्थान देणारी होती. खरोखर जनतेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना महापालिकेत स्थान मिळाले पाहिजे, अशी मागणी भाऊसाहेब राऊत यांनी मुंबई काँग्रेसच्या नेतृत्वाकडे १९३९ साली केली. मराठी भाषिकांमध्ये कर्तृत्ववान कार्यकर्ते असतानाही त्यांना महापालिकेत स्थान नसल्यामुळे मुंबईतील कामगार व गरीब लोकांच्या वस्तीचे भाग सतत उपेक्षित राहिले. त्या भागात सुखसोयी मिळत नसत. श्री. राऊत व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी हा प्रश्न धसास लावल्यामुळे १९३९ च्या महापालिका निवडणुकीत मराठी भाषिक कार्यकर्त्यांना मुंबई काँग्रेसने तिकिटे दिली. त्यामुळेच श्री. पी. के. सावंत, डॉ. शिरोडकर, श्री. राऊत आदी सात जणांनी महापालिकेची निवडणूक लढविली होती. भाऊसाहेब राऊत यांचे सामान्य जनतेकडे, त्या जनतेतून आलेल्या कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाकडे लक्ष असे.

बहुजन समाजाला संघटनेत आणि संस्थात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, असा भाऊसाहेबांचा स्वातंत्र्यपूर्व काळात सतत आग्रह होता. १९४२ च्या लढ्यात त्यांना कारावासाची शिक्षा झाली. काँग्रेसचे नेतृत्व शेतकरी-गरीब यांचे नाव घेत असले तरी हा वर्ग उपेक्षित ठेवला जात आहे; तेव्हा सुटल्यावर या वर्गातच आपले काम केंद्रित करावयाचे, असे श्री. राऊत, कै. शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव आदींनी ठरविले होते. १९४६ मध्ये प्रांतिक सरकारे झाली. तेव्हा महाराष्ट्राचे आमदार मुंबई राज्यात सर्वांत अधिक होते. महाराष्ट्राचे ८२ आमदार असतानाही मंत्रि-

मंडळात महाराष्ट्राचे मंत्री कमीच होते. तेव्हा राऊत-जाधव यांनी मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्याकडे जाऊन संख्येच्या प्रमाणात महाराष्ट्राच्या आमदारांना मंत्रिमंडळात घेतले पाहिजे, असा आग्रह धरला होता आणि दहा जणांची नावे सुचविली होती. त्यात भाऊसाहेब राऊत यांनी स्वतःचे नाव घातले नव्हते, हे विशेष! इतरांना मंत्रिमंडळात घ्यावे यासाठी प्रयत्न करणाऱ्या भाऊसाहेबांची वृत्तीच यातून व्यक्त होते.पण भाऊसाहेब राऊत यांना त्या वेळच्या मराठी आमदारांनी मात्र दगा दिला. प्रथम हे सर्व आमदार एकमताने भाऊसाहेब याच्यामागे होते; पण बाळासाहेब खेर व शंकरराव देव यांनी आमदारांना फोडले. तेव्हा ' मराठी आमदारांना संख्येच्या प्रमाणात मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व द्यावे असा आमचा आग्रह नाही, असे मराठी आमदारांनी चक्क सांगून टाकले.

मराठी आमदारांना मंत्रिमंडळात स्थान द्यावे, एवढाच भाऊसाहेबांनी आग्रह धरला नव्हता; त्यांचा सारा भर कार्यक्रमावर होता. शेतकरी, आदिवासी यांना सवलती द्याव्यात, अशी महाराष्ट्रातील आमदारांची मागणी होती. यात भाऊसाहेब– मोरे– जाधव आदी नेतेच प्रमुख होते. या पुरोगामी विचारांच्या तरुणांचा आवाज बंद करण्याच्या हेतूने कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी काँग्रेसने एक समिती नेमली. या समितीमध्ये राऊत–जाधव–गोविंदराव देशपांडे यांचा समावेश करण्यात आला. भाऊसाहेब व तुळशीदास जाधव यांनी शेतसारा कमी करावा, शेतकऱ्यांची कर्जे माफ करावीत अशा प्रमुख शिफारशी केल्या होत्या. श्री. गोविंदराव देशपांडे यांनी भिन्न मतपत्रिका जोडली.

श्री. बाळासाहेब खेर यांनी मोरारजी देसाई यांना अहवाल देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मोरारजींना भाऊसाहेब राऊत–जाधव भेटले. 'हा प्रश्न विभागीय आहे. त्यामुळे गुजरात व कर्नाटक काँग्रेसची यासंबंधीची मतेही घेतली पाहिजेत; शिवाय शिफारशी अखिल भारतीय पातळीवरच्या असल्याने पक्षाने धोरण स्वीकारले तरच यांचा विचार करता येईल !' असे मोरारजी देसाई यांनी सांगितले. अशा अनुभवामुळे काँग्रेसमध्ये शेतकरी, श्रमजीवी, आदिवासींचे हित साधले जाणार नाही, याची खूणगाठ भाऊसाहेबांच्या मनात बसू लागली. त्यातून काँग्रेस अंतर्गत शेतकरी–कामकरी संघ जन्मास आला. १९४८ मध्ये काँग्रेसने पक्षांतर्गत संघटन बांधण्यास प्रतिबंध केला. तेव्हा शेतकरी–कामकरी संघाला बाहेर पडावे लागले आणि १९४८ पासून शे. का. पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये स्वतंत्र पक्ष म्हणून जन्मास आला. त्यात भाऊसाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. काही सहकारी पक्ष सोडून परत काँग्रेसमध्ये गेले. काही जगच सोडून गेले. ! तरीही भाऊसाहेबांची निष्ठा कायम राहिली आहे. असा तत्त्वनिष्ठ माणूस आज शेकापचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. □


**तीन राजहंस प्रकाशने**


**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू
सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू
चवदा रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट
सहा रुपये

राजहंस प्रकाशित पुणे

१०२५ सदाशिव
पुणे ४११ ०३०



# उद्धवराव पाटील

## व्यक्ती आणि विचार

परिस्थितीच माणसे घडवीत असते. अंगच्या गुणांमुळे माणसाचे जीवन घडते, असे नाही. तसे असते तर शास्त्रज्ञ होण्यासाठी आवश्यक असलेले गुण अंगात असतानाही अंगात चिलखत चढवून, हातात बंदूक घेऊन भूमिगत अवस्थेत दिवस कंठण्याचा प्रसंग खासदार उद्धराव पाटील यांच्यावर का आला असता? शालेय वक्तृत्वात अर्ध वाक्यही पूर्ण करता न आलेला हा विद्यार्थी आयुष्यभर हजारो माणसांपुढे भाषणे करून गरिबांचे जीवन बदलविण्यासाठी झुंजत कसा उभा राहिला असता? अंगच्या गुणांचा विकास होत होत हा एखादा शास्त्रज्ञ झाला असता; पण हे घडणार नव्हते! जयप्रकाश नारायण यांचे नाही का असेच झाले? जगदीशचंद्र बोस यांच्यासारखे शास्त्रज्ञ होण्यासाठी विज्ञानाकडे गेलेले जयप्रकाश क्रांतिकारक बनले व अखेरीस लोकनायकाची भूमिका त्यांच्याकडे आली! अंगच्या गुणांपेक्षा परिस्थितीच माणसे घडविते.

शेतकरी कामगार पक्षाचे खासदार उद्धवराव पाटील यांच्या बाबतीतही असाच प्रकार आहे. तो कळण्यास फार कष्ट करावे लागले. 'स्वतःविषयी काय सांगायचे? आपल्याविषयीच आपण काही सांगत बसणं चांगलं नाही.' उद्धवराव आपली माहिती देण्याचे नाकारीत होते. महत्प्रयासाने शेवटी ते तयार झाले; पण प्रत्येक घटना सांगताना उद्धवराव एवढे संकोचत होते की, मला काही काही वेळा साने गुरुजींची आठवण होई. मी प्रश्न विचारी तेवढेच उत्तर आपल्याविषयी माहिती सांगताना ते देत. दोन-चार वाक्यं झाली की पुन्हा म्हणायचे, 'गड्या, स्वतःचच काय सांगायचं!' शे. का. पक्षाच्या नेत्यांविषयी—निदान काही जणांच्या बाबतीत तरी लोकांचा उगाचच गैरसमज आहे, तो कदाचित अशा काही स्वभाववैशिष्ट्यांमुळेही निर्माण होत असावा. मुंबईत आलं की, एखाद-दुसऱ्या संपादकाला भेटणारे, संपादक पदरी बाळगणारे पुढारी आपली इमेज निर्माण करून घेतात. शे. का. पक्षाचे पुढारी संपादकांना कधी भेटतात की नाही कोणास ठाऊक! हा या पुढाऱ्यांचाही दोष असेल!

उद्धवराव पाटील वयाच्या पंचविसाव्या वर्षी उस्मानिया विद्यापीठातून १९४५ साली एल्. एल्. बी. झाले. विद्यार्थिदशेत असताना विद्यार्थी युनियनचे ते सेक्रेटरी होते. हैद्राबाद कांग्रेसच्या नेतृत्वाखाली १९४६ ते ४८ या काळात निजामाच्या सत्तेविरुद्धच्या संघर्षात ते आघाडीवर होते. निजामाविरुद्ध सशस्त्र उठाव करण्यात आला. या उठावासाठी त्यांनी तरुणांना शस्त्रे चालविण्याचे आणि गनिमी तंत्राचे शिक्षण देण्याकरिता शिबीरे चालविली. निजामाच्या अनेक पोलीस ठाण्यांवर स्वतःच्या नेतृत्वाखाली उद्धवरावांनी सशस्त्र हल्ले चढवून पोलिसांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडले होते. उद्धवरावांना गणिताची आवड. उस्मानिया विद्यापीठाचे रँग्लर काझी यांना उद्धवराव मोठे गणितज्ञ

होतील असे वाटत होते; पण राजकारणाची उद्धवरावांची आवड लक्षात येताच काझी म्हणू लागले, 'एक चांगला गणितज्ञ होण्याची क्षमता असलेला हा माणूस पुढे पुढारीच होईल.' रँग्लर काझीचे हे भाकीत खरे ठरले. तरी पण उद्धवरावांना शास्त्रज्ञ किंवा इंजिनियर व्हावे असे वाटत असल्याने ते विज्ञान शाखेकडे वळले. नदीचे पात्र वळणे घेत घेत वाहते तसे उद्धवरावांच्या जीवनाचे आहे. शास्त्रज्ञ वा इंजिनिअर होण्यासाठी निघालेले उद्धवराव बी. एस्सी. नंतर एल्. एल्. बी. झाले.

रझाकाराची गुंडगिरी वाढली होती. त्यांनी धुमाकूळ घालून जुलूम करण्यास सुरुवात केली. महिला त्याचप्रमाणे सामान्य नागरिक यांच्यावर अन्याय-अत्याचार होऊ लागले. त्याचा प्रतिकार करून संरक्षण देण्याची गरज होती. 'आम्हा तरुणांना याच विचाराने झपाटले. रझाकारांच्या हातात शस्त्र होते. त्यांच्याशी प्रतिकार करायचा तर आपल्यालाही शस्त्रेच वापरली पाहिजेत, हा विचार प्रबळ झाला' व उद्धवरावांनी शस्त्र हातात धरले. नाना पाटील यांच्या प्रतिसरकारातील बापूसाहेब लाड, आझाद हिंद सैन्यातील काही अधिकारी आदींनी लष्करी शिक्षण देणारी शिबीरे चालविली होती. सशस्त्र उठावात उद्धवराव, अण्णासाहेब गव्हाणे आदी मंडळी गुतली तेव्हा लष्करी शिक्षण देण्याचे काम अशा पद्धतीने त्यांनी सुरू केले. अण्णासाहेब गव्हाणे यांनी जगन्नाथराव भोसले यांच्याशी संपर्क साधून आझाद हिंद सैनेच्या अधिकाऱ्यांची मदत मिळविली.

सशस्त्र उठावासाठी शस्त्रांचा पुरवठा आवश्यक होता. उद्धवराव व गव्हाणे शस्त्रे मिळविण्याकरिता गोवा, बडोदा या ठिकाणी जात. गोव्यातून रझाकाराविरुद्धच्या चळवळीला फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रपुरवठा होत होता. बडोद्यामधून शस्त्रे मिळविली जात होती. महात्मा गांधी खून-खटल्यातील एक आरोपी दिगंबर बडगे याच्या डायरीमध्येही उद्धवराव पाटील आणि अण्णासाहेब गव्हाणे यांची नावे गांधी खूनकटाच्या चौकशीच्या वेळी पोलिसाना आढळून आली. उद्धवराव व गव्हाणे बडगेकडूनही शस्त्रे घेत होते. बडगेकडून फारशी शस्त्रे मिळाली नाहीत. तो शस्त्रांचा पुरवठा करीत असे; पण पाहिजे तेवढ्या प्रमाणात तो शस्त्रे देत नव्हता. बडगेकडून शस्त्रे खरेदी केली जात होती, म्हणून बडगेच्या डायरीत उद्धवराव आणि गव्हाणे यांचे नावानिशी पत्ते होते. 'बडगे चिलखते चांगली करायचा – फारच चांगली करायचा. त्याने तयार केलेली चिलखते घालून आम्ही वावरत होते!' असे उद्धवरावांनी सांगितले तेव्हा आणखीच आश्चर्य वाटले.

सशस्त्र उठावात सामील झालेले उद्धवराव विद्यार्थीदशेत वक्तृत्वस्पर्धेसाठी निवडले गेले; परंतु 'जब बच्चा पैदा होता है,' या अर्ध्या वाक्यापेक्षा उद्धवराव पुढचे काहीच बोलू शकले नाहीत. आपल्या भाषणाचा विषय कोणता होता, हेही उद्धवरावांना आज आठवत नाही; पण ते अर्धेमुर्धे वाक्य आठवत. उद्धवराव मार्क्सवादाकडे कसे वळले? तरुणाचे अभ्यासवर्ग घेतले जात. एकदा मार्क्सवाद समजावून देणारी व्यक्ती काही कारणास्तव येऊ शकली नाही. त्यामुळे मार्क्सवाद समजावून देण्याचा प्रसंग उद्धवरावावर आला. रात्री मार्क्स वाचायचा व दुसऱ्या दिवशी तो समजावून द्यायचा, असे करीत करीत त्यांनी मार्क्स वाचला व आत्मसात केला.

हैद्राबादमध्ये पोलीस-कारवाई होण्यापूर्वी एक आठवडा आधी उद्धवराव पाटील–गव्हाणे गटाकडची शस्त्रे भारत सरकारने जप्त केली. या गटाच्या सशस्त्र उठावाला रामानंदतीर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदराव श्रॉफ, भाऊसाहेब वैशंपायन आदींनी विरोध केला व या गटाचा उठाव होऊ नये, हा पवित्रा घेतला. पोलिस कारवाईनंतर हैद्राबाद राज्यातील मुसलमानांची लूट करणे, मुस्लीम स्त्रियांवर हात टाकणे हे प्रकार सुरू झाले. सामान्य नागरिकाचा रझाकाराच्या अत्याचारात संबंध नव्हता. त्यामुळे मुस्लिम नागरिकांना संरक्षण देण्याचा दृष्टिकोन उद्धवराव-गव्हाणे गटाने स्वीकारून मुस्लिम लोकांना सरक्षण दिले. स्वातंत्र्याचा लढा संपल्यावर मुस्लिमांना संरक्षण देण्याची मोहीम सुरू करण्यातही उद्धवरावांनी पुढाकार घेतला.

१९५२ मध्ये उद्धवराव विधानसभेवर निवडून आले. १९५७ मध्ये मुंबई राज्यात ते आमदार झाले. १९६२ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. त्यानंतर ते राज्यसभेचे काही काळ सदस्य होते. १९६७ मध्ये पुन्हा विधानसभेवर निवडून आले. १९७२ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला आणि १९७७ च्या निवडणुकीत उद्धवराव लोकसभेवर गेले.

आणीबाणीच्या काळात सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामध्ये शेतमजुरांच्या आंदोलनाबद्दल उद्धवरावांना दोन महिन्यांची शिक्षा झाली होती.

उद्धवराव पाटील यांचा राजकीय प्रवास हा असा झाला आहे. त्यांच्या जीवनाविषयीची ही माहिती प्रथमच प्रसिद्ध होत आहे. 'उठावाच्या आमच्या प्रयत्नाबाबतत कोठेही एक ओळीचाही उल्लेख आढळणार नाही!' असे त्यांनी शेवटी शेवटी सांगितले. सरकारच्या दप्तरातही उद्धवराव पाटील यांचा एक 'समाजसेवक' एवढाच उल्लेख आहे.'□

# काँग्रेसचा पाडाव करणे हा अग्रक्रम

'कार्यक्रमाची अमलबजावणी करण्यास भाग पाडण्यासाठी संख्याबळाची आवश्यकता असते. विशिष्ट संख्याबळ असले तर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरता आग्रह धरता येतो व हा आग्रह परिणामकारक होतो. म्हणून माझ्या पक्षाने योग्य जागा मागितल्या. आपल्या पक्षाचे बहुमत व्हावे म्हणून काही आम्ही जागा मागितल्या नाहीत', असे मुलाखतीच्या सुरवातीलाच उध्दवरावांनी स्पष्ट केले.

शे. का. प. वर विशेषांक काढण्याचे 'माणूस'ने ठरविले आणि पक्षाच्या नेत्यांच्या मुलाखती घेण्याची कामगिरी माझ्यावर सोपविली. आमदार-निवासमध्ये बारशे दहा नंबरच्या खोलीचे दार खास बैठक

नसली तर सताड उघडेच असते. 'आव जाव, घर तुम्हारा' अशीच अवस्था असते. रात्रीचे नऊ वाजले होते. दिवसभराच्या चर्चेमुळे उद्धवराव काहीसे थकलेले वाटले. सकाळीच प्रवास करून आलेले, त्यामुळेही थकवा आलेला असेल. कॉटवर पडलेले उद्धवराव मी दिसताच उठू लागले. 'उठता कशाला? आपण असेच बोलू,' मी त्यांना सांगत होतो; पण उद्धवराव उठून बसलेच. बारक्याशा टीपॉयवर पानांची चळत, सुपारी नाजुक अडकित्ता, चुन्याची डबी पडलेली. काताशिवाय विडा रंगत नाही, त्याचप्रमाणे उद्धवरावांची बैठक पानाशिवाय रंगत नाही. पानं तरी किती खपतात? पान तोंडात ठेवूनच ते बोलत असतात. लाल रंगाचा स्प्रेसुद्धा काही वेळा कपड्यावर असतो; पण बोलणं ठोस. आग्रही-मूलभूत विचारच उद्धवराव मांडतात. त्यामुळे विचाराची गल्लत नाही किंवा समोरच्या माणसाला समजलं नाही, असं कधी व्हायचं नाही.

लोकसभा निवडणुकीत जनता व शे. का. प. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांनी समझोता केला होता. जागांची त्या वेळी काही खळखळ झालीच नाही. जनता पक्षाशी मैत्री कायम ठेवण्याचा शे. का. प ने निर्णय घेतला. विधानसभेच्या निवडणुकीचे नगारे वाजू लागले. जनतालाट, हवा यामुळे कॉंग्रेसचा आत्मविश्वास कमी झाला आणि तो पक्षही मित्राच्या शोधाला लागला. कॉंग्रेस पक्ष मित्र मिळवू लागला, त्याचप्रमाणे जनता पक्षाच्या मित्राना फोडण्याचा पवित्राही कॉंग्रेसने घेतला. काही वार्ताहरांच्या कानात कॉंग्रेस पुढाऱ्यांनी शे. का. प. व कॉंग्रेस यांच्या समझौत्याची कुजबूज केली. या कुजबुजीने दैनिकाचे पहिले पान पटकावले. त्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. ऑक्टोबर महिन्यातील ही घटना मनात होती. म्हणूनच मी उद्धवरावांशी कॉंग्रेससंबंधीच्या धोरणापासून चर्चा सुरू केली.

'कॉंग्रेसची धोरणे आमच्या पक्षाच्या स्थापनेपासून जनतेच्या विरोधी राहिली आहेत. जनताविरोधी कॉंग्रेसच्या धोरणामुळेच आमच्या पक्षाचा जन्म झाला. ग्रामीण अर्थव्यवस्थाच कॉंग्रेसच्या राजवटीमुळे उद्ध्वस्त झाली आहे. गरीब, शेतमजूर, कष्ट करणारा समाज या साऱ्यांना त्यांच्या कष्टाचा मोबदला मिळत नाही. त्यामुळेच दारिद्र्यरेषेखालील माणसांची संख्या वाढली. बहुजनसमाजाच्या नावावर यशवंतराव चव्हाण सत्तेवर आले किंवा असेही म्हणता येईल की, मते मिळविण्याकरिता कॉंग्रेस नेतृत्वाने खेड्यातील बहुजनसमाजाला आपल्या सत्तेच्या वेठीला बांधले. बहुजनसमाजाला वेठीला धरले, पण यशवंतराव चव्हाण व त्यांच्या सरकारमुळे सर्व जमातीमध्ये दारिद्र्य व बेकारी वाढली. म्हणूनच कॉंग्रेसचा पाडाव करणे याला आम्ही अग्रक्रम देतो.'

'अर्थात आम्ही किंवा राज्यातील कोणताही पक्ष एकटा कॉंग्रेसचा पराभव करू शकणार नाही. जनता-शे. का. प. व त्यांचे मित्रपक्ष एकत्र असतील तर कॉंग्रेसचा शभर टक्के पाडाव करता यईल. मित्रपक्ष एकत्र आले तर कॉंग्रेसचा पराभव होईल, हे जनमानसात बिंबले आहे.'

उद्धवराव पाटील याच्या विधानाने शे. का. प. व कॉंग्रेस यांचे संबंध चांगलेच स्पष्ट होतात. कॉंग्रेसचा पाडाव याला उद्धवराव व त्यांचा पक्ष प्राधान्य देतो; परंतु पाडाव कशाच्या आधारावर शक्य आहे, हे सांगताना उद्धवराव म्हणतात, 'आणीबाणीतील अन्यायांच्या कथा किंवा शहा आयोगाची कथानके एवढ्याच भांडवलावर कॉंग्रेसचा महाराष्ट्रात पराभव करता येणार नाही. त्याचप्रमाणे केवळ कॉंग्रेसविरोधी पक्षांची एकजूट करून पराभव करणे सोपे नाही. महाराष्ट्रात ज्वलंत प्रश्न आहेत. त्या प्रश्नावर विरोधी पक्षानी—मित्र पक्षांनी—एकजुटीने जनतेला आश्वासने देण्याची गरज आहे.'

मध्येच यवतमाळचा ट्रंककॉल आला. त्यामुळे आमचे बोलणे थांबले. गणपतराव देशमुख यवतमाळमधील कार्यकर्त्याला त्याच्या जिल्ह्यातील जागांची कल्पना देऊन तयारीला लागा, असे सांगत होते. त्यानी फोन ठेवला आणि यवतमाळ जिल्हा कॉंग्रेस इंदिरा कॉंग्रेसकडे गेल्याची बातमी गणपतरावांनी आम्हाला सांगितली. विषयाचा धागा जुळवत उद्धवराव सांगू लागले, 'एकजुटीने जनतेला आश्वासने देण्याची गरज आहे. उदाहरण देऊनच बोलायचे झाले तर सरकारच्या शैक्षणिक धोरणाचे देता येईल. सरकारी व निमसरकारी संस्थांमध्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुबळ्या घटकांना पंचाहत्तर टक्के नोकऱ्या राखून ठेवल्या पाहिजेत. शिक्षणाचा नवा आकृतिबंध स्वीकारला आहे; पण त्यामुळे शिक्षणाचा विस्तारच थंडावलाय! विशेषत: मुलींच्या शिक्षणावर परिणाम झाला आहे. हे धोरण बदलले पाहिजे!'

## खास विषय

ही उदाहरणे देत असतानाच आमची गाडी मजुरांच्या प्रश्नावर आली. उद्धवरावांचा हा खास विषय. त्यात ते स्वतःला विसरून जातात. तोंडात टाकण्यासाठी घेतलेले पान हातातच ठेवून ते बोलत राहिले. एरवी ते तोंडात पान ठेवूनच बोलतात. त्यामुळे काही वेळा नेमका शब्द कळत नाही; पण मजुरांचा प्रश्न काढला तेव्हा हातात पान धरूनच ते बोलू लागले. 'मजुरांची मजुरी वाढवायची झाली तरी मूळ शेतीतील उत्पन्न वाढले पाहिजे. त्यावरच मजुरांची वेतनवाढ अवलंबून आहे. श्रमाचा मोबदला काही प्रमाणात धान्याच्या रूपाने दिला तरच मजुरी वाढेल. लहान शेतकऱ्यांना मानाने जगण्यासाठी शेतीच्या आधुनिक ज्ञानाचा प्रसार व्हायला हवा. त्याचप्रमाणे पाणी, इतर साहित्य व बाजारात त्याच्या मालाला रास्त मोबदला मिळाला पाहिजे. शेतीमध्येच शेतकऱ्याला शाश्वती मिळवून दिली तरच शेतकऱ्याची मुले शेतीवर स्थिर होऊ शकतील आणि नोकरी मागणाऱ्यांची संख्या काही प्रमाणात तरी कमी होईल. ही जी आतापर्यंत स्थूलमानाने सूत्री सांगितली ती भूमिका घेऊ. एकजुटीने निवडणुका लढलो तर कॉंग्रेसचा पराभव आपण करू शकतो, असे मला वाटते.

'स्वतःच्या सामर्थ्यावर कॉंग्रेसचा पराभव करणे जनता पक्षालासुद्धा अवघड आहे. जनतेला द्यावयाची आश्वासने व मित्राची एकजूट या जोरावर कॉंग्रेसचा पराभव करता यण शक्य आहे, ही आमची ठाम भूमिका आहे,' असे सांगून उद्धवराव म्हणतात, 'महाराष्ट्रात १९७२ पासून दुष्काळी वातावरण मोठ्या प्रमाणावर आहे. या काळात शेतमजूर व लहान शेतकरी यांना रोजगार मिळवून देण्याचे सघटित प्रयत्न आमच्या पक्षाने केले आहेत. मोर्चे काढले, घेराव

पृष्ठ ३५ वर

# प्रा. एन्. डी. पाटील



## ७० टक्के जनतेची क्रयशक्ती वाढली पाहिजे....

शेतमालाला वाजवी भाव मिळाले पाहिजेत ही शेतकरी कामगार पक्षाची आग्रही मागणी. उत्पादन-खर्चाची सांगड घालून शेतमालाला किमती ठरवून दिल्या तर ग्राहकांना अधिक किमत मोजावी लागेल असा आक्षेप घेतला जातो; परंतु ही तक्रार किंवा आक्षेपही गैरसमजावर आधारित आहे. हा विचारच बरोबर नाही असे शेकाप म्हणतो. कोणी काही म्हटले म्हणून गैरसमज दूर होत नाहीत. त्यामागे असलेली भूमिकाच समजावून घ्यावी लागते. ते करण्यासाठी पक्षाचे सरचिटणीस प्रा. एन्. डी. पाटील यांची मुलाखत घेण्याचे ठरविले. एन्. डी. हा माणूसच वक्तशीर, परखड विचार मांडणारा! सकाळी दहा वाजता भेटायचे ठरलेले. मलाच अर्धा तास उशीर लागला. माझी वाट पाहातच ते थांबले होते. निवडणुकीची कामे असंख्य, तशीच तातडीचीही. त्यांना माझी वाट पाहत बसावे लागले याची रुखरुख वाटली; पण मुंबईचे जीवनच लोकलवर अवलंबून. त्यामुळे वेळेचा घोटाळा झाला.

एन्. डी. पाटील आद्याक्षरानेच ओळखले जातात. साताऱ्याच्या

शिवाजी कॉलेजचे ते प्राध्यापक. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या सोशल सायन्सेस फॅकल्टीचे एन्. डी. डीन झाले. विद्यापीठाच्या सेनेट, कौन्सिलवरही ते होते; परंतु राजकारणाला जीवन वाहून टाकलेल्या या प्राध्यापकमहाशयाना विद्यापीठाच्या बैठकांना सतत हजर राहणे अशक्य झाले. तेव्हा त्यांनी जागा अडविण्याऐवजी या पदांचे राजीनामे देऊन टाकले.

कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून एम्. ए. पर्यंतचे शिक्षण सरकारच्या शिष्यवृत्तीवर पूर्ण केले. 'माझा अभ्यास फार चांगला होता,' असे एन्. डी. यांनी अभिमानाने सांगितले. बहुजन समाजातील मुलांना त्या काळी कसे शिक्षण घ्यावे लागले याचे एन्. डी. किंवा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक ही उदाहरणे आहेत. रोज दहा मैल चालून– पाच मैल जाणे, पाच मैल येणे– एन्. डी. पाटील यांनी आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. 'रोज दहा मैल चालल्यानंतर अभ्यासासाठी उत्साह राहात होता का?' असे विचारले तेव्हा त्यांनी 'माझा अभ्यास फार चागला होता,' एवढेच पुन्हा सांगितले.

शे. का. पक्षाच्या नेत्यांमध्ये पानाचे किंवा तंबाखू–तपकिरीचे व्यसन दिसते. एन्. डींना मात्र पानाचे तर सोडाच, सिगारेटचेसुद्धा व्यसन नाही. 'मी आजपर्यंतच्या आयुष्यात एकही सिगारेट ओढली नाही,' असे एन्. डी. ना जेव्हा व्यसनाविषयी विचारले तेव्हा त्यांनी सांगितले. एन्. डीं. चे व्यसन म्हणजे राजकारण! इतर पक्षातील लोकही त्यांच्याविषयी आदराने बोलतील. स्वच्छ माणूस, तत्वाचे राजकारण खेळणारा. तत्त्वाला व्यवहाराची जोड देण्याचे प्रसंग आले तरी मूळ तत्त्व बाजूला पडणार नाही याची खबरदारी ते किती घेतात, याचा पत्रकारानाही अनेकदा अनुभव आला आहे.

एन्. डी. पाटील दोन ऋणे मानतात. 'राष्ट्र सेवा दलामुळे राष्ट्रीय चळवळीत आपण ओढले गेलो व आपल्या घडणीत कर्मवीर भाऊराव पाटील याचा वाटा मोठा आहे. त्यांचे ऋण मी फेडू शकणार नाही', ही एन्. डी. ची आजही भावना आहे.

## दलालीचा अडसर

शेतीव्यवसायात या देशातील सत्तर टक्के जनता आहे. शेती-व्यवसाय हाच देशाचा मूलभूत उद्योग आहे. ज्या व्यवसायामध्ये सत्तर टक्के जनता गुंतलेली आहे त्या जनतेचे जीवनमान सुधारल्या-शिवाय देशाची प्रगती होणार नाही. '७० टक्के जनतेचे जीवनमान सुधारणे ही औद्योगीकरणाची आम्ही पूर्वअट मानतो', असे सांगून एन्. डी. आपल्या मुद्द्याचे अधिक स्पष्टीकरण करतात. ते म्हणतात, 'औद्योगीकरणाच्या वाढीसाठी पक्क्या मालाच्या विक्रीची बाजार-पेठ या देशातच तयार झाली पाहिजे. ७० टक्के जनतेचे जीवनमान उचावल्याशिवाय ही बाजारपेठ निर्माण होऊ शकत नाही. जनतेची क्रयशक्ती वाढल्यानेच बाजारपेठ तयार होत असते. ७० टक्के जनता शेतीत आहे त्यामुळे शेतीत राबणाऱ्या माणसाला त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला तरच जनतेची क्रयशक्ती वाढणार आहे. क्रयशक्ती वाढवयाची असेल तर शेतमालाच्या किंमतीचा प्रश्न महत्त्वाचा आहे'.

शेतमालाच्या किंमतीबाबतीत आग्रही भूमिका घेत असतानाच एन्. डी. पाटील यांना ग्राहकाचा विसर पडलेला नव्हता. 'शेतमालाला उत्पादकाच्या कामाच्या व खर्चाच्या हिशोबात किमती पाहिजेत; पण शेतमालाचा जो अंतिम ग्राहक आहे त्यालाही किफायतशीर किंमतीत माल घेणे परवडले पाहिजे; परंतु आज काय परिस्थिती आहे? शेतकऱ्याला त्याच्या मालासाठी मिळणारी किंमत व ग्राहकाला बाजारात मोजावी लागत असलेली किंमत, या दोहोत गेली अनेक वर्षे फार मोठी दरी आहे. ही दरी आम्हाला निपटून काढावयाची आहे. व्यापारी–दलाल यांच्यामुळे ही दरी निर्माण झाली असून या प्रकरणी सरकारने केवळ बघ्याची भूमिका घेतली आहे. कॉंग्रेस सरकारने इतकी वर्षे दलालांना मोकाट चरण्याची सूट ठेवली. सुगीमध्ये दलाल शेतकऱ्याचा माल पडत्या भावाने खरेदी करतो व बाजारात चढत्या भावाने विकतो. यामध्ये उत्पादक व ग्राहक यांनाच फटका बसतो. उदाहरण द्यावयाचे झाल्यास गव्हाचे देता येईल. गव्हाच्या खरेदीचे भाव सरकारने ११० रुपये क्विंटल बांधून दिले; पण बाजारात १९० ते २०० रुपयांनी गहू विकला जातो. ग्राहकाकडून जास्त पैसा घेतला तरी तो उत्पादकाला मिळत नाही. मधले दलाल नष्ट केले की उत्पादकाला वाजवी किंमती देऊनही ग्राहकाला वाजवी भावातच माल मिळणार आहे. दलाली नसती तर शेतकऱ्याला ११० रुपये हा भाव देऊनही ग्राहकाला १९० ते २०० रुपयांपेक्षा किती तरी कमी भावाने गहू मिळाला असता. शेतमालाला वाजवी किंमत याचा अर्थ ग्राहकावर बोजा असा होत नाही; परंतु त्यासाठी दलाल नष्ट केला पाहिजे' असे एन. डी. पाटील म्हणाले.

'शेतमाल व त्याच्या किंमत हा प्रश्न एकांगी स्वरूपाचा मुळीच नाही. देशाच्या अर्थकारणाचा त्याचबरोबर ग्राहकवर्गाचा विचार करूनच माझा पक्ष किफायतशीर, वाजवी किमतीचा आग्रह धरतो' असे सांगून एन्. डी. पाटील म्हणाले की, 'शेतमालाच्या किंमती कशा ठरवाव्यात, याचाही विचार आम्ही केला आहे. शेतकरी व शेतमजूर यांच्या कुटुंबियांना मिळणारे वेतन त्याचे जीवनमान उंचावणारे असले पाहिजे. शेतमालाच्या किंमती उत्पादनाकरिता येणाऱ्या खर्चाशी संतुलित असल्या पाहिजेत. शेतमालाच्या उत्पादनाकरिता आवश्यक असलेला पक्का माल, (त्याच्या किंमती) शिवाय शेतकऱ्याचे कुटुंबच्या कुटुंब शेतीत राबत असते, त्या कुटुंबाच्या श्रमाचा मोबदला, त्याचप्रमाणे शेतमजुराच्या वेतनाचा खर्च, या सर्व गोष्टी विचारात घेऊन शेतमालाच्या किंमती ठरविल्या पाहिजेत.'

'शेतमालाच्या किंमतीची शे. का. प.ची आग्रही भूमिका आहे आणि तुम्ही जनतापक्षाशी मैत्री केली आहे. जनतापक्ष व कॉंग्रेस-पक्ष यामध्ये फार मोठा फरक नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा अवस्थेत मित्रपक्षांचे सरकार कसे असले पाहिजे?'– माझा प्रश्न. त्याला एन्. डी.नी पटकन उत्तर देऊनही टाकले. 'आतापर्यंत जी चर्चा केली त्या धोरणाच्या पार्श्वभूमीवर नव्या सरकारचा चेहरा–मोहरा असला पाहिजे. सर्व प्रश्नाबाबत शे. का. प.ची आग्रही भूमिका राहील. तत्वाचा बळी देऊन मित्रपक्षाबरोबर केवळ सत्तेत सहभागी होण्याची आमची भूमिका राहणार नाही.'

सरकारचा प्रश्न आला त्याचबरोबर मंत्रिमंडळातील कोणत्या खात्याबाबत शे. का. पक्ष उत्सुक आहे हे जाणून घेण्याकरता मी तिरकस प्रश्न विचारला. 'तुमची ही धोरणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने कोणती खाती महत्त्वाची ठरतील?'

प्रश्नाचा रोख लक्षात घेऊन एन्. डी.नीही तसेच तिरके उत्तर दिले. ' आम्ही विशिष्ट खाते महत्त्वाचे व काही खाती कमी महत्त्वाची असे मानतच नाही. प्रश्न असतो तो सबंध शासनाच्या धोरणाचा! या धोरणाच्या बाबतीतच आम्ही आग्रही राहणार आहोत. '

## ताकदीचा हिशोब

मित्रपक्ष म्हणून विधानसभेच्या जागांचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र जनतापक्षाचे अध्यक्ष एस्. एम्. जोशी यांनी शेकापला ८० जागा देऊ केल्या. त्यामुळे एसेमविरुद्ध जनतापक्षातील बरेच कार्यकर्ते नाराज झाले. या निमित्ताने कार्यकर्त्यांनी शेकापच्या ताकदीचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे एन्. डी. च्या मुलाखतीच्या वेळी त्याचाही ऊहापोह करावा असे मनात होतेच. ताकदीचा प्रश्न काढताच एन्. डी. पाटील यांनी सारा ताळेबंदच पुढे मांडला.

' निवडणुका हे खऱ्या ताकदीचे लक्षण नाही. तरीही लोक जर त्याचाच विचार करणार असतील तर त्याचाही हिशोब सागतो.' असे म्हणून एन्. डी. पाटील यांनी आकडे सांगितले. १९७२ साली इंदिरालाट देशात होती. ही लाट विचारात घेता आमच्या जय-पराजयाकडे पहा. १९७२ मध्ये आम्ही ८१ जागा लढवल्या आणि आमचे ८ उमेदवार निवडून आले. निवडून आलेल्यांची संख्या कमीच आहे; पण ती इतर विरोधी पक्षांपेक्षाही जास्त आहे, हे एक; परंतु दुसरा भाग महत्त्वाचा आहे. इंदिरालाट असताही आम्ही तीस मतदार संघात एक ते तीनहजारपेक्षा कमी मतांनी पडलो आहोत. तीन–चार मतदारसघ वगळता बाकीच्या मतदारसंघात आम्ही विजयी झालो किंवा दुसऱ्या क्रमांकावर होतो. ३–४ मतदारसंघात तेवढे आम्ही तिसरे होतो. १९५२ मध्ये ११० जागा लढवल्या आणि १४ जागा जिंकल्या. बहुतेक ठिकाणी दुसऱ्या क्रमाकावर होतो काही जागा अगदीच कमी मतानी गेल्या. १९५७ साली ६६, १९६२ व १९६७ साली ७०–७० जागा लढवल्या आणि अनुक्रमे २२, २२ व १५ जागा जिंकल्या. इतर पक्षानी एवढयाही जागा जिंकल्या नाहीत.

'हे झाले निवडणुकीचे; पण तुमची सघटनात्मक ताकद कोठे आहे? ना तुमच्या कामगारसंघटना, ना शेतमजूरसंघटना! मग तुम्ही आहात म्हणजे कोठे आहात?' या प्रश्नांवर एन् डी. पाटील यांनी सविस्तर विवेचन केले. एकेक विषय घेऊन ते बोलू लागले. कामगारचळवळ हा आमचा कच्चा दुवा राहिला आहे हे मान्य करतो; पण तो तरी का राहिला हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. कामगारक्षेत्रात आमचे काम मर्यादित आहे. एका धंद्यात एक युनियन असली पाहिजे हे तत्त्व आम्ही स्वीकारले व जेथे पहिली कामगार संघटना आहे ती फोडून आपली संघटना आम्ही उभारली नाही. शिवाय आमच्या पक्षाचे काम सुरू होण्यापूर्वी इतर पक्षाच्या कामगारसघटना तेथे होत्याच त्यामुळे आम्ही अशा ठिकाणी आमच्या कामगार संघटना तयार करून एका धद्यात एक युनियन या तत्त्वाला सोडचिठ्ठी दिली नाही. ज्या भागात नवे उद्योग सुरू झाहेत अशा कोल्हापूर–सांगली, सातारा किंवा अन्य काही ठिकाणी आमच्या कामगारसंघटना आहेत. या ठिकाणी अनेक धद्यांत आमच्याच कामगारसंघटना प्रातिनिधिक आहेत. कामगारक्षेत्रात आमचा कच्चा दुवा असला तरी तो एका धद्यात एक युनियन या तत्त्वामुळेही आहे हे विसरू नका.

## शेतमजूर–संघटन

'शेतमजुरांच्या आघाडीवरही आमचे काम चालू आहे. शेतमजुरांच्या बाबतीत पक्षाने सघटना बाधण्याची जी पद्धती प्रारंभी स्वीकारली होती ती पद्धती आम्ही आता बदलली आहे. पूर्वी आम्ही शेतकरी सभेमध्येच शेतकरी व शेतमजूर सघटित करत होतो. सात-आठ वर्षांपूर्वी ही पद्धती बदलली आणि केवळ शेतमजुराच्या संघटना बांधल्या आहेत अमरावती, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली या ठिकाणी आमच्या शेतमजुरांच्या संघटना आहेत आणि या वर्षापासून आम्ही आमच्या शेतमजुरांच्या सघटनांचा राज्यव्यापी महासंघ स्थापण्याचे ठरवले आहे. त्या दिशेने आमचे प्रयत्न चालू आहेत. काही दिवसांपूर्वी आम्ही कम्युनिस्ट पक्षाबरोबर शेतमजुरामध्ये काम करत होतो. शेतमजुरांच्या सघटनांच्या कामाचे, तिच्या चळवळीचे स्वरूप इतर सघटनांपेक्षा वेगळे आहे शेतमजूर–चळवळीला धार यायला वेळ लागतो. त्याच्यात चिकाटीने काम केल्यावरच फळ येणार आहे. शेतमजुरात काम करणाऱ्या इतर पक्षाचाही हाच अनुभव आहे.'

' शेतमजुरांना सघटित केल्यावर शेतकरी विरुद्ध जातील म्हणून शेतमजूर संघटना शे. का. पक्षाने बाधल्या नाहीत, असे म्हटले जाते. ' –मी.

> एन् डी : हे खरे नाही. शेतमजुरांना संघटित केल्यास शेतकरीवर्ग आमच्या विरोधात जात असेल तर त्यांच्या विरोधाची आम्हाला पर्वा नाही. आमचा पक्ष जमीनदारांचा आहे, हा आरोप आम्ही स्वीकारू शकत नाही. श्रीमंत शेतकरी आमचे अनुयायी नाहीत. गरीब व मध्यम शेतकरी व शेतमजूर यामध्ये आमचे काम चालू आहे.

प्रारंभीच्या काळात शे. का. पक्षाने शेतकरी व शेतमजूर या दोघाचे प्रश्न एकत्र करून ते मांडण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी शेतकरी-सभा दोन्ही घटकाना बरोबर घेऊन बाधल्या. आता शेतकरी सभा व शेतमजूर या सघटना वेगवेगळया केल्या आहेत. ' पधरा जिल्ह्यांत शेतकरी सभा आहेत,' असे सांगून श्री. पाटील यांनी पक्षाचे काम कोठे चालू आहे त्याची जिल्हावार माहिती दिली. कच्चे दुवेही सागितले. ' विदर्भात अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ या चार जिल्ह्यांत आम्ही आहोत. विदर्भाच्या बाकीच्या जिल्ह्यांत आमच्या शाखा नाहीत. उत्तर महाराष्ट्रात धुळे, जळगाव येथे काम चालू आहे; पण म्हणावे तसे नाही. मराठवाड्याच्या पाचही जिल्ह्यात काम चालू आहे. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात सर्वत्र व कोकणात ठाणे, कुलाबा जिल्ह्यात आम्ही आहोत.'

' सत्ता हातात कधीच येणार नाही असे चित्र असताना काम करणारे कार्यकर्ते खरे निष्ठावंत असतात. आमच्याजवळ असे कार्यकर्ते आहेत. विरोधी पक्षांजवळही या निष्ठेचे कार्यकर्ते आहेत,' असे सांगून श्री. पाटील म्हणाले, ' पुन्हा एकदा असे सांगतो, निवडणुकांमध्ये किती जागा आमच्या पक्षाने जिंकल्या, यापेक्षा आम्ही कॉंग्रेसला पंधरा जिल्ह्यात प्रखर विरोध करत टिकून आहोत, हे महत्त्वाचे आहे. इतर विरोधी पक्षांनी एवढया मोठ्या प्रमाणावर कोठे काम केले आहे? आम्ही सतत कॉंग्रेसविरोधी चळवळी करत आलो म्हणून

पंधरा जिल्ह्यांत आमचे स्थान टिकून आहे. आमची ताकद नसती तर चळवळीत आमचे स्थान राहिले नसते. निवडणुकीतील पराभवाची कारणे वेगळीच असतात.

'चळवळीत हाल-अपेष्टा सहन कराव्या लागतात. प्रसंगी मारही खावा लागतो. अशा चळवळीत साथ करणारी जनता मतपेटीच्या वेळी मात्र का साथ करत नाही?' असा प्रश्न विचारला तेव्हा श्री. पाटील म्हणाले, 'सत्ताधारी पक्ष अनेक क्लृप्त्या करतो. ते तंत्रच वेगळे आहे.'

**दलित-प्रश्न**

'तुम्ही दलितांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करता असा आरोप आहे'— मी.

'आमच्या पक्षाविषयी गैरसमजच फार. आम्हीही आमच्या कामाची जाहिरात करीत नाही. म्हणजे 'केले,' 'केले' असा गाजावाजा करीत नाही. ग्रामीण भागात आमचे कार्यकर्ते दलितांच्या बाजूने समर्थपणेच उभे राहिले आहेत. गवईबधूवर अत्याचार झाले. त्यांचे डोळे फोडले. याला प्रथम मी स्वत च विधानपरिषदेत वाचा फोडली. मीच प्रथम या अत्याचाराला वाचा फोडली, याचे पुरावे मी देऊ शकतो.'

'एका घटनेला एका व्यक्तीने वाचा फोडणे वेगळे व समाजाचे प्रश्न मांडणे वेगळे. तुमचा पक्ष दलितांचे प्रश्न मांडण्याकरिता काय करतो?' —मी.

'विरोधी पक्ष म्हणून दलिताचे काय किंवा अन्य समाजाचे काय, पण प्रश्नच मांडण्याचे काम करावे लागते. दलितांसाठी पोलिसपाटलांच्या चौतीस टक्के जागा राखून ठेवा, अशी आमची मागणी आहे. कलेक्टर दलित असणे व पोलिसपाटील दलित असणे यात फरक आहे. पोलिसपाटील दलित झाला की गावातील माणसाची मनोवृत्तीच बदलण्यास कारण होते. म्हणून आमचा त्यावर भर आहे. आमच्या हातात ग्रामपंचायती आहेत. त्यांपैकी बऱ्याच ग्रामपंचायतीचे सरपंच आम्ही दलित केले आहेत. आमच्या हातात होते तेथे दलितांना सरपंच केले व जेथे हातात काही नाही तेथे मागणी करीत राहणे हे आमचे काम आहे, ते आम्ही केले आहे.' असे श्री. पाटील यांनी सांगितले.

एन्. डी. पाटील पक्षाचे सरचिटणीस असल्याने संघटनेसंबंधी त्यांच्याशी चर्चा केली. संघटना-बांधणीबाबत त्यांचे अनुभव ऐकले. 'आघाड्यांच्या राजकारणामुळे पक्षाच्या कामावर परिणाम होतो. पक्षवाढीचे काम हातात घेण्याऐवजी आघाडीचा जो कार्यक्रम ठरतो तोच यशस्वी करण्यावर कार्यकर्त्यांचे लक्ष केंद्रित होते व पक्षबांधणी बाजूला पडते' असा अनुभव त्यांनी सांगितला.

'अलीकडच्या काळात आमच्या पक्षात युवक कार्यकर्त्यांची संख्या वाढली आहे. आमच्या पुरोगामी विद्यार्थी संघटनेत युवक सामील होऊ लागले आहेत. आम्ही कार्यकर्त्यांना राजकीय शिक्षण देण्याकरिता शिबिरे घेतो. चार-चार दिवसांची ही शिबिरे असतात आणि त्यांना दीडशे ते दोनशे युवक एकही दिवस गैरहजर न राहता उपस्थित असतात. या प्रशिक्षणाचे परिणाम पाच-सहा वर्षांनंतर दिसू लागतील. कार्यकर्ते तयार करण्यापूर्वी त्यांचे राजकीय शिक्षण झाले पाहिजे. आघाड्यांच्या राजकारणामुळे तेही कमी झाले होते.' असे श्री. पाटील म्हणाले. □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# दाजीबा देसाई



## आम्ही जातीपातीचा विचार कधी करीतच नाही ...

नागपूर काँग्रेसमध्ये सहकारी शेतीचा ठराव मांडण्यात आला आणि तो मंजूरही झाला. त्या वेळी सध्याचे गृहमंत्री चरणसिंग यांनी सहकारी शेतीच्या ठरावाला विरोध केला होता. सहकारी शेतीचे स्वप्न साकार होणार नाही हा विचार व्यवहार्य नाही, असे चरणसिंग यांचे मत होते. चरणसिंग जनता पक्षाच्या सरकारच्या मंत्रिमंडळातील गृहमंत्री व जनता पक्षाचे प्रमुख नेते आहेत. या जनता पक्षाचे काही पक्ष मित्र आहेत. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष जनताचा मोठा घटक असलेला मित्रपक्ष आहे. तरी पण शे. का. पक्षाच्या नेत्यांचा सहकारी शेतीवरील विश्वास कायम आहे. मात्र सहकारी शेती केव्हा निर्माण होईल, याविषयी शे. का. पक्ष शास्त्रीय विवेचन करतो. त्यासंबंधी दाजीबा देसाई यांची मुलाखत घेतली. तेव्हा त्यांनी हे विवेचन केले.

दाजीबा देसाई शे. का. पक्षाच्या संस्थापकांपैकी एक संस्थापक आहेत. सध्या लोकसभेचे ते खासदार आहेत. पक्षाच्या स्थापनेनंतर दाभाडी प्रबंध शेकापने स्वीकारला. हा प्रबंध तयार करण्यात दाजिबांचा सिंहाचा वाटा होता. तेरा दिवस बसून दाभाडी प्रबंध लिहिला गेला. शे. का. पक्षात अनेक वेळा अंतर्गत संघर्ष झाले, बरोबरच्या सहकाऱ्यांनी पक्ष बदलले, गट निर्माण केले; पण दाजीबा मूळ पक्षातच आहेत. ज्यांनी नवनवे गट निर्माण केले त्या गटांची व त्यांच्या नेत्यांची राजकीय वाताहत झाली. त्याला काही अपवाद आहेत. दाजीबा देसाई यांना केव्हाही भेटायला जा. ते तुम्हाला काही तरी वाचत असलेले दिसतील किंवा त्यांच्यापुढे दुधाचा ग्लास तरी भरलेला आढळेल. या दोन गोष्टी नसतील तर दाजीबांनी तपकीर तरी लावलेली असेल. पक्षाच्या चिटणीस मंडळाचे ते सदस्य आहेत.

शे. का. पक्षाने शेतमजुरांच्या प्रश्नाला हात घातला नाही, त्यांच्या संघटना बांधल्या नाहीत, हा ठराविक आरोप घेतला जातो. तो घेणाऱ्यांमध्ये राजकीय पक्ष आहेत, त्याचप्रमाणे राजकारणाचा अभ्यास करणारेही आहेत. साहजिकच त्याच प्रश्नापासून आमची मुलाखत सुरू झाली.

'शेतमजुरांच्या वेतनाकरता आंदोलन करण्याची वेळ आलेली नाही,' अशी सुरुवात करीत दाजीबा सांगू लागले, 'शेतमजूर हा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या गावच्या समाजरचनेत अडकून पडला आहे. समाजाच्या इतर वर्गांत त्याचे हितसंबंध गुंतले आहेत. श्रीमंत व मध्यम शेतकऱ्यांच्या शेतावर तो काम करतो. शेतमजुरांत स्पृश्य व अस्पृश्य असे दोन गट पडतात. शेतमजुरांच्या वेतनासाठी आंदोलन सुरू केले तर गावच्या सामाजिक परिस्थितीमुळे शेतमजुरांत हरिजन व हरिजनेतर शेतमजूर अशी विभागणी होते. शेतमजुरांचे आंदोलन सुरू झाले तर त्या गावातील जमीनमालक सामाजिक परिस्थितीचा फायदा घेऊन शेतमजुरांमध्ये गट पाडतात. त्यामुळे शेत-

मजुरांच्यातच संघर्ष सुरू होण्याचा धोका आहे. शेतमजुरांतील फाटाफुटीमुळे चळवळीला आधार राहात नाही.

'शेतमजुरांतील फूट टाळून त्यांना रोजगाराची हमी मिळावी याकरिता सरकारमार्फत योजना राबविली पाहिजे, हा आमचा आग्रह राहिला आहे. सरकारने रोजगार हमी योजनेवर तीन रुपये मजुरी दिली की उसाच्या किंवा बागायती पिके घेणाऱ्या भागात किंवा शेतीची कामे बारमाही चालतात तेथे शेतमजुराला तीन रुपये मजुरी द्यावी लागेल.

"समजा, बागायती भागात शेतमजुराला जमीनमालकाने तीन रुपये मजुरी दिली नाही तर शेतमजूर सरकारच्या रोजगारहमी योजनेवर कामाला जाईल आणि शेतीची कामे पडून राहतील. तेव्हा मालक शेतीची कामे वेळच्या वेळी पूर्ण करण्यासाठी शेतमजुराला किमान सरकारी योजनेवर मिळते तेवढी मजुरी देऊ लागेल. शेतमजुरांचे वेतन वाढावे व त्याला हमखास रोजगार मिळावा याकरिता सरकारने शेतीची सर्व कामे सरकारी यंत्रणेमार्फत सुरू करावीत. खाजगी शेतीतील कामे सरकारने आपल्या यंत्रणेमार्फत काढावीत व त्यासाठी येणारा खर्च जमीनमालकाकडून वसूल करावा शेतमजुराचे वाढलेले वेतन देण्यासाठी येणारा खर्च सरकार जमीनमालकाकडून घेऊ लागले की शेतमजुराकरिता शेतीची कामे काढणारी सरकारची यत्रणा व जमीनमालक यांच्यात करार होतील. म्हणजे मग शेतमजूर व मालक याच्यात प्रत्यक्ष संबंध राहणार नाही. त्याचप्रमाणे सामाजिक परिस्थितीच्या दबावामुळे शेतमजूरही दवला जाणार नाही.

'शेतमजुरासाठी या पद्धतीने कामे काढल्याने शे. का पक्षाचे समाधान होणार नाही. आमच्या हातात सत्ता आली की, याच्या पुढची पायरी म्हणून आम्ही सहकारी शेतीची वाटचाल करू,' असे श्री. देसाई म्हणाले.

मालकी हक्काची जाणीव एवढी प्रबल आहे की मालकी सोडून सहकारी शेती हे कसे सभवनीय, असा प्रश्न ओघानेच आला.

आज झोपलो व सकाळी उठलो की लगेच सहकारी शेती, असा प्रकारच नाही. टप्प्याटप्प्यानेच सहकारी शेती अस्तित्वात येईल, असा दाजिबाचा विश्वास असून त्यासाठी ते मार्गही सुचवितात. शेतकऱ्याला जगण्याचे हमखास साधन उपलब्ध केल्यावर जमिनीच्या मालकीचा प्रश्न दुय्यम होईल आणि सहकारी शेतीच्या प्रयोगाला प्रारंभ होईल आज शेतकऱ्याला जमिनीच्या मालकीचा हव्यास का आहे ? तर त्याला जमीन हेच उपजीविकेचे साधन आहे हे साधन आपल्या हातात असावे, ते हातात असले तरच आपला निर्वाह होणार आहे,या भावनेमुळे जमीनमालकीचा आग्रह धरला जातो

'भूदानासारख्या मार्गांनी जमिनीचे प्रश्न सुटणार नाहीत. जयप्रकाश नारायण यांनाही हे पटलेले असून आता ते वर्गसंघर्षाची भाषा करीत आहेत !' असे दाजीबा म्हणाले.

सामाजिक परिस्थितीचा विचार करताना ते म्हणतात: शे. का. पक्षाला महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा आधार आहे. आम्ही ब्राह्मणेतर चळवळ मानीत नाही महात्मा गांधीनाही फुले यांची सत्यशोधक चळवळ पटलेली होती. सत्यशोधक चळवळीचे तत्त्व अमलात आणण्यासाठी पक्षाचे नेतृत्व त्या समाजातील लोकांनी केले पाहिजे, असे महात्मा गांधीनीही म्हटले होते, याची आठवण श्री. देसाई करून देतात आणि शे. का. पक्ष मराठा जातीचा आहे, हा आरोप खोडून काढतात. आमचा पक्ष मराठा जातीच्या लोकांचा असता तर यशवतराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखालील कॉंग्रेसला सातत्याने आम्ही विरोध तरी कशाला करीत बसलो असतो ? निवडणुकीकरिता तिकिटे देताना आमचे बहुमत आहे अशा ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दलित व मराठेतर जातीच्या लोकांना महत्त्वाची पदे कशाला दिली असती ? आम्ही जातीचा विचार कधी करीतच नाही. तुम्ही हा प्रश्न काढला म्हणून त्याचे उत्तर द्यावे लागले. नाही तर आम्ही कधी जातीची चर्चा करीत नाही. आमचा पक्ष मराठ्याचा असता तर यशवतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाला आम्ही विरोध केला नसता. आम्ही त्यांच्या विरोधात खंबीरपणे उभे राहिलो म्हणूनच यशवंतराव चव्हाण यानी आमचा पक्ष मोडीत काढण्याचे अनेक प्रयत्न केले, मत्रीपदाची आमिषे दाखविली; पण आम्ही त्याला बधलो नाही', असे दाजिबांनी अभिमानाने सांगितले.

पक्षातील घटनांचा आढावा घेताना श्री. देसाई म्हणाले की, '१९४८ ते ५४ या काळात आमच्या पक्षात अनेक गट पडले, पक्ष फुटला. त्याचा परिणाम पक्षाच्या ताकदीवर झालाच; पण एक गोष्ट खरी की, यामुळे कार्यकर्त्यांचे खऱ्या अर्थाने राजकीय प्रशिक्षण झाले. वैचारिक संघर्षाचा हा काळ होता. त्यानंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर वैचारिक सघर्ष झालेला नाही.

कॉंग्रेसला डावा पर्याय उभा करण्याचे शे. का. प. ने प्रयत्न केले होते. सोशालिस्ट युनिटी करावी, डाव्या शक्तीनी सहकार्याने काम करावे आणि त्यातून एकत्र डावा पक्ष निर्माण करावा असा शे. का. प चा विचार होता व आजही आहे. १९४९ मध्ये शे का. प. ने शरदचद्र बोस याच्याशी त्या दृष्टीने वाटाघाटीही केल्या होत्या. कॉंग्रेसचे धोरण उजवे होते त्यामुळे डाव्या पर्यायाची आवश्यकता होती. जनता पक्ष सत्तेत आला असला तरी या परिस्थितीमध्ये फारसा फरक पडलेला नाही शेकापला याची जाणीव आहे. म्हणूनच दाजीबा देसाई म्हणतात, 'देशात डावा पर्याय उभा राहण्याजोगी परिस्थिती आजच निर्माण झालेली नाही; परंतु देशाच्या पातळीवर डाव्या पर्यायाचा विचार आम्ही सोडून दिलेला नाही कॉंग्रेस फुटल्यानंतर पक्षातर्गत सघर्षाचे लोण जनता पक्षात जाईल इंदिरा गांधी यांना वगळून जो कॉंग्रेस पक्ष राहिला आहे त्यामधील कॉंग्रेसजन, पूर्वाश्रमीच्या संघटना कॉंग्रेसमधील लोक आणि चद्रशेखर यांच्यासारखे कॉंग्रेसवाले एकत्र येण्याची दाट शक्यता आहे. इतर राज्यातील डाव्या राज्यपक्षाशी आमची डाव्या पर्यायाबाबत बोलणी चालू आहेत. उदाहरण द्यावयाचे झाल्यास बिहार-पश्चिम बगालचे देता येईल.

त्रिविद चौधरी आदीशी डाव्या पर्यायासंबधी प्राथमिक स्वरूपाची बोलणी चालू आहेत. शेकापचे खासदार बरेच आहेत. त्यामुळे इतर डाव्या पक्षाशी संबंध ठेवणे, त्याच्याबरोबर चर्चा करणे, एकमेकाला समजून घेणे या प्रक्रिया आता सुरू होत आहेत. थोडक्यात राजकीय ध्रुवीकरणाला पार्श्वभूमी तयार होत आहे' असे दाजीबा देसाई याचे मत आहे.

राष्ट्रीय चळवळीत राहून कम्युनिस्टपक्षाने त्या चळवळीतील श्रमजीवी जनतेचे नेतृत्व केले नाही असा ठपका शेकापने कम्युनिस्ट पक्षावर दाभाडी प्रबधाच्या निमित्ताने ठेवला. पक्षाची ही लाइन बदलेलली नाही किंवा धोरणात्मक चुका झाल्या असे दाजिबाना वाटत नाही. आज शेकाप दाभाडी प्रबंधाच्या मार्गाने चालला आहे. जनता पक्षाच्या जन्माने देशात जी हवा निर्माण झाली आहे त्या हवेच्या प्रवाहात राहून श्रमजीवी जनतेचे नेतृत्व करण्याची आवश्यकता आहे. हे काम केले नाही तर कम्युनिस्टांनी राष्ट्रीय चळवळीच्या वेळी जी चूक केली तशीच चूक केल्यासारखे होणार आहे, असे दाजीबा देसाई यानी सांगितले.

खासदार देसाई यांच्या या विवेचनावरून दाभाडी प्रबंधाचे महत्त्व टिकून आहे हे जसे दिसून येते त्याचप्रमाणे जनता पक्षाशी मैत्री करण्यामागचा त्या पक्षाचा हेतूही स्पष्ट होतो. ☐

# जागा वाटप : वास्तव आणि अवास्तव दावे

## माहितगार

मंत्रालयासमोर बैठे बंगले आहेत. त्यांपैकीच एका बंगल्यात विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते उत्तमराव पाटील राहतात. विधानसभा निवडणुकीकरिता जागावाटपांचा विचार याच बंगल्यात झाला. जनता पक्षाच्या, त्याच्या मित्र पक्षांच्या बैठकी याच बंगल्यात होत. तिकीटवाटपाची खलवते येथे चालायची. शह-काटशहांचे डावपेच याच बंगल्यात रचले जात होते. तेथूनच २९ डिसेंबर १९७७ रोजी एक दाढी वाढवलेला तरुण पाच-सात मिनिटांच्या अंतरावर असलेल्या आमदार-निवासाकडे घाईघाईने चालला होता. चालला होता म्हणण्यापेक्षा तो पळतच होता. त्याला पाठविले गेले होते. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लजमधील समाजवादी पक्षाचे (पूर्वाश्रमीचे) श्रीपती शिंदे यांनी आमदार-निवासामधील लिफ्ट गाठली. सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे होमगार्ड लिफ्ट चालवत. सवय नसल्याने तिच्या ये-जाच्या वेगावरही परिणाम होत होता. दारांची खाटखुट करीत लिफ्ट वर चालली. चौथ्या मजल्यावर श्रीपती शिंदे उतरले. शिंदेंना खोल्यांची रचना माहिती नव्हती. त्यामुळे चारशे दहा नंबरची खोली शोधण्याकरिता शिंदयांना दोन-चार मिनिटे लागली. चारशे दहा नंबरची खोली शेतकरी कामगार पक्षाच्या आमदारांना दिलेली. साहजिकच शे. का. पक्षाच्या चिटणीस मंडळाच्या बैठका येथे भरत. नऊ महिन्यांपूर्वीही, मार्च १९७७ च्या लोकसभा-निवडणुकीसंबंधी शे. का. पक्षाच्या चिटणीसमंडळाची बैठक याच खोलीत भरली होती आणि निर्णय होण्याचा क्षण आला असतानाच एसेम जोशी यांनी दिल्लीहून फोन केला होता.

२९ डिसेंबर १९७७ चा प्रसंग नेमका त्याच्या उलट होता. जनता व त्याच्या मित्रपक्षाच्या समन्वयसमितीवर बहिष्कार टाकून शे. का. पक्षाचे प्रतिनिधी आले होते. समन्वय समितीमध्ये जनता पक्षाच्या काही नेत्यांनी शे. का. पक्षाला गौणत्व देऊन विधानसभेकरिता जेमतेम चाळीस जागा देऊ केल्या होत्या. जनता पक्षाची भूमिका विचारात घेऊन शे. का. पक्षाचे दाजीबा देसाई व एन्. डी. पाटील, 'मग लढवा तुम्ही तुमच्या ताकदीवर निवडणुका ! आम्ही आमचा वेगळा विचार करू !' असे सांगून बाहेर पडले व चारशे दहावर आले होते. तेथे चिटणीसमंडळ पुढच्या कृतीचा विचार करीत होते. श्रीपती शिंदे यांनी दारावरची घंटा वाजविली. दार उघडले जाताच शिंदे यांनी त्या बैठकीतच एसेम्चा निरोप सांगितला.

'एसेम्नी विचारलं आहे, मी भेटायला येऊ का ?' श्रीपती शिंदयांचा निरोप ऐकून दाजीबा देसाई म्हणाले, 'एसेम्ना कशाला त्रास देता ? फोन केला तरी चालेल म्हणावं !'

दाजीबांचा निरोप घेऊन शिंदे त्याच लगबगीने उत्तमरावांच्या घरी पोहोचले. एसेम् तेथून निघतच होते. एस्. एम्. जोशी आमदार-निवासाकडे श्रीपती शिंदे यांच्याबरोबर चालले. त्यांनी वाटेतच एसेम्ना दाजीबा देसाईंचा निरोप सांगितला. एसेम् यांच्या पाठोपाठ जनता पक्षाकडे उमेदवारीकरिता अर्ज केलेले इच्छुकही चालले होते. ते एसेम्ना आपली उमेदवारी कशी योग्य आहे हे पटविण्याचा प्रयत्न करीत होते; पण त्याकडे एसेम्चे लक्ष नव्हते. आमदार निवासाच्या तळमजल्यावर काही पत्रकार एस्. एम्. जोशी यांना भेटतात. त्यांच्याशी बोलण्याची एसेम्ची तयारी नसते. पत्रकारांना एसेम् यांच्या घाईची कल्पना नसते. बोलल्यासारखे करून एसेम्नी पत्रकारांना वाटेला लावले. तेवढ्यात श्रीपती शिंदे चारशे दहावर पोचले.

'एसेम् येताहेत'–शिंदे.

'ठीक आहे. येऊ देत'–एन. डी. पाटील निर्विकारपणे बोलत होते. दार ढकलून एसेम् आत शिरले तेच मुळी हात जोडून ! अक्षरशः एस्. एम्. जोशी यांनी आपले हात जोडले होते. शेकापच्या नेत्यांनी एसेम्ना चहा घेता का, विचारले. त्यांनी चहा घेतला नाही; पण पाणी मागितले. चिटणीस मंडळाला हात जोडलेल्याच अवस्थेत एस्. एम्. जोशी म्हणाले, 'मी माफी मागायला आलो आहे, माझ्या पक्षाच्या काही जणांनी चूक केली आहे. त्याबद्दल मी माफी मागायला आलो आहे. काँग्रेसचा पराभव एकटा जनता पक्ष करू शकत नाही. त्याप्रमाणे एकटा शे. का. पक्षही करीत नाही. आज कोणाही एकट्यात काँग्रेसचा पराभव करण्याइतकी ताकद नाही. आपल्याला एकजूट टिकवलीच पाहिजे. माझ्या पक्षाच्या नेत्यांनी केलेल्या चुकीची मी माफी मागतो आणि तुम्हाला पासष्ट जागा दिल्या जातील याची खात्री देतो.'

एस्. एम्. जोशींसारखी व्यक्ती हात जोडीत आली आणि तिने माफी मागितली या घटनेने चिटणीसमंडळ अवाक्च झाले. 'आम्ही विचार करून काय ते कळवितो', असे दाजीबा देसाई म्हणाले. एसेम् बाहेर पडले. लोकसभा-निवडणुकीच्या आधी लोकशाही की हुकूमशाही अशी लढाई आहे, असे सांगून एसेम्नी शेकापला किती जागा हव्यात, असे विचारले होते. नऊ-दहा महिन्यांत परिस्थिती पार बदलून गेली होती.

विधानसभा-निवडणुका एकत्र लढविण्याचे शे. का. व जनता पक्षाने ठरविले होते; पण जागावाटपाच्या खडकाजवळ तारू येऊन ठेपले होते. जनता पक्षाला आपल्या ताकदीची वेगळीच जाणीव

झाली होती. केंद्रीय गृह राज्यमंत्री सोनुसिंग पाटील यांनी दाजीबा देसाई आदींना स्पष्टच सांगितले, 'आम्ही दोनशे जागा लढविणार आहोत व महाराष्ट्रात जनता पक्षाचेच सरकार स्थापणार आहोत !' सोनुसिंग पाटील यांच्या विधानानंतर शे. का. पक्षाने एस्. एम्. जोशींना यासंबंधी विचारलेही होते; परंतु एसेम्नी सर्व मित्रपक्ष एकाच पातळीवर मानून काँग्रेसविरोधी संयुक्त मोर्चा करण्याचेच आमचे धोरण आहे; मित्रपक्षामध्ये कोणी मोठा नाही, तसाच कोणी छोटा नाही; जनता पक्ष केवळ आपलेच बहुमत होईल अशा दृष्टीने आगामी विधानसभा निवडणुका लढविणार नाही, असा खुलासा केला होता.

## एसेम्ची भूमिका

लोकसभा-निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यापासून एस्. एम्. जोशी म्हणत आले आहेत की, हे चक्र सुरू झाले आहे. विधानसभा-निवडणुकीत काँग्रेसचा पराभव केल्याशिवाय हे चक्र पूर्ण होणार नाही. वर्तुळांचे टोक एकमेकाला मिळणार नाही. त्याकरिता काँग्रेसचा पराभव झालाच पाहिजे. काँग्रेस पराभवासाठी जनता व त्याचे मित्र पक्ष एक राहिलेच पाहिजेत. काँग्रेसचा पराभव करून मित्रपक्षाने सत्तेत सहभागी व्हावे, हा जोशी यांचा प्रयत्न आहे. शे. का. पक्षाने सत्तेत सहभागी होण्याचे आश्वासन जनता पक्षाला दिले आहे; परंतु केवळ सत्तेसाठी सत्ता, हा प्रचार जनतेला दिसता कामा नये. त्याकरिता अमलात आणता येईल असा डावा किमान कार्यक्रम एक असावा, असा आग्रह शे. का. पक्षाने धरला; परंतु कार्यक्रम एक ठरण्याआधीच संकट उभे राहिले होते.

शे. का. पक्षाला किती जागा सोडाव्यात याचा सौदा जनता पक्ष करू लागला. केवळ शेकापलाच नव्हे तर, इतरही मित्रपक्षाना किती जागा द्यावयाच्या हे जनता पक्ष ठरवू लागला. सर्व मित्रपक्ष समान पातळीवर असतील ही भूमिका जनता पक्ष विसरला आणि त्याने आपणच बडा भाई या नात्याने तिकिटांची खिरापत वाटण्यास सुरुवात केली. 'देशात जनतालाट आहे तिचा फायदा जनता पक्षाला महाराष्ट्रात देणार आहात की नाही ?' असा प्रश्न जनता पक्षवाले करू लागले. त्यांनी शे. का. पक्षाला प्रथम सत्तावीस जागा देऊ केल्या. त्यावर त्याचे समाधान होईना, तेव्हा सत्तावीसच्या चाळीस व चाळिसाच्या पंचेचाळीस–पन्नास करीत करीत गाडी आली ती पुढे जाईच ना ! या वेळपर्यंत मित्र पक्षाबरोबरच्या वाटाघाटीत एसेम् फारसे उतरलेच नव्हते. सर्व काही व्यवस्थित होऊन जाईल असे त्यांना वाटत होते. जागावाटपावरून कोंडी निर्माण झाली तेव्हा एसेम्नी जनतानेते व कार्यकर्ते यांची बैठकीत चांगलीच खरडपट्टी काढली. 'आम्ही २७८ जागा लढविणार' असे जनतानेते म्हणाले. एसेम्नी दम देताच ही संख्या १७८ पर्यंत खाली आली; पण एसेम् संतापलेच होते. 'मग लढवा ८८ जागा आणि दाखवा जिंकून !' असे एस्. एम्. जोशी यांनी सुनावले. त्यांच्या त्राग्यानंतर दुसऱ्या दिवशी समाजवादी काँग्रेसचे शंकरराव चव्हाण् व पी. के. सावंत यांना चर्चेकरिता बोलाविले गेले. त्यांना वाटले चर्चा एस्. एम्. जोशी करणार म्हणून ! चर्चा कोण करणार आहेत याची चौकशी न करताच चव्हाण-सावंत उत्तमरावांच्या घरी आले. तेथे सुराणा, जगन्नाथ जाधव, भागवत, कानिटकर वगैरे नेतेमंडळी फक्त हजर होती. तरीही चव्हाण-सावंत यांनी चर्चेला सुरवात केली. जगन्नाथ जाधवांनी चर्चेला सुरवात अशी केली, 'शंकरराव, तुम्ही निवडणूक लढवू नका. तुम्हाला लोकांचा विरोध आहे आणि तुम्ही उभे राहिलात तर विजयाची आशा नाही.' मित्रपक्षाशी या पद्धतीने चर्चेला सुरवात झाली. त्यानंतर ठिकठिकाणाहून शंकरराव चव्हाण यांना लोकाचा विरोध, अमुक मतदार संघात शेकापला विरोध, अशा बातम्या झळकू लागल्या. यासारख्या बातम्या पाहूनही एसेम् बरेच चिडले होते. 'आमच्या लोकांकडून काही डावपेचात्मक चुका झाल्या आहेत.' असे जनता पक्षाच्या एका प्रमुख खासदाराने आम्हा दोघा पत्रकारांजवळ कबूल केले होते. शे. का. पक्षाला जी वागणूक दिली, ती पाहून त्यांचे कार्यकर्तेही 'स्वतःच्या ताकदीवर निवडणूक लढवू या !' असा आग्रह फोन करून, त्याचप्रमाणे तारा पाठवून करू लागले.

शे. का. पक्षाला २७–४० करीत जागा देण्याचा प्रकार सुरू झाला, जनता पक्ष सर्वांना समान लेखीनासा झाला, तेव्हा शे. का. पक्षाने समन्वयसमितीवर बहिष्कार घातला. बहिष्कारानंतर पत्रकारांना शेकाप नेत्यांनी 'आम्ही निर्णय घेतलेला नाही. तो घेतला की तुम्हाला बोलावितो,' असे सांगितले; परंतु आमचे जनता पक्षाबरोबर मतभेद झाले आहेत, असे त्यांनी सांगितले नाही. उलट जनता पक्षानेच शे. का. पक्षाने बहिष्कार घातला, असे प्रथम जाहीर केले होते. बहिष्काराच्या निर्णयानंतर शेकाप नेत्यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती. पक्षाच्या चिटणीसमंडळाच्या बैठका चालल्या होत्या. त्यांची माहिती त्या त्या वेळी शेकापने पत्रकारांना दिली असती तर मित्रपक्षाचे तारू फुटलेच असते. २९ डिसेंबरला एस्. एम्. जोशी यांनी ६५ जागा देऊ केल्या. एवढ्या जागा स्वीकारण्यास शेकाप तयार नव्हता. तेव्हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे एस्. वाय्. कोल्हटकर, समाजवादी काँग्रेसचे शंकरराव चव्हाण-पी. के. सावंत यांनी मध्यस्थी करण्यास सुरुवात केली. जनता पक्षाचे नेतृत्व चर्चांमध्ये टाकून बोलण्याचे काम करूनच होते. एकत्र राहिलो तरच काँग्रेसचा पराभव होण्याची शक्यता आहे याची जाणीव चव्हाण, सावंत, कोल्हटकर यांना असल्याने त्यांनी समझौता घडवून आणण्याचे आटोकाट प्रयत्न सुरू केले. इतरांशी बोलण्याऐवजी एस्. एम्. जोशी किंवा उत्तमराव पाटील यांच्याशी चर्चा करण्याचे धोरण त्यांनी ठरविले.

आपला निर्णय जाहीर करण्यासाठी ३१ डिसेंबर रोजी शेकापने पत्रकार परिषद बोलाविली होती. ती झाली असती तर परत मागे फिरण्याचे रस्तेच बंद झाल्यासारखे होते. पी. के. सावंत यांना याची कल्पना असल्याने त्यांनी एसेम, उत्तमराव, कोल्हटकर यांच्याशी दिवसभर वाटाघाटी केल्या. इतर पक्ष म्हणजे मार्क्सवादी, कम्युनिस्ट, समाजवादी काँग्रेस यांनी आपल्या जागा कमी करा व त्या शेकापला द्या अशी भूमिका स्वीकारली. तडजोडीची शक्यता दिसू लागली तेव्हा पी. के. सावंत शेकापच्या तळावर, बारशे दहा नंबरच्या खोलीवर पोचले आणि त्यांनी पत्रकार परिषद पुढे ढकला, अशी विनंती एन्. डी. पाटील, दाजीबा देसाई आदींना केली. काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामकरी संघाची स्थापना होईपर्यंत सावंत शेकापच्या मंडळीबरोबर होते. जुन्या संबंधांना उजाळा मिळत गेला व सावंत यांच्या सूचनेनुसार शे. का. नेत्यांनी पत्रकार परिषद पुढे ढकलली. इतर पक्षानी

आपल्या जागा कमी करण्याचे ठरविले, त्यामुळे शेकापच्या जागांमध्ये वाढ होऊ लागली. ४ जानेवारी १९७८ रोजी पी. के. सावंत यांनी शे. का. प. व समन्वय समितीला एकत्र आणण्यात यश मिळविले. त्याची किंमत मात्र सावंत यांना मोजावी लागली. सरकारने ताब्यात घेतलेल्या जागेत सावंत राहात होते. ४ जानेवारीस रात्री. त्यांनी समझौता घडवून आणला. सरकारला तो निर्णय ५ जानेवारीस समजला आणि सावंतांना सात दिवसांच्या आत नेपीवनसी रोडवरील जागा सोडा अशी सरकारने नोटिस बजाविली.

जनता पक्षाबरोबर शेकापचे बिनसले असते तर ते काँग्रेसला पथ्यावर पडणार होते. पी. के. सावंत यांच्या प्रयत्नामुळे जनता-शेकाप यांच्यात तडजोड झाली होती. याची किंमत म्हणून 'जागा खाली करा' ही नोटीस सावंत यांच्या हातात पडली होती.

समन्वय समितीच्या बैठकीवर शेकापने घातलेला बहिष्कार उठवून तो पक्ष बैठकीला हजर राहिला तेव्हा एस्. एम्. जोशी यांनी शेका पक्षाला आम्ही ऐंशी जागा देऊ, म्हणून जाहीर केले. एसेम् यांचा निर्णय जनता पक्षाच्या इतर नेत्यांना आवडला नाही. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत शे. का. पक्षाने ८६ जागा लढविल्या होत्या. त्यामुळे एस्. एम् जोशी यांनी ८० जागा देण्याचे मान्य केले. जनता व त्याच्या मित्र पक्षांना बहुमत मिळाले तर, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपला प्रभाव टाकण्याकरिता प्रभावी गट असावा या अटीतटीसाठी जागांची रस्सीखेच चालली होती. यासाठीच सुरुवातीला सोनुसिंग पाटील यानी आम्हाला दोनशे जागा मिळतील एवढ्या जागा लढवायचा मनोदय बोलून दाखविला होता. एस्. एम्. जोशी यांना शेका पक्षाबरोबर प्रथम जे बोलणे झाले त्याप्रमाणे पक्षाचे वर्तन व्हावे असे वाटत होते.

'आपले राजकारण पुढे रेटण्यासाठी; आपली ताकद वाढविण्याकरिता जागावाटपाचा घोळ घातला गेला. जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव केला. त्या लाटेचा फायदा जनता पक्षाला हवा आहे, तसाच शे. का. पक्षालाही हवा आहे. तो घेण्याकरिता शेकापने जनताशी समझौता करण्याचे ठरविले आहे. शे. का. पक्ष महाराष्ट्रात सर्व भागात नाही, त्याप्रमाणेच जनता पक्षाचीही अवस्था आहे. जनता पक्ष म्हणजे जनसंघ, असे वातावरण यशवतराव चव्हाण यांच्यासारख्या नेत्यांनी निर्माण केले आहे. या वातावरणातून सुटका करून घेण्यासाठी जनता पक्षाला शेकाप आपल्याबरोबर हवा आहे. विधानसभा निवडणुकीत बहुसंख्य मतदार ज्या समाजातील आहेत, त्या जनतेचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षाला मते मिळू द्यावयाची नसतील तर, जनतालाट अधिक बहुसख्य समाजात वावरणारा पक्ष, बरोबर ठेवूनच काँग्रेसचा पराभव करणे शक्य होणार आहे. याकरिता जनताला शे. का. पक्षाची मैत्री आवश्यक वाटते. शे. का व जनता दोन्ही पक्ष आपल्या ताकदीच्या वाजवीपेक्षा जास्त मूल्यमापन करीत बसले व त्यातून जागावाटपाचा संघर्ष निर्माण झाला.

## श्रीकृष्ण हॉलमधील बैठक

एस्. एम्. जोशी यांनी शे. का. पक्षाला ८० जागा देण्याचे ठरविल्यामुळे जनतानेते व कार्यकर्ते चिडले. त्यांनी एसेमविरुद्ध केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार केली. त्याचा काही उपयोग झाला नाही. मात्र जोशी यांनी महाराष्ट्र जनता पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक बोलाविली. १५ जानेवारी १९७८ रोजी नायगावच्या श्रीकृष्ण हॉलमध्ये ही बैठक दुपारी दोन वाजता सुरू झाली आणि दुसऱ्या दिवशी पहाट पाच वाजता संपली. काही कार्यकर्त्यांनी एस्. एम्. जोशी यांना शेकापला ८० जागा दिल्याबद्दल दोष दिला. हे लोक एसेम्‌विरुद्ध बोलू लागले तेव्हा काहींनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली; पण एसेम्‌नी आरडाओरडा करणारांना गप्प बसवून आपल्याविरुद्ध चाललेली टीका बंद न पाडता ती तशीच चालू ठेवली. सर्वांचे ऐकून घेतल्यानंतर एसेम् बोलले. रागातूनच बोलले. 'पक्षाच्या (महाराष्ट्र) पार्लमेंटरी बोर्डाशी चर्चा करूनच मी शे. का. पक्षाला जागा देऊ केल्या आहेत. तुम्ही मला नेता केले आहे. माझे नेतृत्व तुम्हाला हवे असेल तर, काँग्रेसचा पराभव करण्यासाठी ज काही करणे आवश्यक वाटेल ते मी करीन. तुम्हाला माझे नेतृत्व नको असेल तर, दुसरा नेता पाहा. मला नेतृत्वाची गरज नाही. महाराष्ट्रात पक्ष बांधावा म्हणून मी ही जबाबदारी स्वीकारली. या वयात नेतृत्व करावे आणि मिरवावे ही इच्छा नाही. पक्षासाठी मी हे करीत आहे. मला काय गरज होती या आटापिटयाची? पश्चिम बंगालचे राज्यपालपद मला दिले होते; पण पक्षबांधणीसाठी मी राज्यपालपद नाकारले आहे. माझे नेतृत्व मान्य नसेल तर मी ते सोडून देतो; पण जर नेतृत्व स्वीकारले असेल तर, चार-दहा जागा द्यावयाच्या की नाही, हे करू का, हे विचारायला मी तुमच्याकडे येणार नाही. पक्षाच्या हितासाठी जे काही करता येईल ते मी करीन.' असे एस्. एम्. जोशी यांनी ठणकावले. तेव्हा मित्र पक्षाशी मैत्री करण्यासाठी ज्या दिशेने व ज्या पद्धतीने प्रयत्न चालू आहेत ते तसेच पुढे चालू ठेवण्याचे एकमताने ठरविण्यात आले.

एस. एम. जोशी यांच्यावर कार्यकर्ते टीका करत होते त्या वेळी इतर जनतानेते स्वस्थ बसून होते. वास्तविक पार्लमेंटरी बोर्डात जो आधार ठरला होता त्या आधारे एसेमनी शेकापला शब्द दिला. म्हणजे त्यामध्ये या लोकांचाही सहभाग होता. असे असतानाही त्यांनी एसेमवर टीका होऊ दिली. या बैठकीनंतर मी उत्तमराव पाटील यांना याबाबत विचारले—एसेमवर टीका झाली तरी तुम्ही गप्प का बसला होतात? 'माझ्या उपस्थितीतच काही गोष्टी ठरल्या होत्या. त्यामुळे मला बोलणे अवघड झाले होते,' असे कारण उत्तमरावांनी दिले. या वेळी माझ्याबरोबर लोकसत्ता व टाइम्स ऑफ इंडियाचे वार्ताहरही होते.

शेका पक्षाच्या ताकदीची कल्पना एस्. एम्. जोशी यांना आहे व त्या पक्षाच्या पाठिंब्याचे महत्त्व किती आहे, याची जाणीवही त्यांना असल्याने एस्. एम्. जोशी यांनी शे. का. पक्षाची मैत्री तुटू नये यावर भर दिला व ऐंशी जागा देण्याचे कबूल केले. एस्. एम्. जोशी यांनी ऐंशी जागा कबूल केल्यामुळे काही जनतानेत्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. शे. का. पक्षामुळे आपल्या आशा-आकांक्षांना तडा जाण्याची शक्यता आहे, असे वाटून जनता पक्षाचे उपाध्यक्ष राजारामबापू पाटील वगैरे मंडळी दिल्लीला जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे गेली. शे. का. पक्षाचे ५५–६५ पर्यंत आमदार झाले तर त्यांचे वर्चस्व निर्माण होईल व त्या जोरावर ते मुख्यमंत्रिपद किंवा अधिक मंत्रिपदे मागतील, धोरणांच्या बाबतीत आग्रही राहतील, अशा अनेक प्रकारची भीति जनता-नेते व कार्यकर्ते व्यक्त करीत. पूर्वाश्रमीच्या

जनसंघीयांचा एकाधिकार कापूस खरेदी योजनेला विरोध होता. शे. का. पक्षाने या योजनेचा आग्रह धरला आहे. मित्र पक्ष सत्तेवर आल्यावर शे. का. पक्ष या योजनेचा आग्रह धरणार, हे उघड आहे. त्यांच्या आग्रहाची तीव्रता कमी करावयाची असेल तर त्यांचा आवाज, त्यांचे सामर्थ्य कमी करण्याची आवश्यकता आहे. म्हणून शे. का. पक्षाची ताकद कुठे आहे ? विदर्भात शे. का. पक्ष नाहीच, मग त्यांना ऐशी जागा देणे हे फारच झाले, असे आक्षेप घेतले जाऊ लागले. काही समाजवाद्यांना शे. का. पक्ष जातिवादी व जमीनदारांचा पक्ष वाटतो. शेकाने जमीनधारणा वगैरे बाबत जी धोरणे स्वीकारली त्यांचा विचार ते करत नाहीत. शे. का. पक्षातील काही माणसे जमीनदार आहेत म्हणून त्या पक्षाला जमीनदारांचा पक्ष म्हणणाऱ्या समाजवाद्यांनी आपल्या पक्षातील माणसांचाही आढावा घेतला पाहिजे, ज्यांच्या मांडीला मांडी लावून समाजवादी बसले आहेत, त्यांचे व्यवहार व मालमत्ता पाहावी. बर्फाच्या मालमत्तेचा विचार करण्याऐवजी व्यापक धोरण महत्त्वाचे मानले पाहिजे.

शे. का. पक्षाविषयीही काही समाजवाद्यांना धोरण वगळता आमदारांच्या संख्येचा प्रश्न भेडसावत आहे. तिकिट मिळावे म्हणून प्रयत्नात असणारे काँग्रेसमधील काहीजण शेकापत येणार आहेत. त्यांना तिकिट मिळावे म्हणून शे. का. प. आधीच आपला कोटा मिळवून ठेवत आहे. या प्रवृत्तीला ज्यांचा विरोध आहे तो कोणालाही समजता येईल व हा विरोध वास्तव आहे असेच म्हटले जाईल; पण हा विरोध काही प्रमाणातच राहणारा होता. ८० पैकी काही जागाच (१०–१५) काँग्रेसमधून येणाऱ्यांकरता राखून ठेवता येणार होत्या.

राज्याच्या सर्व भागांतसुद्धा शे. का. पक्ष नाही असे म्हटले जाते व ती वस्तुस्थिती आहे. काँग्रेस वगळता राज्यभर पसरलेला असा कोणताही पक्ष महाराष्ट्रात नाही, ही वस्तुस्थिती आहे. आठ-दहा जिल्ह्यापलीकडे शे. का. पक्ष नाही असे म्हटले जाते तेव्हा शे. का. पक्षाचे नेते हाच प्रश्न इतरांच्या बाबतीत विचारतात. "आम्ही ८–१० जिल्ह्यांत तरी आहोत. जनता पक्ष किती जिल्ह्यांत आहे ? जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आहे याचा अर्थ त्या पक्षाची पाळेमुळे ग्रामीण भागात पोचली असा होत नाही. जनता पक्षाचे ग्रामीण भागात काम असे कोठे आहे ? राजकीय बदलामुळे जनता पक्षाचे नाव फार तर खेडोपाडी पोचले आहे असे म्हणता येईल, असा युक्तिवाद शे. का. पक्षाचे नेते करतात ! जनता पक्ष म्हणून त्या पक्षाने एखादा कार्यक्रम जाहीर केला तर ग्रामीण भागात त्यामागे जनता किती उभी राहील हे जनता पक्षाने पाहावे व आम्ही एखादा कार्यक्रम दिला तर ग्रामीण जनतेचा त्यात किती सहभाग मिळतो हे पाहावे, अशी आव्हानाची ताकद अजमावणारी भाषा शे. का. पक्षाकडून ऐकायला मिळते. 'निवडणुकीतील निकाल ही खऱ्या ताकदीची लक्षणे नव्हेत. निवडणुकीत अनेक शक्ती (फोर्सेस) काम करत असतात. त्यामुळे कित्येक वेळा निवडणुकीचे निकाल प्रतिकूल लागतात. कार्यक्रमाला, धोरणाला पाठिंबा मिळवणे, त्या जोरावर जनतेच्या चळवळी उभ्या करणे व त्यात जनतेचा सहभाग वाढवणे, ही खरी पक्षाची ताकद आहे. पक्षाचे केडर वाढणे किंवा केडर वाढवणे ही पक्षाची शक्तिस्थाने आहेत.' असे दाजीबा देसाई पक्षाच्या ताकदीविषयी बोलताना म्हणाले.

उत्तर भारतात विधानसभेच्या निवडणुका झाल्या त्यात प्रादेशिक पक्षाचे स्थान असलेल्या पक्षांना बहुमत तरी मिळाले किंवा प्रादेशिक पक्ष बहुसंख्येने तरी निवडून आले आहेत. पश्चिम बंगाल, त्रिपुरा येथे मार्क्सवादी कम्युनिस्ट, काश्मीरमध्ये शेख अब्दुल्ला यांचा पक्ष, पंजाबात अकाली दल याना बहुमत मिळाले, तर तामीळनाडूत कधी द्रविड मुन्नेत्र कळघम, तर कधी अण्णा द्रमुक असे प्रादेशिक पक्षच सत्तेवर आलेले आहेत. प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढत चालले आहे असे अनुमान राजनीतिज्ञ काढू लागले आहेत. याचा फायदा उठवावा असे शे. का. पक्षाला वाटत असून त्याचे ते स्वप्न आहे. याकरिताही शे. का. पक्ष जागांसाठी ओढाताण करत होता. बहुमत कोणत्याच पक्षाला मिळाले नाही तर आपला पक्ष त्या वेळी निर्णायक घटक व्हावा ही अपेक्षा धरून शे. का. प.ने जागांचा आग्रह धरला. निर्णायक घटक किंवा सत्तेतील प्रमुख घटक ही भूमिका आली की त्या जोरावर पक्षाची मुळे आणखी खोलवर रुजवावीत व भविष्यकाळात द्रमुकसारखे स्थान मिळवावे, हा उद्देश धरून शे. का. प. पावले टाकत आहे.

## पक्ष संघटन कमी का पडले ?

शे. का. प. महाराष्ट्राचा द्रमुक होणार काय असा प्रश्न चिटणीस मंडळाचे सदस्य व संस्थापक दाजीबा देसाई यांना विचारला तेव्हा त्यांनी आमचा तसा प्रयत्न नाही, असे सांगितले. ते म्हणाले, 'आमचा हनुमानउडीचा प्रयत्न नाही. द्रमुकसारखी चळवळ महाराष्ट्रात यायला दहा वर्षे लागतील. आम्ही विदर्भात तीन–एक जिल्ह्यात आहोत; परंतु विदर्भ एका पिढीने मागे आहे. म्हणूनच तेथे आमचा पक्ष वाढला नाही. महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ थांबू लागली तेव्हा ती विदर्भात सुरू झाली. राष्ट्रीय चळवळीचाही असाच अनुभव आहे. राष्ट्रीय चळवळ विदर्भात उशीरा सुरू झाली आहे. अनुभवातून पटल्याशिवाय विदर्भ चळवळ मान्य करत नाही, त्यात सहभागी होत नाही, म्हणून विदर्भ एका पिढीने मागे आहे. त्याच कारणाने आमचा पक्ष तेथे वाढू शकला नाही; परंतु आता ती प्रक्रिया सुरू झाली आहे.'

शे. का. पक्षाच्या कोणत्याही नेत्याला आम्ही कधीं धोरणात्मक चूक केली आहे, असे वाटतच नाही. मात्र 'पक्षसंघटनाकार्यात कमी पडलो आहोत. मध्यंतरी आमचे पक्षसंघटना बांधण्याकडे दुर्लक्ष झाले. पक्षसंघटनेखाली ज्या वेगवेगळ्या विभागांत काम करायला हवे होते, लोकांना संघटित करायला हवे होते ते आमच्याकडून झाले नाही. जाहीर सभा, काही चळवळी याद्वाराच पक्षाचे काम सुरू आहे, पण पक्ष वाढावा याकरिता जे काम करणे आवश्यक होते ते करू शकलो नाहीं. त्याचप्रमाणे प्रसिद्धीच्या बाबतीत आमचा पक्ष जणू अस्पृश्यच मानला जातो. काही मजकूर आलाच तर तो विकृत करून छापला जातो व तो आधार मानून टीका करण्यात येते. वृत्तपत्रांद्वारे आमची बाजू कधी मांडली गेली नाही. पैशांची कमतरता हेही एक कारण आहेच ! आम्ही निवडणुका लढवतो ते जनतेच्या पैशावर ! उमेदवाराजवळ पैसा नसतोच., कार्यकर्तेच पैसे गोळा करतात आणि निवडणूक लढवतात,' असे पक्षाचे नेते सांगत असतात. याचे उदाहरण दाजीबा देसाईंचे दिले जाते. मार्च १९७७ मध्ये आलेला लोकसभा निवडणूक लढवण्याचा आदेश दाजीबांना देण्यात आला. उमेदवारी अर्ज करताना भरावी लागणारी अनामतीची रक्कम

त्यांच्याजवळ नव्हती, पण कार्यकर्तेच दाजिबांना म्हणाले, 'तुम्ही फक्त सही करा. बाकीचा विचार तुम्ही करू नका.' कार्यकर्त्यांनी अनामत भरली, निवडणुकीकरता पैसा गोळा केला. त्र्यं. सी. कारखानीस शे. का. पक्षात होते तेव्हा त्यांच्याबाबतीतही असाच अनुभव होता.

शे. का. पक्ष हा संघटना म्हणून कसा उभा आहे, याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. पक्षाची प्राथमिक शाखा एखाद्या गावात सुरू करावयाची झाल्यास किमान पाच सदस्य व्हावे लागतात. शहरातील वॉर्डमध्येही प्राथमिक शाखा उघडता येते. काँग्रेसनंतर शे. का. पक्षाच्याच प्राथमिक शाखा आहेत. इतर विरोधी पक्ष जिल्हा पातळीवर उभा केला आहे. गाव युनिटपासून पक्षाची उभारणी काँग्रेसनंतर शे. का. पक्षाची असल्यामुळे तो पक्ष ग्रामीण भागात गेला. गावशाखेनंतर तालुका परिषद बांधली जाते. गावातील शाखा व जिल्हा शाखा यांमधील दुवा म्हणून तालुका परिषद काम करते. त्यानंतर जिल्हा परिषद येते. जिल्हा परिषदेवर पाठवावयाचे सदस्य जिल्ह्यातील सदस्य निवडतात. जिल्ह्याचा चिटणीस जिल्ह्याची परिषद निवडतो. राज्य परिषदेच्या प्रतिनिधीतून चिटणीसमंडळ निवडले जाते. चिटणीसमंडळावर जिल्ह्याचे चिटणीस पदसिद्ध सदस्य बनतात. पक्षाचा सभासद करून घेण्याचा अधिकार फक्त प्राथमिक शाखांना–म्हणजे गावातील पक्षशाखांना–ठेवला आहे. तिच्याशिवाय पक्षातील इतर कोणतीही शाखा नवा सभासद करून घेऊ शकत नाही. गावातील माणसाची माहिती गावशाखांना असते. त्याचा पक्षाच्या धोरणाला पाठिंबा आहे की नाही, यासारख्या गोष्टी गावशाखा माहिती करून घेतात व मगच त्याला पक्षसदस्य होता येते. गावशाखेने सदस्य केला तरी एकदम पूर्ण सदस्य बनता येत नाही. सहा महिन्याचा काळ नोकरीतील प्रोबेशनसारखा मानला जातो. गावशाखेने नवा सभासद नोंदवला की, तो सहा महिने 'उमेदवार–सदस्य' राहतो. सहा महिने त्याचे धोरणासंबंधी, कार्यक्रमाबाबतचे मत अजमावून पाहिले जाते, कामाबाबतची त्याची तयारी जोखली जाते. याच काळात उमेदवार–सदस्यालाही पक्षाच्या धोरणाचा आणि कामकाजपद्धतीचा परिचय होतो. उमेदवार सदस्याला पूर्ण सदस्यत्व द्यावयाचे किंवा नाही, हे जिल्हा शाखा ठरवते. पक्षाने ही पद्धती स्वीकारली असल्यामुळे शे. का. पक्ष केडर पार्टीत जमा होतो.

या पद्धतीने जेथे पक्षाने काम केले त्या जिल्ह्यात मातब्बर नेते पक्ष सोडून गेले तरी पक्ष जिवंत राहिला आहे. गावशाखामुळे गावातील लोकांशी पक्षाचा संपर्क साधला गेला व पक्षसदस्यांची संख्या इतर पक्षाप्रमाणे लाखांच्या घरात जाणारी नसली तरी झालेला सभासद ठोकूनठाकून तयार केलेला कार्यकर्ताच बनतो. इतर पक्ष पावती फाडून सभासदनोंदणी करतात. त्यामुळे त्यांच्या सभासदांची संख्या अधिक असली तरी लढ्याच्या वेळी हे सभासद मागेच राहतात किंवा सभासदसंख्येच्या मानाने फारच कमी सभासद होतात. □


**महाराष्ट्र काँग्रेसमधील पडद्यामागचे राजकारण !**

**यशवंतराव चव्हाण, कन्नमवार, वसंतराव नाईक,**

**शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील .......**

मुख्यमंत्री बदलत कसे गेले, त्यामागे काय गुप्त डावपेच चालू होते

याची एका जाणकार पत्रकाराने मिळविलेली

'आतील' माहिती !

**स त्ते चे मो ह रे**

**जगन फडणीस** : मूल्य १८ रुपये

**'ग्रंथाली' चे आणखी एक वेगळे प्रकाशन**

प्रकाशक : 'ग्रंथाली', अभिनव वाचक-चळवळ,

३४–९०२ नेहरुनगर, कुर्ला ( पूर्व ), मुंबई ४०० ०२४

विक्रेते : विक्रम वितरण, हरि निवास, शिवाजी पार्क,

मुंबई ४०० ०२८

## शे. का. पक्षाची वैचारिक भूमिका मांडणारा महत्त्वाचा दस्तऐवज

# दाभाडी प्रबंध : जनक कोण ?

स्वतंत्रपणे पक्षाची स्थापना केल्यानंतर शे. का. पक्षाचे दुसरे अधिवेशन मे १९५० मध्ये दाभाडी येथे भरले. या अधिवेशनात राजकीय प्रबंध मांडण्यात आला. तो 'दाभाडी प्रबंध' म्हणून ओळखला जातो. हा प्रबंध स्वीकारल्यामुळे शे. का. पक्षाने नवे वळण घेतले. प्रबंधात आतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिस्थिती, हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या चुका, शे. का. पक्षाचा जन्म व कार्य, समाजवादी पक्षाचे स्वरूप व त्याचे पुढील कार्य यांविषयी सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे. प्रबंध कोणी तयार केला, यासंबंधी बरेच प्रवाद आहेत. काहींच्या मते तो कम्युनिस्ट नेते श्री. व्ही. डी चितळे यांनी लिहिला. काहींना तो वसंतराव तुळपुळे याचा प्रबंध आहे, असे वाटते. शंकरराव मोरे, दाजीबा देसाई याचीही नावे घेतली जातात. भाऊसाहेब राऊत म्हणतात, 'शंकरराव मोरे यांचाच प्रबंधात हात होता. तो लिहिण्यापूर्वी त्यानी पक्षाच्या इतर नेत्यांशी चर्चा केली होती.' दाभाडी प्रबंधाचे बरेचसे श्रेय दाजीबा देसाई ते स्वत:, भाई सथ्या व वसतराव तुळपुळे याना देतात. 'शकरराव मोरे यांनीही प्रबंधासाठी फार श्रम घेतले, परंतु 'प्रबंधाचा सबंध मसुदा आम्ही (दाजिबा, भाई सथ्या, तुळपुळे) तयार केला. प्रिन्सिपॉल वैद्य यांनीही मदत केली; परंतु व्ही. डी. चितळे यांनी तो तयार केला, असे म्हणणे पक्षावर अन्याय करणारे होईल,' असे दाजीबा देसाई म्हणतात. प्रबंधाचा मसुदा तयार करण्यास तेरा दिवस लागले. दाभाडी अधिवेशनाच्या सुमारास चीनमध्ये शेतकऱ्यांची क्रांती झाली. शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्याना चीनमधील घडामोडीमुळे अधिकच उत्साह वाटू लागला. शेतकऱ्यांची क्राती यशस्वी होऊ शकते, हा त्यांचा विश्वास दुणावला. साहजिकच दाभाडी प्रबंधावर चीनच्या क्रांतीचाही प्रभाव पडला.

शे. का. पक्षाने मार्क्सवाद स्वीकारला. इतकेच नव्हे तर कम्युनिस्ट इटरनॅशनलचे मार्गदर्शन मान्य करण्याचे ठरवले. एका देशात दोन मार्क्सवादी पक्ष असू शकत नाहीत, असे कम्युनिस्टाचे तत्त्वज्ञान होते. त्यामुळे मार्क्सवाद मानणाऱ्या दोन पक्षांत मतभेद निर्माण झाले. दोन पक्षातील मतभेद समजून घेण्यासाठी रशियन कम्युनिस्ट पक्षाचे प्रतिनिधी दिल्लीमध्ये शंकरराव मोरे यांना भेटल्याचे काही जण सांगतात, परंतु त्याला दुजोरा मिळत नाही. शेतकऱ्यांची क्रांती करण्यास निघालेला पक्ष म्हणून चिनी कम्युनिस्ट पक्षानेही शे. का. पक्षाची माहिती घेतली होती, परतु हा पक्ष एका राज्यापुरता मर्यादित आहे, देशाच्या एखाद्या भागात उठाव करून क्रांती घडवून आणता येणार नाही, असे चिनी नेत्याचे मत होते. त्यामुळे चिनी कम्युनिस्ट पक्षानेही शे. का. पक्षाची दाद घेतली नाही. आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी रशियन व चिनी वकिलातीच्या मुंबईतील कार्यालयाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न शे. का. पक्षाच्या नेत्यांनी केला होता, अशी माहिती मिळते. शकरराव मोरे यांचा हा प्रयत्न होता, परंतु कम्युनिस्ट पक्षाने भारतातील पक्षांची माहिती आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट नेत्यांना दिल्यामुळे शे. का. पक्षाची त्यांनी दखलच घेतली नाही. या प्रकरणी शे. का. पक्षाचे संस्थापक नेते काहीसे हातचे राखून बोलतात.

कम्युनिस्टांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊन श्रमजीवी जनतेचे नेतृत्व केले, म्हणून शे. का. पक्षाने कम्युनिस्टांवर ठपका ठेवला. त्याप्रमाणेच समाजवादी पक्षालाही त्यांनी दोष दिला आहे. कम्युनिस्टांप्रमाणेच समाजवादी पक्षाच्या पुढारपणाने हिंदी लोकशाही लढ्याचा विचका केला आहे. समाजवादी पक्ष आरंभी स्वत:ला मार्क्सवादी मानत होता, पण त्याने कम्युनिस्ट इंटरनॅशनल व कॉमिनफॉर्मचे मार्गदर्शन मानले नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय परिस्थितीबाबतचे समाजवाद्यांचे निदान चुकत आहे. जगाची दोन गटांत विभागणी झाली आहे. एक गट साम्राज्यवाद्यांचा व दुसरा लोकशाहीवाद्यांचा आहे. रशिया दुसऱ्या गटात मोडतो, पण समाजवादी पक्ष रशियाला 'लाल साम्राज्यशाही' असे संबोधतो. समाजवाद्यांच्या या भूमिकेमुळे तो पक्ष अँग्लो–अमेरिकन साम्राज्यशाहीला मदतच करतो. मार्क्सवादाचा मूलभूत वर्गीय दृष्टिकोण समाजवादी पक्षाच्या पुढाऱ्यांना मान्य नाही. त्यामुळे कामगारवर्गाबद्दलचे त्यांचे धोरणही क्रांतीला विघातक आणि कामगारवर्गात फूट पाडणारे आहे. कामगारवर्ग जागृत करणे व सर्व लोकशाही मोर्चांवर त्याचे पुढारीपण प्रस्थापित करणे ही समाजवादी पुढाऱ्याची भूमिका नाही तर कामगारांची स्थिती सुधारणे, ही समाजवाद्याची भूमिका आहे. याचाच अर्थ हे पुढारीपण कामगाराचे नसून मध्यमवर्गीयांचे आहे. केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय कामगारांच्या एकजुटीत फूट पाडण्यासाठी अँग्लो–अमेरिकेने आपल्या ज्या हस्तक जागतिक कामगार संघटना निर्माण केल्या त्यानाही समाजवादी पुढारी पाठिंबा देत आहेत. त्यांच्याशी संघटनात्मक सहकार्य करीत आहेत, असे मूल्यमापन शे. का. पक्षाने दाभाडी प्रबंधात समाजवाद्यांविषयी केले आहे.

कम्युनिस्ट व समाजवादी यांना भारतीय राजकारणात अशा पद्धतीने शे. का. पक्षाने कुचकामी ठरविले आणि काँग्रेसच्या विरो-

धांत डावा पर्याय उभा करून पोकळी भरून काढण्याची ऐतिहासिक गरज आपल्यावर येऊन पडते, असे दाभाडी प्रबंधान्वये मानले. स्वतःविषयी दाभाडी प्रबंधात शे. का. पक्ष म्हणतो की, काँग्रेसमधील भांडवलदारी पुढारीपण ब्रिटिश साम्राज्यशाहीशी हातमिळवणी करण्याचे प्रतिक्रांतिकारक धोरण स्वीकारीत असताना हिंदुस्थानच्या क्रांतिकारक चळवळीमधील महाराष्ट्रातील क्रांतिकारक विभागाची प्रक्रिया म्हणजेच आपल्या पक्षाचा जन्म होय.

## शेकापचा लोकशाही क्रांतीचा कार्यक्रम

पक्षाने जन्मापासूनच मार्क्सवादी तत्त्वज्ञान स्वीकारले व ते लाखो श्रमजीवी जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले. कम्युनिस्ट पक्षाच्या चुकीच्या व राष्ट्रविरोधी आचारामुळे राष्ट्रप्रेमी जनतेच्या मनात मार्क्सवादाविषयी तटस्थता निर्माण झाली होती. ती दूर करून मार्क्सवादाविषयी आपण आस्था निर्माण केली, असा दावा शे. का. पक्षाने दाभाडी प्रबंधामध्ये केला आहे. इतकेच नव्हे तर हिंदुस्थानातील सर्व क्रांतिकारकशक्ती एकत्र करण्याच्या कामी पक्षाने अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे, सोशॅलिस्ट रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष शरश्चंद्र बोस यांच्या मदतीने अखिल भारतीय संयुक्त समाजवादी पक्षाची स्थापना करून आपण हिंदुस्थानात संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी पहिली क्रांतिकारक संयुक्त आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला, समाजवादी व कम्युनिस्ट पक्षांनी आपले धोरण बदलले नाही व त्यामुळे त्या पक्षांचा समावेश संयुक्त आघाडीत झालेला नाही, असे शे. का. पक्षाने दाभाडी प्रबंधात म्हटले आहे.

पक्षाच्या कार्याची दिशा काय राहील, याचे मार्गदर्शन दाभाडी प्रबंधाद्वारे करण्यात आले आहे. ते करीत असताना क्रांत्याचे तीन प्रमुख प्रकार सांगितले आहेत. ते सांगताना म्हटले आहे की, निरनिराळ्या देशांत कामगारवर्ग ज्या भिन्न परिस्थितीत व भिन्न मार्गाने आपली हुकूमशाही प्रस्थापित करील त्याची स्थूल मानाने तीन प्रकारात विभागणी करता येईल. १ : भांडवलशाहीचा विकास उच्च अवस्थेला पोचला आहे असे देश. (उदा. अमेरिका-ब्रिटन). २ : भांडवलशाहीचा मध्यम विकास झालेले देश (पोलंड-पोर्तुगाल) व ३ : जेथे उद्योगधंद्याची नुकतीच सुरुवात झाली आहे व काही ठिकाणी त्याचा विकासही झाला आहे असे वसाहती व निमवसाहती देश (हिंदुस्थान-चीन). असे क्रांत्याचे तीन प्रकार शे. का. पक्ष मानतो. हा प्रबंध तयार करून सत्तावीस वर्षे झाली; पण त्यात थोडा सुद्धा फेरफार करण्याची आवश्यकता आहे, असे शे. का. पक्ष मानीत नाही.

लोकशाही क्रांतीसाठी शे. का. पक्षाने पंधरा कलमी कार्यक्रम आखला आहे. त्यात प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क, खाजगी धंद्यांच्या नफ्यावर नियंत्रण, नोकरशाही नष्ट करून त्यांच्या जागी निवडल्या जाणाऱ्या व त्यांना परत बोलावण्याचा अधिकार जनतेला राहील अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करणे, सर्वांना शस्त्रे वापरण्याचा हक्क देणे व जनता लष्कराची निर्मिती आदीवर भर देण्यात आला होता. कॉमिनफॉर्मने नोव्हेंबर १९४९ मध्ये केलेल्या मार्गदर्शनात म्हटले आहे की, एकजुटीने साम्राज्यशाहीचे नवे युद्धधोरण हाणून पाडण्यासाठी पूर्वी नव्हती एवढी कामगार एकजुटीची आवश्यकता आहे. हे कर्तव्य केवळ कम्युनिस्ट पक्षानेच नव्हे, तर कामगार पक्ष, समाजवादी पक्षातील डावे गट यांचेही आहे, यावर भर दिला होता. शे. का पक्ष कॉमिनफॉर्मचे मार्गदर्शन मानीत असल्यामुळे त्याने कामगारवर्गाची एकजूट घडवून कामगारांच्या प्रश्नासाठी लढे उभारले पाहिजेत, असा कार्यक्रम आखला. समाजवादी, कम्युनिस्ट व शे. का. पक्ष या तीन पक्षाच्या पुढारीपणाखाली असणाऱ्या कामगाराची एकजूट कामगाराच्या लढ्यातून होईल, असे सांगण्यास शे. का. पक्षाने प्रारंभ केला. दाभाडी प्रबंधामध्ये कामगाराच्या एकजुटीबाबत ही भूमिका स्वीकारल्यानंतरही शे. का. पक्षाने कामगार आघाडीवर फारसे काम केले नाही. सोलापूरच्या कामगारांची संघटना शे. का. पक्षाकडे होती; परंतु तेथे कम्युनिस्टांची संघटना काम करीत होती. आदर्शापोटी शे. का. पक्षाने आपली बहुसंख्य कामगारांची संघटना कम्युनिस्ट पक्षाच्या दावणीला बांधली. एका धंद्यात एक संघटना, हे तत्त्व स्वीकारून शे. का. पक्षाची कामगार संघटना सोलापूरमध्ये कम्युनिस्टांबरोबर काम करू लागली. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. शे. का. पक्षाचे कामगार चळवळीत असलेले स्थान सोलापुरात नाहीसे झाले.

शेतकरी कामगार पक्षाने दाभाडी प्रबंधामध्ये कामगार-चळवळी-संबंधी चर्चा केली असली तरी त्यात कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे कामगारच क्रांती करू शकतो, ही भूमिका नाही. चीनमधील घटनांचा तो परिणाम आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पक्षाने अधिक जोर दिला आहे. कामगाराप्रमाणे शेतकरीवर्ग एकजिनसी वर्ग नाही. त्याचे निरनिराळे थर आहेत. शे. का. पक्षाने शेतकऱ्याचे चार थर सांगितले आहेत. १ : शेतमजूर; २ : गरीब शेतकरी, ३ : मध्यम शेतकरी, ४ : श्रीमंत शेतकरी. असे चार थर सांगून त्यांची व्याख्या केली आहे. स्वतःजवळ शेती नसलेला व केवळ दुसऱ्याच्या शेतीवर मजुरी करून पोट भरणारा शेतमजूर आहे. त्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असून शेतकऱ्यांतील हा सर्वांत क्रांतिकारक थर शे. का. पक्षाने मानला आहे. शेतमजूर व शेतकरीवर्ग एकमेकाचे काहीसे विरोधक असल्याने शेतमजुरांच्या स्वतंत्र संघटना केल्या पाहिजेत, असे पक्षाने म्हटले आहे.

शेकापने शेतमजूर सर्वांत क्रांतिकारक थर असल्याचे म्हटले आहे, परंतु पक्षाने शेतमजुराच्या संघटना बांधण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसत नाहीत. शेतमजुराच्या संघटना बांधण्यास गेलो तर संघटित होऊ लागलेला शेतकरीवर्ग दूर जाईल ही भीती पक्षाच्या नेत्यांना असावी. शेतमजुराच्या संघटना बांधण्याच्या प्रश्नावर शेकाप-मध्ये वाद होता. दत्ता देशमुख, बापूसाहेब लाड वगैरेंना शेतमजुरांच्या संघटना बांधल्या पाहिजेत असे वाटत होते व दत्ता देशमुख आणि त्यांच्या गटाने शेतमजुराच्या संघटना बांधण्यास सुरुवातही केली होती. शेतमजुरांच्या मागण्या घेऊन उभे राहिलो तर शेतकरी-वर्गाच्या हिताविरुद्ध ते जाणार होते. एकाच गटात मोडणाऱ्या दोन पोटगटांचे हितसंबंध परस्परांना छेद होते.

गरीब शेतकरी हा शेतीव्यवसायावर पोट भरत नाही म्हणून काही काळ मजुरी करतो. शेतमजुरानंतरचा हा क्रांतिकारक थर मानला. मध्यम शेतकरी शेतीवर आपल्या कुटुंबाचे पोषण करतो. मध्यम शेतकरी व शेतमजूर यांचे संबंधही विरोधी असतात. मध्यम शेतकऱ्याने शेतमजुराच्या पाठीमागे उभे राहण्यातच मध्यम शेतकऱ्याचे

हित आहे, असे शेकाप म्हणतो. श्रीमंत शेतकरीवर्गाचे पुढारीपण शेतकरी चळवळीला घातक ठरणारे असते म्हणून श्रीमंत शेतकरी वर्गाचे पुढारीपण नष्ट करणे जरूर आहे, असे शेकापने दाभाडी प्रबंधात मानले आहे.

## कामराजांचा अभिप्राय

शेतमजूर हा क्रांतिकारकाचा सर्वांत खालचा थर मानला असला तरी शे. का. पक्षाने त्यांच्या प्रश्नासाठी आंदोलने उभारल्याचे अभावानेच दिसते. शेतमालाला किफायतशीर किंमती मिळाल्या पाहिजेत या प्रश्नावर शेकापने आंदोलने केली आहेत. प्रखर चळवळी केल्या. त्यांच्यामुळे महाराष्ट्रात शेतमालाला किफायतशीर किंमती मिळण्याच्या दृष्टीने सरकारी पातळीवर (महाराष्ट्रात) हालचाली सुरू झाल्या आहेत. आपल्या हातातून शेतकरीवर्गाचा पाठिंबा जाऊ नये, त्याचप्रमाणे शेतीव्यवसायात मोठ्या प्रमाणावर असलेल्या वर्गाची सहानुभूती मिळावी, म्हणून कांग्रेस सरकारनेही शेतमाल-किंमत समिती नेमून शेतमालाच्या किमतीसंबंधी विचार करण्यास सुरुवात केली. या समितीने निर्णय असा घेतला नाही; परंतु त्यातूनच एकाधिकार कापूस खरेदीसारख्या शेतकऱ्याला चांगले भाव देणाऱ्या योजना जन्मास आल्या. शेतमाल किंमतीचा प्रश्न ज्या पोटतिडकेने शेकापने धसास लावण्याचा प्रयत्न केला तसा शेतमजुरांच्या मागण्यां-संबंधी प्रयत्न केलेला नाही. उद्धवराव पाटील म्हणतात, '१९७२ च्या दुष्काळानंतर शेतमजूर, लहान शेतकरी यांना संघटित ताकदीच्या जोरावर काम मिळवून दिले. त्याकरता निदर्शने केली. पक्षाने संघर्ष केला. आंदोलने केली. तसेच या प्रश्नावर विधानसभेचे कामकाजही बंद पाडले आहे.' १९७२ पूर्वी शेतमजुरांसाठी आंदोलन केले आहे असा उल्लेख उद्धवरावांच्या मुलाखतीत आलेला नाही.

कामगारांत जागृती येऊन तो संघटित होऊ लागला; परंतु शेत-करीवर्ग संघटित झालेला नाही. शेकापमुळे शेतकरी वर्ग संघटित होण्याचा प्रयत्न करू लागला; किंवा संघटित होण्याचा विचार शेतकरीवर्गात सुरू झाला त्याचे श्रेय शेकापलाच द्यावे लागेल. शेतकरीवर्ग नुकता कोठे संघटित होण्याचा विचार करू लागला आहे. अशा वेळी शेतमजूर संघटित करून त्यांच्या मागण्या मांडू लागलो तर शेतकरीवर्ग बाजूला जाईल या विचारामुळे शेकापने शेतमजु-रांच्या संघटना बांधण्याचा विचार बाजूला केला, असे समीकरण मांडता येईल. शेतमालाच्या किंमतीचा आग्रह व शेतमजुराच्या संघटनांना दिलेले गौण स्थान यामुळेच शेकापला जमीनदारांचा पक्ष या आरोपांचा धनी व्हावे लागले आहे. शेकाप हा जमीनदाराचा पक्ष आहे, या आरोपाला उत्तर देताना पक्षाचे नेते दाजीबा देसाई, एन्. डी. पाटील, उद्धवराव पाटील आदी म्हणतात, 'आमचा पक्ष जर जमीनदारांचा असता तर महाराष्ट्रात जमिनीची कमाल मर्यादा १००–१५० एकर होती तेव्हा एक कुटुंब कसू शकेल एवढीच जमीन-धारणा असावी व कोरडवाहू जमिनीबाबत कमालमर्यादा चोपन्न एकरांची असावी, अशी मागणी आम्ही केली नसती!'

एन्. डी. पाटील या आरोपासंबंधी थोडे अधिक आक्रमक होतात. 'आमचा पक्ष जमीनदाराचा म्हटले जाते, पण सध्याच्या कमाल-धारणेएवढी जमीन असलेला एक माणूस आमच्या पक्षात असेल तर दाखवून द्यावा. उद्धवराव पाटील यांच्याजवळ आमच्या पक्षात सर्वांत जास्त जमीन आहे आणि त्यांच्याजवळ असलेली जमीन तीस एकर आहे. म्हणजे कमाल धारणेच्या निम्मी म्हणता येईल. तरीही आमचा पक्ष जमीनदारांचा म्हणणार? पक्षाच्या नेत्यांजवळ पाच-दहा एकरां-पेक्षा अधिक जमीन नाही. तरीही आमच्या पक्षाला जमीनदारांचा पक्ष म्हणणार? बागायतीसाठी अठरा एकरांची कमालमर्यादा ठेवण्यात आली आहे ती नऊ एकरांवर आणली पाहिजे, ही आमची मागणी आहे. ती काय आमचा पक्ष जमीनदारांचा आहे म्हणून?' असा प्रश्न एन्. डी. पाटील करतात.

'कांग्रेसमध्ये विशिष्ट वर्गाचे नेतृत्व होते, ते झुगारून शेकाप बाहेर पडला, तेव्हा वड्या जमीनदारांत मोडणारे काही जण आमच्या पक्षात आले होते; परंतु आम्ही 'कसेल त्याची जमीन' ही भूमिका घेतली तेव्हा हे लोक कांग्रेसमध्ये गेले,' असे बापूसाहेब लाड म्हणतात.

जातिवादाचा आरोप खोडून काढताना दाभाडी प्रबंध म्हणतो, 'शेकापपासून मध्यमवर्गातील ब्राह्मण जातीच्या लोकांना बाजूला ठेवण्यासाठी भांडवलदार, सरजामदार यांच्या हस्तकांनी आपल्या पक्षावर जातिवादी पक्ष किंवा ब्राह्मणांचा द्वेष करणारा पक्ष, असा आरोप केला आहे. भांडवलशाहीपूर्व पिळवणुकीवर आधारलेल्या, धर्मामुळे प्राप्त झालेल्या जातीय श्रेष्ठतेमुळे ब्राह्मणजातीतील मोठा विभाग इतर जातींना कमी लेखून स्वत:च्या मोठेपणाच्या अहंकाराने भरलेला आहे. हा अहंकार त्यांनी सोडून दिला पाहिजे. आजच्या जगात जातीय श्रेष्ठत्वाच्या कल्पना उराशी बाळगून ब्राह्मणवर्गातील हे लोक आपला घातच करून घेत आहेत. या वर्गाच्या जातीय श्रेष्ठ-त्वाच्या कल्पनेवर हल्ला करणे म्हणजे काही ब्राह्मणांचा द्वेष करणे नव्हे. धर्म आणि जन्म यामुळे निर्माण होणारी जातीयता संपूर्णपणे बाजूला ठेवून सर्व कामगार, शेतकरी, गरीब व मध्यमवर्ग यांची एकजूट होण्यावरच लोकशाही क्रांतीचे यश अवलंबून आहे.'

दाभाडी प्रबंधाचे तत्त्वज्ञान पक्ष नेतृत्व सामान्य माणसाच्या गळी उतरवण्यास असमर्थ ठरले आहे, असे म्हणता येईल. पक्षाने केलेले विवेचन, दृष्टिकोण शास्त्रीय आहे. शेकापमुळे मार्क्स, लेनिन यांची नावे सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोचवणे, शेतकऱ्यांना संघटित करणे ही कामगिरी निश्चितच केली आहे. सत्ता हाती नसताना समाजामध्ये आमूलाग्र सुधारणा करता येणार नाहीच! शेकापने शेतकरीवर्ग संघटित केल्याचा प्रभाव कांग्रेसचे अध्यक्ष के. कामराज यांच्यावरही पडला होता. कांग्रेसमध्ये गेलेले तुळशीदास जाधव यांच्याजवळ १९६५ मध्ये कामराज शेकापबद्दल जे म्हणाले ते कामराजांच्याच शब्दांत –कामराजांच्या इंग्रजीत देण्यासारखे आहे. कामराज म्हणाले होते–

'युवर महाराष्ट्र पीझंट वर्कर्स पार्टी गायडेड अस. शोड ए वे हाऊ टू गो इन द व्हिलेजेस अँड ब्रिंग द लीडरशिप फ्रॉम देम. वुई वर्ड ऑलसो डिड लाइक दॅट वर्क.'

कामराज याना इंग्रजी येत नव्हते. त्यांच्या कर्तृत्वाला भाषेमुळे मर्यादा पडल्या नव्हत्या. कामराजांच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की– तुमच्या महाराष्ट्रातील शेकापक्षाने खेड्यापाड्यापर्यंत कसे जावे आणि त्या जनतेतून नेतृत्व कसे निर्माण करावे याचा मार्ग आम्हाला दाखवला आहे. आम्ही (कांग्रेसने) सुद्धा तसेच काम केले पाहिजे.

'शेतमजुराच्या वेतनाकरता आंदोलन करण्याची वेळ आली

नाही. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या शेतमजुरांचे संबंध गावातल्या समाजाच्या इतर वर्गात गुंतले आहेत.' असे सांगून दाजीबा देसाई म्हणतात, 'श्रीमंत शेतकऱ्याची शेती शेतमजुरावर चालते. मध्यम शेतकरी स्वत: शेती करतो, त्याचबरोबर तो शेतमजूरही लावतो. शेतमजुरांमध्ये स्पृश्य व अस्पृश्य असेही वर्ग आहेत. त्यामुळे शेतमजुरांच्या संघटना बांधू लागलो किंवा त्यांचे आंदोलन उभारू लागलो की, सामाजिक कारणामुळे शेतमजुरांमध्ये फूट पडते व चळवळीला आधार राहात नाही. याच कारणामुळे शेतमजुरांच्या रोजगाराचा प्रश्न रोजगार हमी योजनेमुळे धसास लागला. गावातील शेतमजुरांमध्ये भांडणे न होता प्रश्न सुटू शकेल. रोजगार हमी योजनेवर शेतमजुराला तीन रुपये मजुरी मिळू लागली की, ते रोजगार हमी योजनेवर कामे करतील आणि शेतीच्या कामावर त्यांची गरज पडेल तेव्हा तीन रुपये मजुरी शेतकरी देतील तरच शेतमजूर शेतीच्या कामावर येतील. म्हणून आमचा भर रोजगार हमी योजनेवर आहे.'

'रोजगार हमी योजनेमार्फत शेतीची सर्व कामे हातात घेण्याची यंत्रणा उभी केली पाहिजे. ही यंत्रणा खाजगी शेतीवरील कामे सुरू करील तेव्हा शेतकरी व यंत्रणा यांच्यात मजुरीसंबंधी करार होतील आणि शेतमजुरांतील स्पृश्य-अस्पृश्य असा भेद करून शेतकऱ्यांना मजुरांना नाडवता येणार नाही. त्याचप्रमाणे शेतमजुरांत सामाजिक परिस्थितीमुळे आपापसात संघर्ष होणार नाही व त्यांच्यात एकी राहील. यासाठीच शेतीचा विकास करण्यापासूनची सर्व कामे वर म्हटल्याप्रमाणे यंत्रणेमार्फत करून घेतली पाहिजेत, असे दाजीबा देसाई म्हणतात.

रोजगार हमी यंत्रणेनंतरच टप्प्याटप्प्याने सहकारी शेतीचे उद्दिष्ट अंमलात येण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे शे. का. पक्षाला वाटते. त्यासंबंधी खुलासा करताना देसाई यांनी असे सांगितले की, 'शेतकरी व शेतमजूर यांना जगण्याचे हमखास साधन उपलब्ध केल्यावर जमीनमालकीचा प्रश्न दुय्यम होईल. नव्याने संघटित होऊ लागलेला शेतकरीवर्ग बिथरेल, या भीतीपोटी शेकापने शेतमजूर संघटना बांधल्या नाहीत, हा निष्कर्ष यातून निघू शकतो. समन्वय टाळून वर्गसंघर्षाचा सिद्धांत जोपासणाऱ्या पक्षाने शेतकरी व शेतमजूर यांच्यातील वर्गसंघर्ष टाळूनच वाटचाल करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो किंवा असे म्हणता येईल की, या दोन परस्पर विरोधी हितसंबंध असलेल्या वर्गांचा समन्वय साधण्याची तारेवरची कसरत शेकापने केली आहे. या कसरतीचा परिणाम असा झाला की, शेकापक्ष जमीनदारांचा पक्ष आहे' हा आरोप होऊ लागला. इतर राजकीय पक्षात बडे जमीनदार-बागायतदार असताही त्या पक्षावर समन्वय जमीनदाराचा पक्ष आहे, हा आरोप सिद्ध झालेला नाही. १९६० नंतरच्या काळात, काही प्रमाणात बागायतदारांचा पक्ष, अशी टीका कॉंग्रेसवर केली जाऊ लागली.

वर्गसंघर्ष शे. का. पक्षाने अभिप्रेत धरला आहे. म्हणूनच समन्वय साधणाऱ्या भूदान-आंदोलनाला त्यांचा विरोध राहिला. तेलंगणमधील शेतकऱ्यांच्या उठावामुळे देशात वातावरण निर्माण होऊ लागले होते. त्याच वेळी विनोबांनी भूदानाची कल्पना मांडली. भूमिहीन-लहान शेतकरी यांच्या चळवळीमुळे सरंमजामशाहीला धक्का बसला; परंतु आपली थोडीबहुत जमीन-तीही निकृष्ट प्रकारची-देऊन जमीनदारांना विनोबांच्या चळवळीने सन्मानाने गावात आणून बसविले आहे. भूदान हे संघर्ष टाळणारे साधन ठरले. जमिनीचे प्रश्न दानासारख्या मार्गाने सुटणार नाहीत, ही शेका पक्षाची भूमिका आहे. विनोबांच्या भूदान आंदोलनाला शे. का. प. चा प्रथमपासून विरोधच होता. त्यातच संयुक्त महाराष्ट्रविरोधी भूमिका घेऊन विनोबा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले. महाराष्ट्राचे सारे वातावरण संयुक्त महाराष्ट्रमय झाले होते. विनोबाविषयी लोकांचा आदर कमी कमी होऊ लागला होता. विनोबा कोल्हापूरला आले तेव्हा शे. का. पक्ष कार्यकर्त्यांनी त्यांना प्रखर विरोध केला. वि. स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली काही विद्यार्थ्यांनी विनोबांचा विद्यार्थी मेळावा आयोजित केला म्हणून शे. का. पक्ष कार्यकर्त्यांनी त्यांना मारहाणही केली होती. विनोबांची कुस्त्याच्या मैदानात सभा आयोजित केली. तीमध्ये शे. का. कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. विनोबांना प्रथम 'सरकारी संत' म्हटले गेले ते याच वेळी! सभेत गोंधळ सुरू झाल्यानंतर काही कार्यकर्त्यांनी विनोबाची टर उडविण्याचा प्रयत्न करून 'विनोबा लावणी म्हणा!' अशा घोषणा करण्यास सुरुवात केली. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या निमित्ताने शे. का. पक्षाने विनोबांच्या भूदानाला विरोध संघटित केला. जमीनदाराची जमीन जाऊ नये म्हणून शे. का. पक्षाचे विनोबाविरोधी आंदोलन आहे, असे समाजवादी पक्षातून भूदान चळवळीत गेलेले काही नेते म्हणत होते. शे. का. पक्ष जमीनदारांचा पक्ष आहे, ही भावना इतर पक्षामध्ये आजही कायम आहे. शे. का. पक्षाने शेतमजुरांच्या संघटना उभ्या केल्या नाहीत असे म्हणणाऱ्या इतर पक्षांनी या संघटना कोठे बांधल्या आहेत, हा प्रश्नही आहेच. अपवाद करावा लागेल तो लाल निशाण पक्षाचाच!

—जगन फडणीस


एक खळबळजनक
नवीन पुस्तक


महाराष्ट्रातील शे. का. पक्षाच्या राजकारणावरील
मराठीतील प्रथमच

**शेकाप**

**जगन फडणीस**

मेहता पब्लिशिंग हाउस-पुणे

प्रमुख वितरक : अजब पुस्तकालय, कोल्हापूर
मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे



भारतीय शेतकरी कामगार पक्ष

# निवडणूक जाहीरनामा

महाराष्ट्र विधानसभेची आगामी निवडणूक अनन्यसाधारण महत्त्वाची आहे. केंद्र सरकारमध्ये गेली तीस वर्षे सत्तेची मिरासदारी मिरविणाऱ्या काँग्रेस पक्षाचा लोकसभा निवडणुकीत भारतीय जनतेने प्रचंड पराभव केला आहे. लोकशाहीचे सर्वसामान्य सकेत पायदळी तुडविणाऱ्या आणि खंडप्राय देशाचे एका प्रचंड तुरुंगात रूपांतर करणाऱ्या काँग्रेसला जनतेने धूळ चारली आहे. काँग्रेस पक्षाचा कधी पराभव होणारच नाही, असा रूढ झालेला एक समजही जनतेने निपटून काढला आहे.

तोंडाने समाजवादाच्या घोषणा, परंतु प्रत्यक्षात मात्र भांडवलदारी–जमीनदारी हितसंबंधाचे संरक्षण नि संवर्धन करणाऱ्या, तसेच सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराला आणि लाचारीला खत-पाणी घालणाऱ्या काँग्रेस पक्षाचे मायावी स्वरूप हा जनतेच्या विकासाच्या मार्गातील भला मोठा अडसर ठरलेला आहे. श्रमजीवी आणि मध्यमवर्गीय शक्तींची निकोप वाढ होण्याच्या दृष्टीने काँग्रेस पक्षाचा पराभव होणे ही एक ऐतिहासिक गरज होती. अशा स्थितीत केंद्राच्या ठिकाणी काँग्रेसचा पराभव झाल्यामुळे एका महत्त्वाच्या प्रक्रियेचा प्रारंभ झाला.

या प्रक्रियेची परिणती विधानसभांच्या निवडणुकांतही काँग्रेसचा पराभव होण्यातच झाली पाहिजे. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून मध्यंतरी दहा राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्येही जनतेने काँग्रेसला संपूर्णतया झिडकारलेले आहे. आता उरलेल्या विधानसभा निवडणुकांतही काँग्रेसचा पराभव होण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रातील लढाऊ जनता काळाचे आणि इतिहासाचे हे आव्हान मोठ्या हिमतीने स्वीकारील, अशी आमची उमेद आहे.

केंद्र शासनामध्ये काँग्रेसचा पराभव झाल्यामुळे जनतेला लोकशाही हक्कांचा लाभ झाला आहे. काँग्रेस राज्यकर्त्यांनी जनतेची अभूतपूर्व मुस्कटदाबी केल्यामुळे दैनंदिन आर्थिक लढे लढविणे अशक्य झाले होते. असंख्य शेतकऱ्यांच्या घरा-दारांवर जप्त्या आणून काँग्रेस सरकारने त्यांची भांडी-कुंडी जप्त केली. त्यांच्या अब्रूचे धिंडवडे काढले. आणीबाणीमुळे शेतकरीवर्ग या अन्यायाचा संघटित प्रतिकार करू शकला नाही. अपुऱ्या शेतमजुरीमुळे उपासमारीच्या छायेत जीवन कंठणाऱ्या शेतमजुरांचीही तीच गत झाली. ले–ऑफ, टाळेबंदी, सक्तीची बचत व सर्वांत कळस म्हणून बोनसबंदीचा हल्ला कामगारवर्गावर करण्यात आला. तथापि कामगारवर्गही हा हल्ला परतवून

लावण्यासाठी आवश्यक तेवढ्या संघटितपणे प्रतिकार उभारू शकला नाही. कॉंग्रेसचा पराभव झाल्यामुळे आणीबाणी रद्द झाली. भांडवलदारी–जमीनदारीविरुद्ध कराव्या लागणाऱ्या लढ्याला आता अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. लोकसभेच्या निवडणुकीतील ही फार मोठी कमाई आहे.

कॉंग्रेसचा पराभव झाला असला तरी त्यामुळे तिचे स्वरूप मात्र मुळीच बदललेले नाही. महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षाला स्वतःची अशी चेहेरेपट्टी नाही. या बोटावरची थुकी त्या बोटावर करूनच सिंडिकेटच्या गोटातून रातोरात इंडिकेटच्या गोटात आश्रयाला धावणारी ही मंडळी ! महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्ष तोंडाने शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या हितासाठीच सत्ता राबविण्याची भाषा बोलत असला तरी त्यांचा तो दावा पोकळ आहे; कारण नेमकी हीच भाषा गेली तीस वर्षे ते एकसारखे बोलत आले आहेत. प्रत्यक्षात मात्र शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या मुलाबाळांच्या तोंडात माती कालवून भांडवलदार आणि सटोडिये यांच्या तिजोऱ्या भरण्याचेच पुण्यकर्म महाराष्ट्र कॉंग्रेसने केले आहे. ग्रामीण नेतृत्व निर्माण केल्याचा त्यांचा दावा देखील असाच खोटा आहे. ग्रामीण जनतेच्या नावावर मूठभर बड्या बागायतदारांचे आणि हितसंबंधी टोळक्यांचे पुढारीपण त्यांनी जोपासले आहे. त्यांच्या जोडीला सहकारी साखर कारखाने व इतर संस्थांच्या मार्फत महाराष्ट्र कॉंग्रेसने ग्रामीण जनतेच्या मानेभोवती आपली पकड घट्ट केली आहे.

सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला गती देऊन जातीपातीच्या राजकारणाला मूठमाती देण्याची गरज असताना श्री. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र कॉंग्रेसने जातीपातीचा वापर आपल्या क्षणिक राजकारणासाठी केला. आजही ते निरनिराळ्या स्वरूपात जातीय भावनांना खत-पाणी घालत आहेत. श्री. यशवंतराव मोहिते छन्न स्वरूपात, तर श्री. यशवंतराव चव्हाण प्रच्छन्न स्वरूपात ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाच्या शिळ्या कढीला ऊत आणीत आहेत. निवडणुकीच्या होळीवर अनेक मंगल मूल्यांचा बळी देताना त्यांना कसलीही खंत वाटलेली नाही.

महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे हे व्यवच्छेदक स्वरूप लक्षात घेता तिचा पाडाव करण्यासाठी व्यापक लोकशाही आघाडी उभारण्याची नितांत गरज आहे. त्याच दृष्टीने शेतकरीकामगार पक्ष, जनता पक्ष, कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे विभाग), रिपब्लिकन पक्ष (कांबळे विभाग), महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस, कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी–लेनिनवादी) वगैरे शक्तींचा मोर्चा बांधण्याचा निर्णय आम्ही घेत आहोत. आमची ही आघाडी कॉंग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्यामध्ये यशस्वी होईल, अशी आमची खात्री आहे.

आगामी निवडणुकीत कॉंग्रेसचा पाडाव करून सत्ता काबीज करण्याचे व सत्तेवर आल्यानंतर खाली नमूद केलेले धोरण अंमलात आणण्याचे व त्या धोरणाशी सुसंगत असा कार्यक्रम पार पाडण्याचे वचन आम्ही महाराष्ट्रातील जनतेला देत आहोत.

या जाहीरनाम्याच्या पहिल्या भागात केंद्र शासनाच्या कक्षेत असलेल्या काही महत्त्वाच्या प्रश्नांबाबत आम्ही कोणत्या धोरणाचा आग्रह धरू इच्छितो, त्याचे सूत्ररूपाने विवेचन करीत आहोत. आर्थिक धोरणाशिवाय कोणत्याही राजकारणाला आशय प्राप्त होत नसतो. केंद्र शासनाच्या कक्षेत येणाऱ्या परंतु जनतेच्या भवितव्याशी निगडित असणाऱ्या काही प्रश्नांबाबत आम्ही आमची भूमिका स्पष्ट करणे जरूर आहे.

# भाग पहिला

## महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्न

भाषिक तत्त्वावर राज्यांची फेररचना करण्याच्या धोरणातून हा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र–मध्यप्रदेश यांच्या दरम्यानही असाच प्रश्न भिजत पडला आहे. ज्या केंद्रशासनाने भाषिक राज्य निर्माण केली त्यांनीच हे शेष प्रश्न सोडविणे जरूर होते. त्यांचीच ती जबाबदारी होती; परंतु संबंधित राज्य सरकारांनीच एकत्र येऊन परस्पर समझोत्याने हा प्रश्न सोडवावा अशी भूमिका घेऊन त्यांनी हा प्रश्न सोडविला नाही. महाराष्ट्र कॉंग्रेसने तर गेल्या एकवीस वर्षांत एकदाही या प्रश्नावर आग्रही आणि अस्मितानिदर्शक भूमिका घेतली नाही ही संतापजनक घटना आहे. स्वतःच्या पक्षीय स्वार्थापायी दहा लाख मराठी भाषिक जनतेच्या लोकशाही हक्कांची पायमल्ली करून गेली एकवीस वर्षे कॉंग्रेसने हा प्रश्न केवळ कुजत टाकला आहे. या प्रश्नावर काहीएक बोलण्याचा हक्क त्यांना राहिलेला नाही. खेडेगाव हा घटक धरून, १९५१ ची खिरगणती पायाभूत मानून भाषिक बहुसंख्या व भौगोलिक सलगतेच्या तत्त्वावर हा प्रश्न त्वरित सुटावा, म्हणून आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करू.

## राज्यांची स्वायत्तता

कॉंग्रेसच्या राजवटीत घटक राज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांसारखे दुय्यम स्वरूप प्राप्त झाले आहे. बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीतील काही तरतुदींनी तर राज्यांची स्वायत्तता धोक्यात आली आहे. संघराज्याच्या संकल्पनेमध्ये अभिप्रेत असलेल्या राज्याराज्यांच्या स्वायत्ततेचा संकोच होत आला आहे. विकास कार्यक्रमासाठी व आर्थिक मदतीसाठी राज्यांना फार मोठ्या प्रमाणावर केंद्र शासनावर अवलंबून राहावे लागत आहे. नियोजनाच्या आखणीमध्ये तसेच कार्यवाहीमध्ये सामान्य जनतेची परिणामकारक भागीदारी साधण्याच्या दृष्टीने राज्याची स्वायत्तता साकार करण्यासाठी आम्ही ठोस पाऊल उचलू.

करपद्धतीची फेररचना करून केंद्र शासन व राज्य शासन यांना राष्ट्राच्या उत्पन्नाचा रास्त हिस्सा मिळावा म्हणून प्रयत्न करू.

## औद्योगिक धोरण

समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये उत्पादनाच्या साधनांची मालकी हा एक अव्वल दर्जाचा प्रश्न ठरतो. सार्वजनिक मालकी क्षेत्राचा विस्तार सातत्याने होत राहील व हे क्षेत्र खऱ्याखुऱ्या अर्थाने जनतेला जबाबदार राहील, अशा दृष्टीने त्यांच्या व्यवस्थापनाची फेररचना केली जाईल. कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी ज्या पद्धतीने या क्षेत्राची अमल-

बजावणी केली त्यामुळच सार्वजनिक मालकी क्षेत्रातील उद्योगधंद्यांची बदनामी करण्याची संधी प्रतिक्रियावाद्यांना मिळत आहे. या क्षेत्राचा लाभ मात्र खाजगी उद्योगपतीच उठवीत आले आहेत. खाजगी उद्योगपतींना औद्योगिक कच्चा माल, वीज वाहतुकीच्या व इतर सेवा स्वस्तात स्वस्त दराने पुरविण्याची व त्यांच्या सेवेत बटीक म्हणून राबण्याचीच कामगिरी काँग्रेस राज्यकर्त्यांनी सार्वजनिक मालकी क्षेत्रातील उद्योगधंद्यांवर टाकली होती. येथून पुढे या क्षेत्रातील उद्योगधंद्याचा वापर शेतीक्षेत्राला, छोटया उद्योगधंद्यांना व पर्यायाने बहुसंख्य जनतेच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाला गती देण्यासाठीच केला जाईल, यासाठी आम्ही आग्रही राहू.

उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून औद्योगिक परवाने देण्याचे धोरण राबविले जाईल. भांडवलदारी समाजव्यवस्थेत विषम पद्धतीने आर्थिक विकास घडत असतो. असमतोल निर्माण होत असतात. निरनिराळ्या कारणास्तव निर्माण झालेले असमतोल दूर करण्यासाठी निग्रहपूर्वक व पद्धतशीर रीतीने प्रयत्न केला जाईल.

बड्या व मक्तेदार औद्योगिक घराण्यांना अगर त्यांच्या नातेवाईकाना छोटया उद्योगधंद्यांत कोणत्याही परिस्थितीत प्रवेश मिळता कामा नये.

उपभोग्य वस्तूचे उत्पादन करण्याचे कार्यक्षेत्र हे छोटया उद्योजकानाच अग्रहक्काने उपलब्ध केले जाईल. तसेच समाजातील दुर्बल घटकांना या क्षेत्रात पुरेसा वाव मिळावा आणि बड्या औद्योगिक घराण्याना या क्षेत्रात घुसघुस घालण्याची संधी मिळू नये म्हणून कूळकायद्यात अगर शेतजमीन धारणा कमाल मर्यादा कायद्यात जी कुटुंबाची व्याख्या करण्यात आली आहे, ती व्याख्या इतर क्षेत्रासाठीही लागू करण्यात यावी.

राष्ट्रीकृत बँकाकडून केल्या जाणाऱ्या एकूण कर्जवाटपापैकी किमान दहा टक्के रक्कम सुशिक्षित बेकार तरुणांच्यासाठी राखून ठेवण्यात यावी.

आपल्या गरजा भागविण्यासाठी छोटया उद्योगकरांनी तयार केलेला माल खरेदी करण्याचे धोरण शासनातर्फे अवलंबले जाईल.

औद्योगिकदृष्टया मागासलेल्या विभागात उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी स्थानिक उद्योजकांना विशेषतः बेकार युवकांना औद्योगिक कच्च्या मालाचा पुरवठा, कर्जपुरवठा, तांत्रिक मार्गदर्शन तसेच पक्क्या मालाच्या विक्रीसाठी खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनातर्फे प्रभावी यंत्रणा उभारली जाईल.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी संरक्षण व व्यापार यावर डोळा ठेवून रेल्वेची आखणी केली. येथून पुढे मागासलेल्या विभागात उद्योगधंदे निघावेत या हेतूने रेल्वेचा विस्तार केला पाहिजे. शेतीमालाच्या वाहतुकीसाठी रेल्वेचा वापर करण्यावर भर दिला जाईल. देशाच्या अर्थकारणात बदल घडवून आणण्यासाठी रेल्वेचे साधन एक तरफ म्हणून वापरले जाईल.

## राष्ट्रीयीकरण

कापड, साखर, ज्यूट, सिमेंट, पोलाद, खते, जंतुनाशके, खनिजे, यांची निर्मिती करणारे कारखाने व चहा–कॉफीचे मळे यांचे राष्ट्रीयीकरण. व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण.

आंतरराष्ट्रीय बड्या कंपन्या या जागतिक साम्राज्यशाहीच्याच घटक असल्याने त्यांचे निरंकुश अस्तित्व हे देशाच्या सार्वभौमत्वाला धोकादायक आहे. हे आक्रमण सर्वतोपरी मोडून काढण्याची व त्यांनी चालविलेली देशाची लूट त्वरित थांबविली जाईल.

भारतातील भांडवलदाराना बहुराष्ट्रीय कंपन्यांशी सहकार्य करण्याची अनुमती देता कामा नये.

मक्तेदार औद्योगिक घराण्यांच्या वाढीला संपूर्णतया बंदी घातली जाईल.

## आयात–निर्यात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण

शेतकऱ्यांना मारक व सटोडियांना पोषक असेच आयात–निर्यातीचे धोरण काँग्रेस राज्यकर्त्यांनी गेल्या तीस वर्षांत अवलंबले होते. शेतकऱ्याचा कापूस बाजारपेठेत येण्याची सुरुवात होते न होते तेवढयात परदेशातून कापूस आयात करण्याचे परवाने दिले जातात. कापसाचे भाव गडगडतात व शेतकऱ्यांची लूट होते. याउलट शेतकऱ्यांकडील माल व्यापाऱ्यांच्या गुदामात आल्यानंतरच त्या मालाच्या निर्यातीचे परवाने दिले जातात. या निर्यात परवान्यांचा लाभ व्यापारी सटोडिये उठवितात. हा प्रकार त्वरित बदलण्याची गरज असल्याने आयात–निर्यात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण केले जाईल.

## घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण

अन्नधान्ये, कापड, चहा, साखर, गळिताची धान्ये वगैरे जीवनावश्यक आणि शेतीक्षेत्रासाठी आवश्यक असणारी खते, सिमेंट, जंतुनाशके, औजारे या वस्तूंचा घाऊक व्यापार शासन हातात घेईल. वस्तूंच्या किफायतशीर किंमती शासन निश्चित करील व त्या त्या किंमतीला या वस्तू शासनातर्फे खरेदी करून त्यांच्या वितरणासाठी सार्वजनिक मालकी क्षेत्रांत देशव्यापी यंत्रणा उभारली जाईल.

## करपद्धती

इन्कमटॅक्ससारख्या प्रत्यक्ष करावरच मुख्य मदार राहील इन्कमटॅक्सच्या बाबतीत सर्वात वरच्या थराला काँग्रेस राज्यकर्त्यांनी दिलेली सूट रद्द केली जाईल.

डिव्हिडंड वाटपाबाबत काँग्रेस राज्यकर्त्यांनी उठविलेले निर्बंध पुन्हा जारी केले जातील.

चैनीच्या वस्तूंवरील अबकारी करात वाढ करून जीवनावश्यक वस्तूंवरील अबकारी कर कमी करणे.

## चोरटी आयात–निर्यात बंद पाडण्यासाठी

कठोर उपाययोजना केली जाईल.

## जनतेचे लोकशाही हक्क

मिसा ताबडतोब रद्द करणे.

बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीतील सर्व लोकशाहीविरोधी तरतुदी रद्द करणे.

## आणीबाणी

देशावर परचक्र आल्याखेरीज इतर कोणत्याही कारणास्तव देशामध्ये आणीबाणी जारी करता येणार नाही अशी, व ही आणीबाणी परचक्र संपताच तीन महिन्यांच्या अखेरीस आपोआपच संपुष्टात येईल अशी भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करणे.

## मूलभूत हक्कांच्या यादीत वाढ

१. काम मिळण्याचा हक्क

२. कामाचा योग्य दाम मिळण्याचा हक्क

३. शिक्षण मिळण्याचा हक्क

४. समान कामाला स्त्री व पुरुष असा भेदाभेद न करता समान वेतन मिळण्याचा हक्क.

५. अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क मिळणे. हे हक्क मूलभूत हक्काच्या यादीत समाविष्ट करण्यात यावेत म्हणून प्रयत्न करणे.

मालमत्ता धारण करण्याचा हक्क मूलभूत हक्काच्या यादीतून वगळणे.

## किंमतीविषयक

औद्योगिक कच्चा माल, शेतीमाल व कारखानदारीतून तयार होणारा पक्का माल यांच्या किंमतींच्या दरम्यान परिणामकारक परस्पर संबंध (पॅरिटी) प्रस्थापित केला जाईल.

---

# भाग दुसरा

---

## शहरी मालमत्ता व मिळकत यावर कमाल मर्यादा घालणे

देशातील करोडो लोकांचे दारिद्र्य व निकृष्ट जीवनमान यांच्या संदर्भात शहरी मालमत्ता व मिळकत यावर कमाल मर्यादा घालण्याची नितांत गरज आहे. कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी आपल्या दहा कलमी, पंधरा कलमी कार्यक्रमामध्ये याबाबत फक्त घोषणाबाजी केली. तपशील आखण्याची वेळ येताच त्यांनी कमाल मर्यादा शहरी विभागातील फक्त स्थावर मालमत्तेलाच लावण्याचे घोषित केले आणि कायदा करण्याची वेळ येताच स्थावर मालमत्तेला देखील कायद्याच्या कक्षेतून वगळले! आणि शहरी विभागातील फक्त मोकळ्या जागांपुरतीच ही कमाल मर्यादा घातली. लाखो रुपये किंमतीच्या इमारतींचे मालक कायद्याच्या कक्षेतून सुटले आणि ज्यांना इमारत बांधता आली नाही तेवढेच लोक कॉंग्रेसी कायद्यात सापडले. शहरी मालमत्ता व मिळकत यावर कमाल मर्यादा घालण्याच्या घोषणेची एवढी भयानक आणि क्रूर कुचेष्टा कोणी करू शकेल असे वाटत नाही.

शहरी मालमत्ता व मिळकत यावर कमाल मर्यादा घालणारा कायदा राज्य सरकारलादेखील करण्याचा अधिकार आहे. त्या अधिकाराचा वापर करून शहरी मालमत्ता व मिळकत यावर परिणामकारक मर्यादा घालणारा कायदा केला जाईल.

## शेतजमीनधारणेवर कमाल मर्यादा

उत्पादनवाढ व सामाजिक न्याय हे दुहेरी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सध्याच्या कायद्यात दुरुस्ती केली जाईल. कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी शेतजमीन धारणेवर कमाल मर्यादा घालणारा कायदा करण्याचे जाणून बुजून लांबणीवर टाकले. कायदा केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी परिस्थिती आल्यावर जो कायदा केला त्यामध्ये सीलिंग अवास्तवरीत्या जास्त ठेवण्यात आले. कायद्यामध्ये जाणूनबुजून पळवाटा ठेवल्या. एवढेच नव्हे, तर अशा भोगळ कायद्याची अंमलबजावणी देखील त्यापेक्षाही अधिक भोंगळपणाने केली. शेतीक्षेत्रातून गैरहजर जमीन मालकी संबंध नष्ट करण्याची नितांत गरज असताना त्या हितसंबंधांचे कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी संरक्षण आणि संवर्धन केले. 'व्यक्तिशः जमीन कसणे' या शब्दप्रयोगाची व्याख्या जाणून बुजून सदोष केली. परिणामी अनेक बडे जमीनमालक बेकायदेशीर रीतीने जादा जमीन अडवून बसले. त्यामुळे भूमिहीन शेतमजुरांना कसण्यासाठी मालकी हक्काने जमीन देण्याच्या कार्यक्रमाची कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी वाट लावली!

मध्यंतरी या कायद्यात दुरुस्ती करून जिरायती शेतीक्षेत्राची कमालमर्यादा खाली आणण्यात आली; परंतु सरकारी पाटबंधाऱ्यांच्या पाण्यावर भिजणाऱ्या बारमाही बागायती क्षेत्राची कमाल मर्यादा मात्र खाली आणण्याचे धाडस कॉंग्रेसकर्त्यांनी दाखविले नाही. हा पक्षपात त्वरित दूर केला जाईल. कायद्याला बगल देऊन अतिरिक्त जमीन अडवून बसलेल्या जमीनमालकाकडील अतिरिक्त जमीन निग्रहाने काढून घेतली जाईल व ती भूमिहीन शेतमजुरांना वाटण्यात येईल.

## शेतीमालाच्या किफायतशीर किंमतींची हमी

शेतीमालाच्या किफायतशीर किंमती ठरवून देण्यासाठी खाली नमूद केलेल्या सूत्राचा आधार घेतला जाईल.

(अ) शेतीमालाच्या उत्पादनासाठी शेतकऱ्याला करावा लागणारा खर्च;

(ब) शेतकरी व शेतमजूर यांच्या कुटुंबियांना वाजवी जीवनमानाची हमी;

(क) शेतीमालाच्या व औद्योगिक वस्तूंच्या (उदा०—कापड, खते, अवजारे, सिमेंट, जतुनाशके, डिझेल, विजेचे दर वगैरे) किंमतींचा परस्पर संबंध व समतोल.

(ड) शेतीव्यवसाय अधिक उत्पादनक्षम करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या भांडवल गुंतवणुकीसाठी आवश्यक ती तरतूद.

या सूत्रांच्या आधारे शासन शेतीमालाच्या किफायतशीर किंमती हंगामापूर्वीच जाहीर करील व त्या त्या किंमतीला शेतीमाल खरेदी करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारील.

उत्पादकाला त्याच्या मालासाठी मिळणारी किंमत आणि अंतिम ग्राहकाला त्याच वस्तूसाठी मोजावी लागणारी किंमत या दोहोंच्या दरम्यान जी सतत रुंदावणारी दरी निर्माण होते, तिच्यामुळे शेतकरी आणि ग्राहक या दोघांचीही लूट होते आणि मध्यस्थ दलाल, व्यापाऱ्यांचे उखळ पांढरे होते. सुगीमध्ये शेतकरी हा अडलेला विक्रेता असतो. पुढे तोच अडलेला ग्राहकही बनतो. सुगीमध्ये ढासळ-

णाऱ्या किमतीचा ग्राहकांनाही फायदा मिळत नसतो, हा अनुभव आहे. शेतकऱ्यांच्या पदरात पडणारी किंमत आणि ग्राहकाला मोजावी लागणारी किंमत यामधील अंतर कमीत कमी करण्यासाठी शासनाच्या वतीने या क्षेत्रात खरेदी–विक्रीची व्यापक यंत्रणा राबविली जाईल.

## कापूस एकाधिकार खरेदी योजना पुन्हा सुरू केली जाईल

कापूस खरेदीच्या क्षेत्रातून मध्यस्थांचे उच्चाटन करून शेतकऱ्यांच्या कपाशीला किफायतशीर किंमत मिळवून देण्याच्या दृष्टीने कापूस एकाधिकार खरेदी योजना, हे शेतकऱ्याच्या हातातील एक प्रभावी हत्यार ठरलेले आहे. कापड उत्पादनाच्या क्षेत्रात कापड गिरणीमालकांची व सटोडियांची मक्तेदारी असल्याने तिला तोंड देण्यासाठी व शेतकऱ्यांचे खुल्या व्यापारात होणारे शोषण कमी करण्यासाठी शेतकऱ्यांची सामूहिक ताकद उभी करण्याचा हा एक प्रयत्न होता; परंतु गेली पाच वर्षे राबविण्यात आलेली कापूस एकाधिकार खरेदी योजना कापड गिरणीमालकांच्या व सटोडियाच्या दडपणामुळे महाराष्ट्र शासनाने चालू वर्षापासून स्थगित केली आहे. ही योजना स्थगित करून महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केलेला आहे. आम्ही ही योजना अधिक जनताभिमुख स्वरूपात पुन्हा चालू करू.

## शेतसारा रद्द करणे

शेतसारा हा सरंजामी पद्धतीचा अवशेष आहे. शेतीमध्ये किती उत्पन्न मिळते यापेक्षा, केवळ शेती धारण करतो एवढ्याच कारणास्तव शेतकऱ्यांना हा कर भरावा लागतो. शेतसारा संपूर्णतया रद्द करून चढत्या श्रेणीवर आधारित असा शेतीउत्पन्न कर सुरू केला जाईल. त्यामुळे फक्त ऐपतवाल्या शेतकऱ्यावर कर बसेल आणि लाखो गरीब शेतकरी शेतसाऱ्याच्या बोजातून मुक्त होतील.

## शेतीसाठी पाणीपुरवठा

तीस वर्षांच्या काँग्रेस राजवटीनंतरही राज्यातील बागायती क्षेत्र फक्त नऊ ते दहा टक्के एवढेच आहे. राज्यातील फार मोठ्या विभागाला सातत्याने दुष्काळाला तोंड द्यावे लागते. शासनाच्या आकडेवारीनुसार सुमारे ८७ तालुके दुष्काळग्रस्त असे आहेत. पाटबंधाऱ्याच्या योजनांना व इतर छोट्या योजनांना अग्रहक्क देऊन बागायती क्षेत्र पुढील पाच वर्षांत वीस टक्क्यांपर्यंत नेले जाईल.

पाणी हे जीवन आहे. त्याचे वाटप करताना सामाजिक न्यायाचे तत्त्व आधारभूत मानले जाईल. शासनाच्या प्रयत्नातून प्रत्यक्षरित्या वा अप्रत्यक्षरीत्या उपलब्ध करण्यात येणारे पाणी याच सामाजिक न्यायाच्या कसोटीवर वाटण्यात येईल. अवर्षणग्रस्त विभागातील अन्नधान्याच्या पिकासाठी पाणी दिल्यामुळे त्यांचे दुष्काळापासून संरक्षण होणार असेल तर बाष्पीभवनाचा बाऊ न करता बारमाही बागायतदारांना दिल्या जाणाऱ्या पाण्यामध्ये कपात करण्याचे धोरण निग्रहपूर्वक अंमलात आणले जाईल.

शासकीय पाटबंधारे योजनांच्या कक्षेत कोणालाही बारमाही पाणीपरवाना दिला जाणार नाही. पाणी हा एक दुर्मिळ घटक असल्याने समाजाच्या सर्व थरांना त्याचा फायदा मिळेल अशा हिशेबानेच त्याचे वितरण केले जाईल.

## भूपृष्ठाखाली पाण्याचा वापर

भूपृष्ठाखालील पाण्याचा वापर करण्यासाठी यत्या पाच वर्षांत किमान दोन लक्ष विहिरी खोदण्याचा ठोस कार्यक्रम पुरा केला जाईल. यासाठी शासनामार्फत आवश्यक तो कर्जपुरवठा केला जाईल. पहिली पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर कर्जफेडीची मुदत वीस वर्षे राहील. व्याजाचा दर चार टक्के आकारण्यात येईल.

अपयशी ठरलेल्या विहिरीचे कर्ज माफ केले जाईल.

## नद्यांचे प्रवाह एकमेकाला जोडणे: ( वॉटरग्रिड )

राज्यातील नद्याना येणाऱ्या महापुरामुळे फार मोठ्या प्रमाणावर वित्तहानी व मनुष्यहानी सहन करावी लागते. या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्याचा व पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर करण्याचा एक भाग म्हणून नद्यांचे प्रवाह एकमेकाना जोडण्याचा धाडसी कार्यक्रम आखला जाईल. अवर्षणग्रस्त विभागांना पाणीपुरवठ्याची सोय करण्याचा हा एक हमखास उपाय ठरेल. राज्यातील मनुष्यबळाचा पुरेपूर वापर करण्यासाठी हा कार्यक्रम प्रभावी ठरेल.

## वीज पुरवठा

वीज पुरवठ्याच्या दर आकारणीबाबत वीजमंडळाचे व शासनाचे धोरण हे उद्योगपतींना पोषक व शेतकऱ्याना मारक ठरले आहे. कारखानदार फार मोठ्या प्रमाणावर ( बल्क परचेस ) वीज वापरतात या सबबीखाली त्यांना अतिशय सवलतीचा दर आकारला जातो. शेतकऱ्यांना मात्र आज २६ पैसे युनिट या दराने विजेचे बिल भरावे लागते. खेरीज इंधन चार्ज म्हणूनही वीज-मंडळ दडपेगिरीने शेतकऱ्यांकडून जादा रक्कम उकळीत असते. दर अश्वशक्तीला वर्षाला १८० रुपये हा नक्त दरही शेतकऱ्यांना मुळीच परवडणारा नाही. दर अश्वशक्तीमागे ही आकारणी दर वर्षासाठी ८० रुपये दराने केली जाईल. जे शेतकरी युनिटप्रमाणे बिल भरू इच्छितात त्यांना दर युनिटला १२ पैसे दराने आकारणी केली जाईल.

## शेतकऱ्यांचे कर्जनिवारण

जे शेतकरी निर्वाहक्षम क्षेत्रापेक्षा ( इकॉनॉमिक होल्डिंग ) कमी शेतजमीन धारण करतात अशा शेतकऱ्यांची खाजगी, सहकारी व सरकारी अशी सर्व कर्जे माफ केली जातील.

मध्यम शेतकऱ्यांकडील कर्जाच्या परतफेडीसाठी सवलतीचे हप्ते बांधून दिले जातील.

बंडिंगसाठी आणि खारजमिनीच्या बांध-बदिस्तीसाठी काढलेली सर्व कर्जे ही राष्ट्रीय गुंतवणूक मानून ती माफ करण्यात येतील.

## पीकविमा आणि जनावरविमा

अवर्षणामुळे, अतिवृष्टीमुळे तसेच रोगराईमुळे शेतकऱ्यांची पिके बुडतात. त्यांची जनावरेही मृत्युमुखी पडतात. असा बसलेला फटका शेतकरी कर्जाच्या कर्दमात रुतल्यानंतर तो बाहेर येऊ शकत नाही. त्यातच तो गारद होतो. या आपत्तीपासून संरक्षण देण्याचा एक भाग म्हणून पिकांचा आणि जनावरांचा विमा उतरण्याची योजना शासनाच्या वतीने राबविण्यात येईल. विम्याचे हप्ते भरण्याच्या दृष्टीने

ते गोरगरीब शेतकऱ्यांना परवडतील अशा हिशेबाने त्याची आकारणी केली जाईल.

ही योजना सुरू केली जाईतोपर्यंत पीककर्ज घेऊन पिके काढणाऱ्या शेतकऱ्याचे पीक, अतिवृष्टी, अनावृष्टी, रोगराई, महापूर वगैरे आपत्तींमुळे बुडाल्यास त्या कर्जाबाबत सबंधित शेतकऱ्यांना सूट दिली जाईल.

### शेतीसाठी आवश्यक वस्तूंचा रास्त भावाने पुरवठा

शेती–उपयोगासाठी लागणारी खते, जंतुनाशके, अवजारे, बियाणे वगैरे वस्तूंचा रास्त भावाने पुरवठा करण्यासाठी सार्वजनिक मालकी क्षेत्रात आवश्यक ती यंत्रणा उभारली जाईल. बनावट माल भरमसाट किंमतीला विकून शेतकऱ्याची लूट करणाऱ्या खाजगी कंपन्यांची मक्तेदारी नष्ट केली जाईल.

### शेतीसाठी कर्जपुरवठा

आजपर्यंत चालत आलेले 'तारण पाहून' कर्ज देण्याचे धोरण बदलून त्याच्या जागी 'कारण पाहून' कर्ज देण्याचे धोरण अवलंबिले जाईल. त्याखेरीज गोरगरीब परंतु गरजू शेतकऱ्यांना कर्जपुरवठा होऊ शकणार नाही. आजतागायत बड्या व ऐपतवाल्यांनीच सहकारी संस्थांकडून केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्यापैकी मोठा हिस्सा गिळंकृत केला, हे धोरण त्वरित बदलले जाईल.

अल्पभूमिधारक व सीमांतक शेतकऱ्यांना आज जे कर्ज दिले जाते ते इतके तोकडे असते की, त्या कर्जाचा वापर करून ते आपली शेती अधिक उत्पादनक्षम तर करू शकत नाहीतच; परंतु ते अधिकाधिक कर्जबाजारी होतात. गरजेपेक्षा कमी कर्जपुरवठा होत गेल्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत, ही वस्तुस्थिती विचारात घेऊन या शेतकऱ्यांना पुरेसा कर्जपुरवठा केला जाईल. त्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर दरसाल दर.शेकडा चार रुपयांपेक्षा अधिक व्याज आकारले जाणार नाही.

इतर गरीब व मध्यम शेतकऱ्यांना व्याजाचा दर सहा टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

### शेतीसाठी राखीव कर्जपुरवठा

राष्ट्रीकृत बँकांकडून केल्या जाणाऱ्या कर्ज पुरवठ्यापैकी किमान पन्नास टक्के कर्ज पुरवठा शेती–व्यवसायासाठी राखून ठेवण्यात यावा यासाठी प्रयत्न केला जाईल.

### मच्छीमार समाजाचे प्रश्न

काँग्रेस राज्यकर्त्यांच्या आशीर्वादाने मच्छीमारीच्या व्यवसायात बडे उद्योगपती घुसले असून सर्वसामान्य साधनांनी मासेमारी करणाऱ्या गोरगरीब मच्छीमाराचे जीवन उध्वस्त होत आहे. मोठमोठ्या ट्रॉलर्सच्या साह्याने मासेमारी करणाऱ्या उद्योगपतींना या क्षेत्रात बंदी घालण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

मासेमारीच्या व्यवसायासाठी समुद्राचे झोन पाडले जातील. समुद्रकिनाऱ्यापासून ठराविक अंतराच्या झोनमध्ये लहान लहान होड्यातूनच मासेमारी करणाऱ्यांनाच परवाने देण्यात येतील. या क्षेत्रात ट्रॉलर्सच्या साह्याने मासेमारी करण्यात संपूर्णतया बंदी केली जाईल

मच्छीमार समाजापैकी ज्या गरीब लोकांनी होड्या किंवा जाळे अगर रापण यासाठी कर्ज काढले असेल त्यांना चार टक्के दराने व्याजाची आकारणी केली जाईल.

. या व्यवसायासाठी ज्या वस्तू लागतात ( उदाहरणार्थ नायलॉन, डिझेल वगैरे ) त्यावरील अबकारी करात सवलत दिली जाईल.

बॅकबे रिक्लेमेशन योजना रद्द केली जाईल. तेथील जागेचा वापर मच्छीमार समाजाला त्यांच्या होड्या बांधण्यासाठी व जाळी वाळविण्यासाठी करू दिला जाईल.

मुंबईतील वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याचा एक भाग म्हणून नवा मार्ग काढताना मुंबई शहरातील कोळीवाडे व त्यांचे जीवन उध्वस्त केले जाणार नाही.

मासेमारीच्या व्यवसायात भाग घेणाऱ्या लोकांना फार मोठा धोका पत्करून खवळलेल्या समुद्रामध्ये काम करावे लागते. अनेक दुर्दैवी जीवांना मृत्युमुखी पडण्याची पाळी येते. अशा रीतीने मृत्युमुखी पडणाऱ्या मच्छीमारांच्या कुटुंबियांना आज कोणतेही भरीव आर्थिक साह्य मिळत नाही. त्यांची कुटुंबीय मंडळी उघड्यावर पडतात. अशा कुटुंबियांना केवळ दयनीय मदतीवर अवलंबून न ठेवता त्यांना भरीव आर्थिक मदत करण्यासाठी शासनाच्या वतीने एक निधी निर्माण करण्यात येईल.

### गरजांवर आधारित किमान जीवनवेतनाची कायदेशीर हमी

शेतमजूर, छोटे शेतकरी, ग्रामीण कारागीर, कामगार या सर्वांना त्यांच्या जीवनावश्यक गरजा लक्षात घेऊन त्यावर आधारित अशा वेतनाची कायदेशीर हमी.

### शेतमजूर

महाराष्ट्र शासन शेतमजुरांसाठी किमान वेतन निर्धारित करून देण्यास आरंभी तयारच नव्हते. दिनांक २९ जुलै १९६९ रोजी महाराष्ट्र विधानसभेत त्या वेळचे कामगारमंत्री ना. नरेंद्र तिडके यांनी शेतमजुरांसाठी किमान वेतन कायदा लागू करणे अशक्य असल्याचे उत्तर दिले होते. त्यानंतरच्या काळात शासनावर या बाबतीत विरोधी पक्षांनी सातत्याने दबाव आणल्यामुळेच महाराष्ट्र शासनाने शेतमजुरांचे किमान वेतन ठरवून देण्याचे मान्य केले; परंतु त्यांनी निर्धारित केलेले वेतन शेतमजुरांना उपासमारीच्या छायेत ढकलणारे आहे. अतिशय अपुरे असे किमान वेतन आणि अंमलबजावणीच्या यंत्रणेचा अभाव या दोन्ही आपत्तींमध्ये राज्यातील साठ लक्ष शेतमजूर सापडले आहेत.

शेतमजुराचे किमान वेतन बागायती विभागामध्ये सात रुपये व जिरायती विभागामध्ये किमान साडेपाच रुपये राहील. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये व राहणीमानात ज्या प्रमाणात वाढ होईल त्या प्रमाणात हे किमान वेतन नियमितपणे सुधारित करण्यात येईल.

### कामगारवर्गाचे प्रश्न

गरजाधिष्ठित किमान वेतनाची हमी.

वेतनाचा उर्वरित भाग या नात्याने बोनसची कायदेशीर हमी.

उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात सर्व पातळीवर कामगारांना खरी-खुरी भागीदारी.

सक्तीने बेकारीमध्ये ढकलल्या गेलेल्या कामगारांना इंटेरिअम रिलीफची हमी.

कोणत्याही सबबीखाली कामगारांचे वेतन गोठविण्यासाठी अगर त्यांच्या वेतनाचा काही भाग रोखून धरण्याच्या योजनेला मान्यता दिली जाणार नाही.

महागाईमुळे कामगारांच्या राहणीमानात होणाऱ्या वाढीला संपूर्ण-तया छेद देईल अशी वेतनवाढ देण्याची हमी.

औद्योगिक कामगारांच्यासाठी घरे बांधण्याची कायदेशीर जबाबदारी कारखानदारांवर टाकण्यात येईल. ही अट जे कारखानदार पूर्ण करणार नाहीत त्यांना विस्तारासाठी औद्योगिक परवाना दिला जाणार नाही. कागारांच्या ट्रेड युनियनला मान्यता देण्याचे कारखानदारावर कायदेशीर बंधन राहील. कामगारांचे गुप्त मतदान घेऊन युनियनची मान्यता निश्चित करण्याची तरतूद कायद्यात केली जाईल.

आपल्या न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी संप करण्याच्या हक्कास मान्यता.

कामगारांना कसलाही अपाय अथवा अपघात होणार नाही अशा दृष्टीने आवश्यक ती सुरक्षा उपाययोजना अमलात आणण्याची कायदेशीर जबाबदारी कारखानदारावर निश्चित करणे.

प्रॉव्हिडंड फंड योजना रद्द करून कामगारांसाठी पेन्शन योजना लागू केली जाईल.

नवीन उद्योगधंदा सुरू करणाऱ्या उद्योगपतींवर कामगारांना पुरेशी घरे बांधून देण्याची कायदेशीर जबाबदारी टाकली जाईल.

अप्रेंटिस योजनेची व्याप्ती आणि आशय वाढवून नवीन कामगाराना व तरुण उमेदवारांना व्यावसायिक अनुभव मिळविण्याची संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध केली जाईल.

कामगारविषयक कायदेकानू करताना अगर विद्यमान कामगार-कायद्यात दुरुस्ती करण्यापूर्वी शासन कामगारांच्या प्रातिनिधिक संघटनांशी विचारविनिमय करील.

## राष्ट्रीय वेतन धोरण (नॅशनल वेज पॉलिसी)

देशांतर्गत किंमतीची पातळी आणि वेतन या दोहोंची परिणामकारक सांगड घालण्यात येईल. आज लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली कसेबसे जीवन कंठीत आहेत. त्यांच्यापैकी जवळजवळ निम्मे लोक तर उपासमारीच्या छायेत आहेत. उपासमारीच्या छायेत आणि दारिद्र्यरेषेच्या खाली जीवन जगणाऱ्या लोकाची संख्या झपाट्याने कमी करून त्या दुर्दैवी जीवाना सुसह्य जीवनमान उपलब्ध करून देणे हे वेतनपद्धतीचे मुख्य उद्दिष्ट राहील.

तळच्या लोकसंख्येचे जीवनमान सुधारण्यासाठी व त्यांच्या वेतनात लक्षणीय वाढ करण्यासाठी मूठभर अतिधनाढ्य विभागाच्या वायफळ उधळपट्टीला संपूर्णतया आळा घालण्याची गरज आहे. कॉंग्रेस राज्यकर्ते त्यांच्या वतीने वकिलपत्र स्वीकारून कोर्टात उभे राहणाऱ्या वकिलाला विकासासाठी १४०० रुपयांचा मेहनताना बहाल करतात; परंतु दिवसाचे चोवीस तास राब राब राबणाऱ्या कोतवालाला मात्र दरमहा ८० रुपयांवर राबायला भाग पाडतात. हा प्रकार बंद झाला पाहिजे. सर्वांत खालच्या पातळीवर काम करणाऱ्या विभागाचे वेतन त्यांच्या गरजा लक्षात घेऊन निर्धारित केले जाईल आणि सर्वांत कमी व सर्वांत जास्त वेतन मिळविणाऱ्या विभागांच्या दरम्यान परस्पर प्रमाण निश्चित करण्यात येईल. सुरुवातीला हे प्रमाण १ : १० असे असेल व ते क्रमाक्रमाने कमी करण्यात येईल.

## रोजगार हमी योजना

कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी या संदर्भात केलेल्या कायद्यामध्ये फार मोठा दोष आहे. या कायद्यानुसार काम मागणाऱ्या व्यक्तीला शासनाच्या वतीने त्या जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी काम पुरविणाचे आश्वासन दिले गेले तरी कायद्याची अंमलबजावणी झाली आहे, असे मानण्यात येते. या कायद्यात दुरुस्ती केली जाईल व काम मागू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जिल्हा परिषद. मतदारसंघाच्या मर्यादेत काम पुरविण्याची हमी शासनातर्फे दिली जाईल. अन्यथा बेकारभत्ता देण्याची जबाबदारी शासन स्वीकारील या कायद्याखाली दिल्या जाणाऱ्या बेकारभत्त्यात आणि वेतनात भरीव वाढ केली जाईल.

रोजगार हमी योजनेखाली दिली जाणारी मजुरी ही त्या त्या जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या शेड्यूल-रेटस एवढी असेल. कोणत्याही स्थितीत ही मजुरी दरवर्षी चार किलो धान्याच्या बाजारभावापेक्षा कमी असणार नाही.

## घरबांधणी

औद्योगिक कामगारांसाठी घरे बांधण्याची जबाबदारी कारखानदारावर टाकण्यात येईल. औद्योगिक परवाना देताना या बाबीची पूर्तता ही महत्त्वाची मानली जाईल.

शासकीय कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधण्याची जबाबदारी शासनावर राहील. शासन याबाबत एक समयबद्ध कार्यक्रम आखील.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधण्याची जबाबदारी त्या त्या स्था. स्व. संस्थावर टाकण्यात येईल. यासाठी आवश्यक तो निधी उभारण्याच्या कामी शासन त्यांना सहकार्य करील.

ग्रामीण भागात शेतमजूर, बलुतेदार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, छोटे शेतकरी या दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचा कार्यक्रम शासनातर्फे आग्रहाने राबविण्यात येईल.

ही घरे बांधण्यासाठी सिमेंट वगैरेसारख्या वस्तूवर अवलंबून न राहता स्थानिक साहित्याचा चांगल्या रीतीने वापर करता यावा यासाठी त्या प्रकारच्या संशोधनाला उत्तेजन दिले जाईल.

शहरातून कनिष्ठ मध्यमवर्ग व कमी उत्पन्नाच्या गटातील नागरिकांसाठी घरे बांधण्याची जबाबदारी नगरपालिका, महापालिका व राज्यशासन यांच्यावर टाकण्यात येईल.

राज्यशासन स्था. स्व. संस्था यांच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या घरांचे वाटप करताना सामाजिक अभिसरणाचे उद्दिष्ट ठेवले जाईल. भिन्नभिन्न जाती–धर्मांच्या लोकांना सरमिसळ करून ही घरे दिली जातील.

गृहनिर्माण मंडळाच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या गाळ्याचे वाटप करताना कामगारांना व कर्मचाऱ्यांना शक्य तो त्यांच्या नोकरीच्या ठिकाणापासून जवळची जागा देण्याचा दृष्टिकोण ठेवला जाईल व लॉटस् टाकताना त्या हिशेबाने टाकले जातील.

## झोपडपट्ट्यांची सुधारणा

राज्यात दहा लक्ष झोपड्या असून त्यात सुमारे ५० ते ६० लक्ष लोक कसेबसे जीवन कंठीत आहेत. त्यापैकी पाच लक्ष झोपड्या एकट्या मुंबईत आहेत. या झोपड्यांचे रूपांतर गलिच्छ वस्त्यांमध्ये झाले आहे याचे एकमेव कारण म्हणजे त्यांच्या किमान प्राथमिक गरजा भागविण्याबाबत देखील हालचाल झालेली नाही.

या झोपड्यांतून राहणाऱ्या नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा आणि संडास-मुताऱ्या उपलब्ध करून दिल्या तर एरवी गलिच्छ दिसणाऱ्या झोपड्यांची आणि त्यामधून राहणाऱ्या लोकांची चेहेरेपट्टी तात्काळ बदलल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या झोपड्यांना पाणी, दिवाबत्ती, संडास व मुताऱ्या या किमान नागरी सोयी पुरविण्यासाठी समयबद्ध कार्यक्रम आखून तो पुरा केला जाईल.

## झोपडी रहिवाशांना ओळखपत्रे

राज्यशासनाने या झोपड्यांच्या शिरगणतीचा कार्यक्रम हाती घेतला होता; परंतु शिरगणती झाल्यानंतर त्या त्या झोपडीतील रहिवाशांना ओळखपत्रे देण्याचे काम त्यांनी अर्धवट सोडून दिले आहे. आम्ही या रहिवाशांना ओळखपत्रे देण्याचे काम त्वरित पुरे करू आणि ज्यांना ओळखपत्र दिले असेल त्यांची झोपडी कधीही जाणार नाही अशी हमी देऊ.

## झोपडीवाल्यांना मालकी हक्काने जमीन

ओळखपत्र धारण करणाऱ्या झोपडी रहिवाशांना सुरक्षिततेची हमी देण्यासाठी त्या झोपडपट्टीखालील जमीन एक रुपया चौरस फूट दराने मालकी हक्काने खरेदी करण्याची संधी दिली जाईल.

अशा रीतीने सदर जमीन त्यांच्या मालकीची झाल्यानंतर जुन्या झोपड्यांच्या जागी स्वस्त किमतीची घरे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल. यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करण्यासाठी आयुर्विमा कॉर्पोरेशनसारख्या संस्थांकडून कर्ज मिळविले जाईल व ते सवलतीच्या व्याजाच्या दराने या दुर्बल घटकांना पुरविले जाईल.

## आरोग्यविषयक सोयी

आज शासनातर्फे ज्या काही आरोग्याच्या सोयी पुरविल्या जात आहेत, त्या प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठ्या शहरातच केंद्रित झाल्या आहेत. महाराष्ट्र शासन दरवर्षी औषधावर जेवढी रक्कम खर्च करते त्यापैकी ६६ टक्के रक्कम मुंबई शहरात व १४ टक्के रक्कम पुणे व नागपूर या दोन शहरात खर्च केली जाते. राज्यशासनाने औषधावर खर्च केलेल्या १५ कोटी ६० लक्ष रुपयांपैकी ग्रामीण भागात फक्त ७० लक्ष रुपये खर्च झाले.

३० लक्ष आदिवासी जनतेच्या वाट्याला फक्त ६ लक्ष रुपये आले.

आरोग्यविषयक सोयी पुरविण्यासाठी शासनाकडून जो खर्च केला जातो, त्या खर्चात लक्षणीय वाढ केली जाईल आणि ग्रामीण भागात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात हा खर्च केला जाईल.

प्रत्येक तालुक्यात किमान एक कॉटेज हॉस्पिटल उपलब्ध केले जाईल.

## ग्रामीण भागासाठी पुरेसे डॉक्टर्स

आज राज्यामध्ये एम्.बी.बी.एस्. च्या अभ्यासक्रमासाठी जेवढ्या जागा उपलब्ध आहेत; त्यापैकी निम्म्या जागा कमी करून त्याऐवजी एल्. सी. पी. एस्. अगर बी. ए. एम्. एस्. हे अभ्यासक्रम सुरू केले जातील. हा अभ्यासक्रम पुरा केल्यानंतर किमान पंधरा वर्षे ग्रामीण भागातच व्यवसाय करण्याबाबत करारनामा लिहून देणाऱ्या उमेदवारांची या अभ्यासक्रमासाठी निवड केली जाईल.

एम्. बी. बी. एस्. झाल्यानंतर अनेक लोक भारतात प्रॅक्टिस करण्याऐवजी इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत जाऊन तेथे नोकरी करतात. हा 'ब्रेन ड्रेन' थांबविण्यासाठी एम्. बी. बी. एस्. ला प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक उमेदवाराकडून करारनामा करून घेतला जाईल. देशाबाहेर जाऊन नोकरी-धंदा करू इच्छिणाऱ्या उमेदवाराकडून त्याच्या शिक्षणासाठी शासनाने अथवा समाजाने खर्च केलेली रक्कम सव्याज वसूल केली जाईल.

## पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

राज्यामध्ये आजही आठ ते नऊ हजार खेडी अशी आहेत की, त्यांना पिण्याच्या पाण्याची खात्रीशीर सोय झालेली नाही. 'कठीण गाव' जाहीर करण्यासाठी आजपर्यंत राज्य शासनाने ज्या कसोट्या लावल्या आहेत त्या अतिशय जाचक आहेत. त्या शिथिल करून ही गावे 'कठीण गावे' म्हणून त्वरित जाहीर केली जातील. येत्या पाच वर्षांत राज्यामध्ये एकही खेडेगाव असे असणार नाही की, जेथे पिण्याच्या पाण्याची खात्रीशीर सोय केलेली नाही.

## शिक्षणविषयक

स्वातंत्र्य मिळून ३० वर्षे लोटली तरी कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी भारतीय राज्यघटनेतील ४५ व्या कलमाची अंमलबजावणी केलेली नाही, त्या कलमानुसार १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना आणि मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी १९६० सालापर्यंत पार पाडावयाची होती. आजतागायतदेखील ही जबाबदारी पार पाडली न गेल्यामुळे निरक्षर लोकांची संख्या वाढती आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी हत्यार असल्याने ते सर्वांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनावर पडते.

१४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना आणि मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा कार्यक्रम येत्या पाच वर्षांत पूर्ण केला जाईल.

निरक्षरतेचे निर्मूलन केले जाईल. त्यासाठी राज्यातील सुशिक्षित व प्रशिक्षित तरुण-तरुणींची एक साक्षरता सेना उभारली जाईल.

प्राथमिक शाळेत दाखल झालेल्या मुलांपैकी किमान ५४ टक्के मुले चौथी इयत्ता पास होण्यापूर्वीच व कायम स्वरूपाची साक्षरता प्राप्त होण्यापूर्वीच गळनात व निरक्षरांच्या संख्येमध्ये भर घालतात. ही प्रचंड गळती थांबविण्यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील

व दलित समाजातील मुलामुलींना शाळेमध्ये 'मधल्या वेळचे जेवण' पुरविण्याचा कार्यक्रम तामिळनाडू राज्यातल्या कार्यक्रमाच्या धर्तीवर सुरू केला जाईल.

## एकशिक्षकी शाळांमध्ये वर्गवार शिक्षक

राज्यामध्ये सुमारे ४० टक्के प्राथमिक शाळा (सुमारे २० हजार) एकशिक्षकी आहेत. या शाळातून शिकणाऱ्या मुलाचे पालक बहुतांशी निरक्षर व आपल्या पाल्यांना कोणत्याही प्रकारे शैक्षणिक मार्गदर्शन करण्यास असमर्थ आहेत. या शाळातील मुलाची वर्गवार संख्या विचारात न घेता या सर्व शाळातून वर्गवार अध्यापनाची सोय करण्यासाठी पुरेसा शिक्षकवर्ग नियुक्त केला जाईल.

जोपर्यंत राज्यातील सर्व शाळामधून वर्गवार अध्यापनाची सोय केली जाणार नाही तोपर्यंत काही ठराविक शाळातून विषयवार अध्यापनाची सोय करण्यासाठी जादा शिक्षक नियुक्त केले जाणार नाहीत.

शाळेच्या वेळापत्रकाच्या आधीन राहून शिक्षण घेणे ज्यांना आर्थिकदृष्टया अशक्य आहे अशा कमकुवत विभागासाठी चाकोरी-बाहेरील पद्धतीने (नॉन फॉर्मल सिस्टिम) शिक्षण मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केले जाईल.

आजच्या शिक्षणपद्धतीने पदवी आणि समाज यांच्या दरम्यान एक दरी निर्माण केली आहे. या पद्धतीमुळे शिक्षण घेणारा श्रम करीत नाही आणि श्रम करणाऱ्या व्यक्तीला शिक्षण मिळत नाही. एवढेच नव्हे, तर श्रम करणाऱ्या व्यक्तीबद्दल त्याला सहानुभूती वाटण्याऐवजी त्याच्याविषयी तुच्छतेची भावना निर्माण होते. शिक्षणाची खऱ्याखुऱ्या अर्थाने पुनर्रचना करून शिक्षणाची व श्रमाची सांगड घातली जाईल. या मार्गाने शिक्षण व जीवन यांच्या दरम्यान परिणामकारक सुसंवाद प्रस्थापित केला जाईल.

## श्रम करणे ही एक राष्ट्रीय शिस्त मानली जाईल

आज शिक्षण ही मूठभर ऐपतवाल्याची मिरासदारी झाली आहे. पालकांचो धनवत्ता हीच मुलाची गुणवता ठरत आहे. शिक्षण घेणे ही मूठभर लोकाची मिरासदारी होऊ नये म्हणून माध्यमिक शिक्षणापासून पुढील सर्व शिक्षण पैशाच्या मोबदल्यात न मिळता ते विद्यार्थ्यांना स्वत:च्या श्रमाच्या मोबदल्यातच मिळावे अशी शिक्षण-व्यवस्था आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

कोठारी आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे एस्. एस्. सी. पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी किमान ५० टक्के विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे वळविण्यात आले पाहिजे होते. ही गोष्ट आज मुळीच घडत नाही. कारण व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी अतिशय तोकड्या आहेत. त्या पुरेशा प्रमाणात वाढविल्या जातील.

नव्या शैक्षणिक आकृतिबंधातील ११ व १२ वी चा अभ्यासक्रम टर्मिनल ठरावा अशी मूळ संकल्पना होती. ती आज धुळीस मिळाली आहे. कारण १२ वी पास झालेला विद्यार्थी स्वत:च्या पायावर उभा राहू शकत नाही. या अभ्यासक्रमाची आमूलाग्र पुनर्रचना केली जाईल. व्यावसायिक शिक्षणासाठी पुरेशी साधनसामग्री गरजू शिक्षण-संस्थांना पुरविली जाईल.

प्रत्येक विकासगटामध्ये किमान एक औद्योगिक शिक्षणसंस्था व एक महाविद्यालय स्थापन केले जाईल.

## श्रमिक पुस्तकांची फेरमांडणी

श्रमिक पुस्तकांची तावडतोबीने फेररचना केली जाईल. चातुर्वर्ण्य, जातिभेद, उच्च-नीचता या अनिष्ट गोष्टीचे प्रच्छन्न रीतीने समर्थन करणारे एकूण एक उल्लेख श्रमिक व इतर पुस्तकातून गाळून टाकले जातील. अंधश्रद्धा वाढीस लागेल असे लिखाण मुलांच्या हाती पडणार नाही व शास्त्रीय दृष्टिकोन जोपासला जाईल असेच वाङ्मय निर्माण केले जाईल.

## धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद

भारताच्या संविधानाच्या सरनाम्यामध्ये धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी भारत निर्माण करण्याची ग्वाही देण्यात आली आहे. ती केवळ त्या सरनाम्यातच न राहता नागरिकांच्या हाडीमासी रुजण्याच्या दृष्टीने धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी जनमानस तयार करण्याच्या दृष्टिकोनातून शाळा-कॉलेजामधील अभ्यासक्रम पुनर्घटित केला जाईल. भांडवलदारी समाजव्यवस्थेचे अगभूत दोष आणि समाजवादी समाजव्यवस्थेचे निर्णायक श्रेष्ठत्व सिद्ध करणारे वाङमय निर्माण केले जाईल.

## शिक्षक-प्राध्यापक-बिगर-अध्यापन कर्मचाऱ्यांना नोकरीची शाश्वती-

पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च या सर्वच क्षेत्रांत अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांना, प्राध्यापकांना तसेच बिगर अध्यापन कर्मचाऱ्यांना नोकरीची कायदेशीर शाश्वती दिली जाईल. विद्यमान कायद्यामध्ये ज्या थरांना ही शाश्वती मिळालेली नाही त्यांचा त्यात अतर्भाव केला जाईल. तसेच सध्याच्या कायद्यातील उणीवा त्वरित दूर करून तो प्रभावी केला जाईल.

## मेडिकल कॉलेजमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के जागा राखीव-

ग्रामीण विभागामध्ये राज्यकर्त्यांनी शिक्षणाची जी अक्षम्य हेळसांड चालू राहू दिली आहे तिचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील फारच थोड्या विद्यार्थ्यांना मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो. हा त्या विद्यार्थ्यांचा दोष नसून ज्या वातावरणामध्ये त्याचे शिक्षण केले जाते, ते वातावरणच त्यांच्या पीछेहाटीला कारणीभूत आहे. या विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी मेडिकल कॉलेजमधील ५० टक्के जागा ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांतून शिक्षण घेऊन पुढे आलेल्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवल्या जातील. या जागा राखून ठेवल्या जात असताना अनुसूचित जाती-जमती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासलेल्या समाजासाठी नियमाप्रमाणे राखून ठेवण्यात येणाऱ्या टक्केवारीला कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही, अशी दक्षता घेतली जाईल.

### नोकऱ्यांमध्ये ग्रामीण लोकसंख्येसाठी खास तरतूद–

ग्रामीण भागातील तसेच शहरी विभागातील २४०० रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये किमान ३० टक्के जागा राखून ठेवण्यात येतील. या जागा राखून ठेवताना अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागासलेल्या जमाती यांच्यासाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या टक्केवारीला कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही अशी व्यवस्था केली जाईल.

### दलित समाजाचे प्रश्न

पूर्वाश्रमी अनुसूचित जातींमध्ये मोडणाऱ्या लक्षावधी लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हिंदुधर्माचा त्याग करून बौद्धधर्माचा अंगीकार केला आहे. या लोकांनी धर्मांतर केले असले तरी त्यांचे सामाजिक मागासलेपण व आर्थिक दुबळेपण नष्ट झालेले नाही आणि म्हणूनच अनुसूचित जाती म्हणून त्यांना ज्या सवलती व हक्क मिळत होते त्या सर्व सवलती व हक्क त्यांना नवबौद्ध या नात्याने देखील मिळाले पाहिजेत, अशी आमची भूमिका आहे. हे सर्व हक्क त्यांना मिळावेत. यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.

दलित समाजातील या लोकांच्या जमिनी बिगर-दलित समाजाकडे गेल्या असतील त्या त्यांना परत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर तरतूद केली जाईल.

भूमिहीन दलितांना कसण्यासाठी शेतजमिनी देत असतानाच त्यांना जरूर तो भांडवलपुरवठा नाममात्र व्याजाने व त्यांच्याकडील तारणाचा विचार न करता केला जाईल.

दलित समाजातील होतकरू व कर्तबगार तरुणांना उद्योजक म्हणून पुढे येण्यासाठी बीज-भांडवलाची अडचण येते बीज-भांडवल दाखविल्याखेरीज बँका कर्ज मंजूर करीत नाहीत. यासाठी शासनातर्फे हे बीज-भांडवल पुरविण्याची योजना आखली जाईल.

दलित समाजातील तरुणांचे शासकीय, निमशासकीय तसेच शैक्षणिक संस्थामधील नोकऱ्यांचे विशिष्ट प्रमाण भरून निघालेले नाही. हे फार मोठे सामाजिक शल्य असल्याने हा बॅकलॉग त्वरित भरून काढण्यासाठी समयबद्ध कार्यक्रम आखला जाईल. या धोरणाची अमलबजावणी करण्याची जबाबदारी खास अधिकाऱ्यावर टाकली जाईल. जर त्याने त्याबाबत कसूर केल्याचे आढळून आले तर त्यास शासन केले जाईल. ज्या शिक्षणसंस्था या राखीव जागांचे प्रमाण पाळणार नाहीत त्यांचे अनुदान रोखून धरले जाईल. तेवढयाने भागले नाही तर शासकीय मान्यता काढून घेण्यापर्यंतचे सर्व उपाय अवलंबिले जातील.

दलित समाजावर अन्याय करणाऱ्यांना तसेच अस्पृश्यता पाळणाऱ्यांना जरब बसेल अशा दृष्टीने कायदेशीर उपाय केले जातील.

कायदेशीर उपाययोजनेच्या जोडीला गावोगावच्या पुरोगामी विचाराच्या तरुणांचे एक समतादल उभारले जाईल. नवा माणूस घडविण्याच्या उद्देशाने हे दल काम करील. या दलाचे काम प्रभावी व्हावे म्हणून शासन त्याला सर्वतोपरी साहाय्य करील.

आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना नोकरीमध्ये खास सवलत दिली जाईल. तसेच अशा तरुणांना रोजगार धंद्यासाठी खास भांडवलपुरवठा करताना अग्रहक्क दिला जाईल.

### पोलिसपाटलांच्या जागेवर अनुसूचित जाती–जमातींच्या, विमुक्त जाती–जमातीमधील तरुणांची नेमणूक

पोलिसपाटलांच्या जागावर बहुतांशी पूर्वीप्रमाणेच पाटील मंडळीची नियुक्ती होत असते. या जागा सरकारी नोकरीचा एक भाग असल्याने त्या भरताना दलित समाजातील, आदिवासी विभागातील, तसेच विमुक्त जाती, भटक्या जमातीतील तरुणांसाठी जे राखीव जागांचे प्रमाण आहे ते काटेकोरपणे पाळले जाईल. या दृष्टीने येत्या दोन वर्षांत ही पूर्तता केली जाईल.

### सर्व कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर हक्क दिले जातील

### आदिवासी समाजाचे प्रश्न

आदिवासीच्या ज्या जमिनी बिगर आदिवासीकडे गेलेल्या आहेत त्या त्यांना परत मिळण्याच्या दृष्टीने जो कायदा केलेला आहे, त्याचा फायदा त्यांना मिळण्याच्या दृष्टीने त्या कायद्याची मुदत आणखी तीन वर्षांसाठी वाढवून देण्यात येईल.

आदिवासी लोक आज ज्या जमिनी कसत असतील त्या जमिनी त्यांना कायमपणे कसण्यासाठी दिल्या जातील.

जंगलसंपत्ती वाढविण्याच्या कार्यक्रमामध्ये आदिवासी जनतेच्या ज्ञानाचा व मनुष्यबळाचा पुरेपूर उपयोग करून घेतला जाईल. जंगलामध्ये औषधी वनस्पतींची व झाडांची लागवड करण्याच्या कार्यक्रमामध्ये आदिवासी समाजाला भागीदारी देण्यात येईल. आदिवासी लोकांना शासनातर्फे जे प्लॉटस् कसण्यासाठी दिले आहेत ते लागवडीखाली आणणे गोरगरीब आदिवासींना अशक्य असल्याने रोजगार हमी योजनेखाली हे प्लॉटस् लागवडीयोग्य करून देण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल या कामावर रोजगार हमी योजनेखाली जे पैसे खर्च होतील ते आदिवासीकडून वसूल केले जाणार नाहीत.

आदिवासी विभागात रस्ते, पाणी-पुरवठा, दवाखाने, शाळा या आवश्यक सोयी जवळजवळ नगण्य स्वरूपात आहेत. त्या वाढविण्यासाठी समयबद्ध कार्यक्रम आखून पुरा केला जाईल.

आदिवासी समाजाने शिक्षण करण्यासाठी आश्रमशाळा हाच एक खात्रीशीर उपाय होऊ शकतो. या दृष्टीने गेल्या तीस वर्षांत कसलेही भरीव कार्य झालेले नाही. सन १९७२–७३ पासून दरवर्षी चाळीस आश्रमशाळा सुरू करण्याची घोषणा काँग्रेस शासनाने केली होती. ती हवेत विरून गेली आहे. हा कार्यक्रम अग्रहक्काने राबविण्यात येईल. दर पाच हजार लोकसंख्येमागे किमान एक आश्रमशाळा सुरू करण्यात येईल व एकाही आदिवासी मुलाला अगर मुलीला प्रवेश नाकारण्याची पाळी येणार नाही, अशा हिशेबाने मुलांची संख्या वाढविली जाईल.

खाजगी सावकार, व्यापारी व कंत्राटदार हे लोक आदिवासींची आजही फार मोठ्या प्रमाणावर पिळवणूक करतात. त्यांच्या मगरमिठीतून आदिवासींची मुक्तता करण्यासाठी आदिवासींच्या खास सहकारी संस्था उभारल्या जातील. या संस्थांमध्ये इतर लोकांना

सदस्य होता येणार नाही. या संस्था आदिवासींना लागणारा पतपुरवठा करतील व त्यांनी पिकविलेला माल एकाधिकार खरेदी योजनेमध्ये किफायतशीर किंमतीला खरेदी करतील.

.पालेमोड योजनेखाली आदिवासींना सावकारांनी दिलेले सर्व कर्ज रद्द करणारा कायदा केला जाईल.

## वेठबिगारी

प्रच्छन्न स्वरूपात वेठबिगारी अद्यापि अस्तित्वात आहे. तिचे कठोरपणे निर्दालन केले जाईल.

## शेतमजूर

शेतमजुरांसाठी शासनाने निर्धारित केलेले वेतन अतिशय तुटपुंजे व त्यांच्या कुटुंबियांची उपासमार करणारे आहे. बागायती विभागामध्ये हे किमान वेतन किमान सात रुपये व जिरायती विभागामध्ये किमान साडेपाच रुपये असे सुधारित करण्यात येईल व राहणीमानात वाढ झाल्यास त्या प्रमाणात हे वेतन वाढविले जाईल.

## मुलींच्या शिक्षणासाठी वसतिगृहे

आमच्या देशात एकूण शिक्षणप्रसार कमी आहेच; परंतु त्यातल्या त्यात स्त्रियांना शिक्षणाची संधी अतिशय कमी मिळते. ग्रामीण भागातील मुली तर अभावानेच या क्षेत्रात दिसतात. त्यांचे शिक्षण करण्यासाठी मुलींची वसतिगृहे मोठ्या प्रमाणावर स्थापन करण्यात येतील. त्यांच्या इमारतीसाठी व प्रत्यावर्ती खर्चासाठी सढळ हाताने अनुदान देण्यात येईल.

## घरटी एक नोकरी

ज्या कुटुंबातील एकही व्यक्ती कोणत्याही नोकरीमध्ये नाही, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अर्जदारांना नोकऱ्यांमध्ये अग्रहक्काने सामावून घेतले जाईल.

## सहकारी चळवळीची फेररचना

आज सहकारी कायद्याची ज्या पद्धतीने अमलबजावणी केली जाते त्यामध्ये 'सर्वांसाठी एक व एकासाठी सर्व' हे सूत्र अभावानेच आढळून येते. आज ही चळवळ मूठभर ऐपतवाल्यांच्या हातातील एक कळसूत्री बाहुले बनलेली आहे. विषम आर्थिक व सामाजिक शक्ती धारण करणाऱ्या लोकांना एकाच सहकारी चळवळीमध्ये कोंबण्यात आल्यामुळे गोरगरीब लोकांना या चळवळीने वेठीस धरण्याचा प्रकार घडला आहे सहकारी साखर कारखान्यांच्या क्षेत्रात डायरेक्टर बोर्डाच्या ज्या जागा आहेत त्यापैकी ८० टक्के जागा फक्त २ टक्के शेअरहोल्डर्सनी बळकावल्या आहेत. सहकारी चळवळीतील ५ टक्के सभासदांना सुमारे ३३ टक्के कर्जपुरवठा केला जात असल्याचे एका पाहणीत आढळून आले आहे. या मूठभर ऐपतवाल्यांचे या चळवळीवरील रोगट सावट निग्रहाने दूर केल्याखेरीज गोरगरीब शेतकरी, शेतमजुरांना न्याय मिळण्याची सुतराम शक्यता नाही. या क्षेत्रातील दादा लोकांचे वर्चस्व निपटून काढण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वावर निवडणुका घेण्याची व्यवस्था करण्यात येईल व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विभागाच्या सदस्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात कार्यकारी मंडळावर प्रतिनिधित्व मिळेल, अशी कायदेशीर तरतूद करण्यात येईल.

आज या चळवळीमध्ये भ्रष्टाचार, मूठभर ऐपतवाल्यांचे वर्चस्व व राजकीय हस्तक्षेप हे त्रिदोष विकोपाला गेले आहेत. हे दोष नाहीसे करून ही चळवळ दुर्बल घटकाच्या विकासाचे हत्यार बनण्यासाठी विद्यमान सहकारी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात येईल.

## सत्तेचे विकेंद्रीकरण

सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या नावाखाली आज जिल्हा परिषद क्षेत्रात जे काही चालू आहे ते सत्तेचे विकेंद्रीकरण मुळीच नव्हे. मुख्य कार्यकारी अधिकारी हा सर्वेसर्वा झाला आहे. त्याच्यावर स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकनियुक्त प्रतिनिधी कसलाही अंकुश चालवू शकत नाहीत. त्याची नियुक्ती करण्याबाबत अगर त्याच्यावर कार्यवाही करण्याबाबत या लोकनियुक्त सदस्यांना कसलेही अधिकार नाहीत पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात द्रव्यबळ उभारण्याचा अधिकार नाही. असा अधिकार त्यांना दिल्याखेरीज त्या कार्यक्षम बनू शकत नाहीत, असा गेल्या पंधरा वर्षांचा अनुभव आहे. विक्रीकराच्या रूपाने जमा होणाऱ्या रकमेपैकी काही हिस्सा जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना देण्याची व्यवस्था केली जाईल. गेल्या पंधरा वर्षांच्या अनुभवाच्या प्रकाशात या योजनेचे मूल्यमापन करून तिची फेररचना केली जाईल.

## दुष्काळग्रस्त विभागाचे प्रश्न

महाराष्ट्रातील फार मोठा प्रदेश दुष्काळग्रस्त आहे. या प्रदेशामध्ये बंडिंगचा कार्यक्रम बहुतांशी पार पडलेला आहे. या विभागात अनेक ठिकाणी भूपृष्ठाखाली मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध होते, हे त्या विभागाचे वैशिष्ट्य विचारात घेऊन तेथे मोठ्या प्रमाणावर विहिरी खोदण्याचा कार्यक्रम आखला जाईल. या कार्यक्रमाला अग्रहक्काने कर्जपुरवठा केला जाईल. या कर्जावरील व्याजाचा दर चार टक्के राहील.

दुष्काळग्रस्त विभागाला पाटबंधाऱ्याच्या स्वरूपात पाणी पुरविता येणे शक्य असल्यास आर्थिक खर्चाचा अगर बाष्पीभवनाचा बागुलबुवा उभा न करता या विभागाला पाणीपुरवठा केला जाईल. साध्या उताराच्या मार्गाने हे पाणी या विभागाला पोचविता येत नसल्यास विशिष्ट ठिकाणी पंपाने पाणी उपसून, ते कालव्यात सोडून या विभागाची गरज भागविण्यात येईल.

दुष्काळग्रस्त विभागात या पाण्याचा वापर करून फळबागांची लागवड नगदी पीक म्हणून करण्यात येईल वैरणीचे उत्पादन करून दुग्धनिर्मितीचा व मेंढ्यापालनाचा कार्यक्रम शेतकरी व शेतमजुरांना पुरविण्यात येईल.

## राज्यकारभाराच्या खर्चात कपात

राज्यकारभारावरील खर्चात गेल्या तीस वर्षांत एकसारखी वाढ होत आहे अनेक अनुत्पादक बाबींवर सरकारी खजिन्यातील पैसा पाण्यासारखा खर्च केला जात आहे. राज्यशासनाने स्थापन केलेली

महामंडळे तर या बाबतीत कसलेही ताळतंत्र पाळायला तयार नाहीत. मंत्र्यांच्या आणि बड्या अधिकाऱ्यांच्या निवासस्थानावर वारेमाप उधळपट्टी केली जात आहे. ही उधळपट्टी त्वरित थांबविण्यात येईल. मंत्र्यांच्या दौऱ्याचे वेळी अनेक सरकारी मोटारींचा ताफा निष्कारण राबविला जातो. मंत्र्याची सुरक्षितता किंवा राज्यकारभाराची कार्यक्षमता यापेक्षा मंत्र्याच्या मोठेपणाचे आणि बडेजावीचे बाष्कळ प्रदर्शन असे स्वरूप त्याला आले आहे. या संदर्भात अनेक फालतू बाबींना सरळ सरळ फाटा दिला जाईल.

## गोळीबाराची न्यायालयीन चौकशी

शासनाच्या वतीने गोळीबार करण्याची वेळ आली आणि त्यामध्ये मानवी हत्या झाली तर त्या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी केली जाईल. चौकशी मंडळाचा अहवाल शासन स्वीकारील व त्यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांना शासन करील.

## भ्रष्टाचाराला आळा घालणे

राज्यकारभारात भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार घडतात. त्यापैकी काही उघडकीला येतात; परंतु त्याबाबत जरूर ती चौकशी न करता दोषी व्यक्तींना पाठीशी घालण्याची भूमिका कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी स्वीकारली. नाइलाज म्हणून काही अधिकाऱ्यांच्या विरुद्ध विभागीय कार्यवाही सुरू केल्याचा देखावा सुरू केला जातो; परंतु ही चौकशी जाणूनबुजून रेंगाळत ठेवली जाते. अशा रीतीने त्या अधिकाऱ्याला निवृत्त होण्याची संधी मुद्दाम दिली जाते व शेवटी 'तो निवृत्त झाला असल्याने त्याच्यावर कारवाई करता येत नाही,' असे सांगून अशा दुष्कृत्यांवर व भ्रष्टाचारावर पडदा टाकला जातो. प्रशासन सुधारण्यासाठी अशा एकूण एक प्रकरणात दोषी असलेल्यांना शिक्षा केली जाईल. दोषी लोकांना जाणूनबुजून सहीसलामत सुटण्याची व निवृत्त होण्याची संधी दिल्याचे आढळून आल्यास त्या अधिकाऱ्याला अगर मंत्र्याला जबाबदार धरून त्यांना शासन केले जाईल.

## जाति-धर्मनिरपेक्ष प्रशासन

राज्यातील सर्व धर्मांच्या व जाती-उपजातींच्या लोकांना कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता समान वागणूक दिली जाईल. मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी अशा धार्मिक अल्पसंख्याकांना व भाषिक अल्पसंख्याकांना 'हे राज्य आपले आहे,' असा आत्मविश्वास वाटेल असे नि:पक्षपाती प्रशासन दिले जाईल.

## भाषिक अल्पसंख्याकांना मानाची वागणूक

हे राज्य मराठी भाषिकांचे म्हणून प्रस्थापित झाले असल्याने या राज्याचा कारभार मराठी भाषेत चालेल; परंतु इतर भाषा बोलणाऱ्या अल्पसंख्यांकानाही या राज्यात तितकीच समान व न्यायाची वागणूक दिली जाईल. भाषिक अल्पसंख्याकांच्या शाळांना उदार वागणूक मिळेल. त्यांच्या भाषाचा विकास करण्याकडे जरूर ते लक्ष दिले जाईल. उर्दू भाषेच्या विकासासाठी खास प्रयत्न केले जातील.

## आमदारांनी आपली मालमत्ता जाहीर करणे बंधनकारक

आमदारांनी दरवर्षी आपली मालमत्ता जाहीर करण्याचे बंधन घालणारी कायदेशीर तरतूद केली जाईल. त्यांनी सादर केलेली माहिती नागरिकांपैकी कोणालाही पाहण्यासाठी उपलब्ध केली जाईल.

## धरणामुळे व प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन

प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार याचे पुनर्वसन करण्यासाठी येणारा खर्च हा त्या प्रकल्पाचाच एक भाग मानून तो खर्च केला जाईल. धरणाखाली व तलावाखाली जमिनी बुडणाऱ्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन संपूर्णतया लाभक्षेत्रातच केले जावे, यासाठी विद्यमान कायद्यात दुरुस्ती केली जाईल.

उद्योगधंद्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने संपादन करण्यात येतात त्यांच्या मुलाना अॅप्रेंटिस म्हणून प्रशिक्षण देण्याची व त्यांना त्या उद्योगात नोकर म्हणून मुरवून घेण्याची लेखी संमती कारखानदारांकडून घेतल्याखेरीज शेतकऱ्यांना विस्थापित करून त्यांच्या जमिनी संपादन केल्या जाणार नाहीत. □

[ भारतीय शेतकरी कामगार पक्षाने समन्वय समितीच्या विचारार्थ 'मसुदा' म्हणून प्रस्तुत जाहीरनामा सप्टेंबर १९७७ मध्ये सादर केला होता. ]

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा...........



# । मॅक्झिम गॉर्की ।

## । सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

# उद्धवराव पाटील-व्यक्ती आणि विचार : पृष्ठ ६ वरून

घातले, सर्व प्रकारची आंदोलने केली विधानसभेत इतर पक्षाशी सहकार्य करून कामकाज बंद पाडण्याचेही प्रसंग निर्माण केले. आमच्या पक्षाच्या मोर्च्यांवर लाठीमार-गोळीबारही करावे लागले. एवढी उग्र आंदोलने आम्ही उभारली. इस्लामपूर-वैराग येथे गोळीबार झाले. याचा परिणाम असा झाला की, सरकारला दुष्काळी कामे काढावी लागली, रोजगार हमी योजना सुरू करावी लागली.'

दुष्काळाच्या वेळी मागेल त्याला काम दिले पाहिजे, ही भूमिका विधानसभेत शे. का. प. च्या आमदारांनी मांडली व त्याला इतर विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. सरकारची त्याला सुरुवातीला तयारी नव्हती. तेव्हा विरोधी पक्षांनी सतत आठवडा-आठवडा विधानसभेचे कामकाज बद पाडले होते. त्याचा परिणाम असा झाला की, सरकारला विधानसभा कामकाज चालू ठेवण्यासाठी मागेल त्याला काम देण्याची योजना मान्य करावी लागली, हे विधानसभेच्या कामकाजाचा वृत्तांत घेणाऱ्या आम्हा वार्ताहरांना चांगलेच माहिती आहे. विधानसभेतील गोंधळाबाबत वृत्तपत्रातील अग्रलेख मात्र विरोधी पक्षाना दोष देणारे असावयाचे! गोंधळ का झाला, हे विचारात न घेता गोंधळ करणे असंसदीय आहे, असे घोपटपणाने अग्रलेखातून सांगितले जात होते. सध्याचे उद्योगमंत्री व त्या वेळचे विधानसभेचे अध्यक्ष नानासाहेब तथा शे. कृ. वानखेडे यांना यासंबधी मी एकदा विचारले. **त्यावेळी बऱ्याच पत्रकारांसमोर वानखेडे यांनी रोजगार हमी योजना विरोधी पक्षामुळे सुरू झाली, असे म्हटले होते.** रोजगार देण्यासंबंधीची मागणी कशी पुढे आली व ती कशी रेटली गेली याची ओघात आली म्हणून ही माहिती दिली. हे कोठे तरी नमूद करण्याची आवश्यकताही अर्थात होतीच.

'महाराष्ट्रात वर उल्लेखिलेल्या कामाच्या पार्श्वभूमीवर व त्याचप्रमाणे लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने कॉंग्रेसविरोधी वातावरण निर्माण झाले. त्याचा लाभ जनता पक्ष व शेकापला मिळाला आहे आणि पुढेही मिळेल', असे सांगून उद्धवराव म्हणाले, 'खेडोपाडयात ग्रामपंचायतीपासून सोसायटयाच्या पातळीवर किंवा सत्तेच्या जोरावर ग्रामीण जीवनात कॉंग्रेस जुलूम करीत आली आहे. त्याविरुद्ध लोकांना संघटित करून कॉंग्रेसशी मुकाबला करण्याचे काम माझा पक्ष गेली तीस वर्षे करीत आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनमानसात आमच्या पक्षाचे नेतृत्व व कार्यकर्ते यांच्याविषयी आदर दिसून येतो.'

उद्धवरावांनी हे जे सांगितले त्याच वेळी त्यांना अडविण्यासाठी मी म्हणालो, 'जनतेत पक्षाविषयी आदर आहे असे तुम्ही म्हणता; पण शे. का. प.ची ताकदच कोठे आहे असे म्हटले जाते, त्याचे काय?'

'हे खरे नाही. आमची ताकद कशी आहे? महाराष्ट्रात नव्वद टक्के शेती जिरायती आहे. लहान शेतकरी व शेतमजूर यांचे जीवन जिरायती शेतीशी निगडित आहे, हे आमचा पक्ष सांगत आला आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्यासाठी आंदोलने करीत आहे. या वर्गाचे प्रश्न घेऊन चिकाटीने पक्षाने कॉंग्रेसविरोधी काम केले आहे. मोर्चे काढले. यामुळे पक्षाची पकड जनमानसात कायम आहे. पक्षाने सतत कॉंग्रेसविरोधात निवडणुका लढविल्या आहेत. कॉंग्रेसशी आम्ही झुंज घेतो त्यामुळेच यशवंतराव चव्हाण व त्यांचे साथीदार यांनी अनेक प्रकारची आमिषे पक्षाला-त्याच्या नेत्यांना दाखविली; पण पक्ष डळमळित झाला नाही. पक्ष जनतेशी एकनिष्ठ राहिला. याचाही प्रभाव जनतेवर आहे. याचाच दुसरा अर्थ असा आहे की, पक्षाचे धोरण बरोबर आहे जनतेशी एकनिष्ठ राहणारे नेतृत्व आहे, सामान्य जनांच्या नाडीची परीक्षा करण्याची पद्धती, स्वच्छ प्रतिमा या सगळयाच्या परिणामांमुळे जनतेला आकर्षण आहे. आमच्या ताकदीची ही बलस्थाने आहेत.

'तसे पाहाल तर जनता पक्षाचीही काय ताकद आहे? देशात निर्माण झालेली हवा या आधारावर जनता पक्ष ताकदीचे मोजमाप करीत आहे; परंतु ग्रामीण जनतेपर्यंत त्या पक्षाची बांधणी नाही किंवा बैठक नाही. पूर्वी कॉंग्रेसमध्ये जाऊन सत्तेला चिकटलेले काही-काही का, बरेच-जण जनता पक्षात जाऊन सत्तेत पुन्हा भागीदारी करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. म्हणूनच कॉंग्रेसमधून लोक जनता पक्षात जात आहेत. उलट आमच्या पक्षात लोक आले त्याचे काय आहे? नवीन भागीदारी मिळेल म्हणून ते आलेले नाहीत. विदर्भातील लोक आमच्या पक्षात येत आहेत. विदर्भात कापूस खरेदी योजनेसाठी आम्ही आंदोलन केले. जनता व कॉंग्रेस या दोघांचाही कापूस खरेदी योजनेला विरोध होता. आमच्या आंदोलनामुळे विदर्भातील लोक आमच्याकडे आले. ते जनता पक्षात गेले नाहीत. त्या लोकांना 'मंत्री करतो' असे आश्वासन आम्ही दिलेले नाही. थोडक्यात सत्तालोभी प्रवृत्तीने भारावलेली माणसे जनता पक्षात जात आहेत. आमच्याकडे येणारे लोक कार्यक्रमासाठी आलेले आहेत,' असे उद्धवराव म्हणतात.

### सत्तेतील सहभाग

'कोल्हापूरच्या नोव्हेंबर १९७७ मधील अधिवेशनात पक्षाने मंजूर केलेले ठराव जनता पक्षाच्या विचाराशी जुळणारे नाहीत; पण मित्रपक्षाच्या जाहीरनाम्याचा मूलभूत आधार म्हणून शे. का. पक्षाचाच जाहीरनामा मानला गेला आहे. या जाहीरनाम्याची अंमलबजावणी करवून घेण्याकरिता आम्ही सत्तेत सहभागी होण्याचे ठरविले आहे' असे समर्थन उद्धवरावांनी सत्तेतील सहभागाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केले.

'केंद्रात शे. का. प. सत्तेमध्ये सहभागी झालेला नाही आणि राज्यात सत्तेमध्ये सहभागी होण्याची भूमिका विसंगत नाही काय?' असे विचारले तेव्हा उद्धवराव ताडकन म्हणाले, 'मुळीच नाही. तुम्ही जी विसंगती म्हणता ती विसंगती नाही. उलट सुसंगतीच आहे. केंद्रातील जनता सरकार उजवे आहे. महाराष्ट्रात केवळ जनता पक्षाचे सरकार आले तर ते केंद्राप्रमाणे राहील. अनेक योजनांबाबत केंद्राचे राज्य सरकारवर दबाव येतात. कापूस खरेदी योजना व रोजगार

हमी योजना कायदा यांची उदाहरणे देता येतील. केंद्रातील सरकारचा स्थायीभाव उजवा असल्यामुळेच या योजनांना व कायद्याना केंद्र मान्यता देत नाही. केंद्राचे हे धोरण बदलावयाचे असेल किंवा अशा धोरणांचा प्रभाव कमी करावयाचा असेल तर महाराष्ट्रातील मंत्रिमंडळ डावे असले पाहिजे. महाराष्ट्रातील डाव्या मंत्रिमंडळाने केंद्राच्या अशा दबावाविरुद्ध जाऊन योजना राबविल्या तर त्याचे चांगले परिणाम इतर राज्यावरही होतील व त्या राज्यांत अशा योजना हातात घेतल्या जातील. त्याकरिता इतर राज्याचाही आग्रह राहील आणि या अशा आग्रहातून केंद्रालाही हळू हळू डावे वळण घ्यावे लागेल. त्यासाठी महाराष्ट्रात डाव्यांचा प्रभाव सत्तेवर राहण्याची गरज आहे. डाव्यांचे प्रभुत्व महाराष्ट्र मंत्रिमंडळावर असणे आवश्यक आहे.

'समजा, उद्या महाराष्ट्रात जनता पक्षाचेच बहुमत प्राप्त झाले तर महाराष्ट्रातील जनता सरकार केंद्राच्या जनता सरकारच्या हुकुमाची निव्वळ तामिली करील. राज्य सरकारवर केंद्राची ताबेदारी राहील. केंद्राच्या हुकुमाची तामिली करणे हेच जनता सरकारचे काम होऊन बसेल. काँग्रेसच्या राजवटीत हा दोष होताच, तोच जनता सरकारात येण्याची दाट शक्यता आहे. तो टाळावा, सरकारला डाव्या कार्यक्रमावर व त्याच्या अमलबजावणीच्या मार्गावर ठेवावे यासाठी सत्तेत सहभागी झाले पाहिजे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षालाही आमचे हेच सांगणे आहे. सत्तेत सहभागी व्हा व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आग्रह धरा. आमदारांची योग्य संख्या असल्याशिवाय हे घडवून आणता येणार नाही. राज्यात विधानसभेमध्ये योग्य जागा मिळवून डाव्या चेहऱ्या-मोहऱ्याचे सरकार बनवता येईल, ही आमची धारणा आहे. केंद्रातील सत्तेच्या सहभागाबाबत तशी परिस्थिती नाही. एवढ्या मोठ्या लोकसभा सदस्याच्या संख्येत आमच्या खासदारांची संख्या प्रभाव टाकून डावे वळण देण्याएवढी नाही, म्हणून आम्ही केंद्रात सत्तेमध्ये सहभागी झालो नाही.' अशी तात्त्विक सुसंगती उद्धवराव सांगतात.

महाराष्ट्राचा पिंडच डावा आहे. त्याला साजेसे सरकार येणे आवश्यक आहे. हे सांगत असताना उद्धवराव केंद्र व राज्य सरकार यांच्या संघर्षाची आवश्यकता प्रतिपादतात. 'पुरोगामी पावले उचलताना केंद्र व राज्य याचा संघर्ष गेली तीस वर्षे आला आहे आणि तो पुढेही येणार आहे. अशा संघर्षातूनच गरिबांचा कार्यक्रम राबवला जाणार आहे.'

कार्यक्रमावरून आमची चर्चा मध्येच येणाऱ्या फोनच्या व्यत्ययाने थांबते. विषयाची संगती तुटायची. त्यामुळे परत विधानसभा निवडणुकीतील जागेच्या आग्रहाचा विषय येतो. 'आम्ही जेवढ्या जागा मागितल्या तेवढ्या जागा आम्ही लढवत आलो आहे. १९७२ मध्ये आम्ही ८२ जागा लढवल्या त्यांपैकी ६-७ जागाच अशा निघतील की, आमचे उमेदवार तिसऱ्या क्रमांकाच्या मतावर होते. ८२ पैकी या जागा वगळता बाकीच्या जागांवर आम्ही पहिले किंवा दुसरे होतो. ज्या जागा आम्ही हारलो त्यांपैकी कित्येक जागा ३-४ हजार मतांच्या फरकाने आमच्या हातातून गेल्या आहेत. इंदिरालाट होती, त्या लाटेतील ही अवस्था आहे हे विसरू नका,' असे उद्धवराव म्हणतात.

कार्यक्रमाची अंमलबजावणी, त्याकरता आवश्यक संख्या यावर भर देत असताना उद्धवरावांनी ते सत्तेत कुठपर्यंत राहणार, हेही स्पष्ट केले 'जाहीर केलेल्या अंमलबजावणीच्या दिशेने वाटचाल होत नाही, असे दिसताच आम्ही मंत्रिमंडळात राहणार नाही. 'केवळ सत्तेसाठी सत्तेत सहभागी होऊ नका,' असे कार्यकर्तेच आम्हाला सांगत आहेत. त्यांचाही कार्यक्रमाकरता आग्रह आहे.' उद्धवरावांच्या या भूमिकेमुळे एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे स्वत:च्या ताकदीवर स्वत:च्या पक्षाचे सरकार सत्तेवर येऊ शकत नाही म्हणून सत्तेत येऊ शकणाऱ्या काँग्रेसविरोधी पक्षाबरोबर मैत्री करावयाची आणि धोरणाच्या प्रश्नावर पक्षाची बदनामी होऊ नये, म्हणून तो आधार ठेवून बाहेर पडण्याकरता वाट रिकामी ठेवायची! सत्तेत आहोत त्या काळात पक्षाची ताकद वाढवता येईल तेवढी वाढवायची.

जागेच्या बाबतीत शे. का. पक्ष हट्टवादी भूमिका घेत आहे, असे बोलले जात आहे. त्यामुळे या प्रश्नावर उद्धवरावांना खोदून खोदून प्रश्न विचारत होतो; पण त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वेळेपासूनच्या आघाड्यांच्या राजकारणाचा इतिहास सांगितला. आघाड्यात असलेल्या घटकांना समान वागणूक देऊन समानतेच्या आधारावर आघाडी व्हावी हेच जनमानस तेव्हापासून आहे, असे सांगितले.

ते पुढे म्हणाले, 'आघाडीतील प्रत्येक पक्ष विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व करतो. महाराष्ट्राची ही घडणच आहे, म्हणून सर्व पक्षांनी समानतेच्या नात्याने आघाडी करून काँग्रेसचा पराभव करणे ही आवश्यक बाब आहे.'

## द्रमुकशी साम्य नाही

'शेतकरी कामगार पक्षाला द्रमुकची जागा घ्यावयाची आहे, म्हणून जागेसाठी शेकापचा हट्ट चालला आहे, असे म्हटले जाते. त्याचे काय?'– मी.

'आमची व द्रमुकची तुलनाच होऊ शकत नाही. आम्ही नियोजनाचे सिद्धांत मांडतो. द्रमुक ते मांडत नाही. आमचे नियोजनाचे सिद्धांत अखिल भारतीय धोरणाचे सिद्धांत आहेत. ते केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाहीत. औद्योगिक विकेंद्रीकरणाची पक्षाची भूमिका आहे. ही भूमिका केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही. शेतमजूर, शेती व औद्योगिक प्रश्न आम्ही मांडतो. हे सर्व प्रश्न भारतीय आहेत. म्हणून आमच्या पक्षाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित असले तरी धोरण भारताचे प्रश्न सोडवणारे आहे. थोडक्यात आमची नियोजनाविषयीची धोरणे महाराष्ट्रापुरती मर्यादित नाहीत. द्रमुकची अशी व्यापक भूमिका नाही. देशाचे प्रश्न सोडवण्याकरता कोणती धोरणे आवश्यक आहेत, हे आम्ही सांगतो. आमचा पक्ष महाराष्ट्रात सत्तेवर आला तर येथे त्याची अंमलबजावणी करून ते प्रश्न सोडवून दाखवले तर ते देशाला उदाहरण ठरणार आहे. द्रमुकचे तसे नाही. म्हणून आमची व त्या पक्षाची तुलनाच होऊ शकणार नाही!' असे उद्धवराव म्हणतात.

'नाही तरी कोणता विरोधी पक्ष अखिल भारतीय आहे? भारताची घडण अशी आहे की, पक्षाचे नाव अखिल भारतीय असले तरी त्या पक्षाची काही ठिकाणीच पॉकेट्स आहेत. उजवा व डावा कम्युनिस्ट पक्ष याचीसुद्धा काही ठिकाणीच पॉकेट्स आहेत,' असे

सांगून उद्धवराव म्हणाले, 'पन्नास एकरांवर शेती असू नये' असे आम्ही म्हणू लागलो तेव्हा श्रीमंत शेतकऱ्यांनी आम्हाला पाठिंबा दिला नाही. मध्यम व लहान शेतकरी ज्या भागात अधिक त्या भागात आमच्या पक्षाची ताकद आहे. म्हणून आम्ही काही जिल्ह्यात आहोत असे तुम्हाला दिसते. तेथे आमचे प्रभुत्व आहे. बागायती शेती आहे तेथे आमच्या शेतमजूर संघटना आहेत. ज्या भागात बागायती आहे त्या भागात किंवा आदिवासी भागात आदिवासींच्या संघटना बांधणे सोपे जाते. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने विदर्भात मोठी जमीनदारी आहे. तेथे शेतमजूर आमच्या पाठीशी आहेत; पण तेथील शेतमजूर दबलेला आहे. साहजिकच विदर्भात आमची ताकद कमकुवत वाटते.' असेही ते म्हणाले.

दलितांच्या प्रश्नावर शे. का. पक्ष काही बोलत नाही, अशी सार्वत्रिक तक्रार आहे. त्याकडे उद्धवरावांचे लक्ष वेधले व दलितांसाठी पक्षाने चळवळी केल्या नाहीत, असे म्हटले; परंतु उद्धवरावांनी उदाहरणे देऊन ही तक्रार खोटी कशी आहे ते सांगण्यास सुरुवात केली. 'पक्षाचे काम ज्या तालुक्यात आहे त्या तालुक्यात दलितांवर अत्याचार झालेले नाहीत. उस्मानाबाद, परभणी जिल्ह्यात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थात आमचे बहुमत आहे. त्या सहापैकी तीन नगरपरिषदांचे अध्यक्ष दलित आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात असलेल्या ग्रामपंचायतींपैकी चाळीस टक्के ग्रामपंचायतींचे सरपंच दलित आहेत. आम्हाला जातीचा विचार कधी सुचतच नाही. जर आम्हाला दलिताविषयी काही वाटत नसते तर आम्ही अशी पदे दलितांना दिली नसती. जी पदे त्यांना मिळाली आहेत ती सुद्धा कशी मिळाली आहेत? हा दलित आहे, मग त्याला एखादे पद द्या अशा पद्धतीने पदे दिलेली नाहीत. आमच्या मनात जातीचा विचार असता तर पक्षाने असा विचार केला नसता. आम्ही जातीवादी आहोत, आमचा पक्ष श्रीमंत शेतकऱ्यांचा आहे हे आरोप राजकीय हेतूने केले जात आहेत. श्रीमंत शेतकरी व आमचा पक्ष यांच्यात संघर्ष अटळ आहे.'


शे. का. पक्षाच्या धोरणासंबंधी उद्धवरावांनी सविस्तर चर्चा केली. चर्चेच्या वेळी त्यांच्या पक्षावर कडवट टीका करणाऱ्यांबद्दलही उद्धवरावांनी अनुदाराने उल्लेख केला नाही; परंतु धोरणासंबंधीचे आरोप खोडून काढताना आक्रमक पद्धतीने ते बोलत होते.

भावी सरकारच्या तोंडवळ्याविषयी ते कसे असावे, याबाबतची त्यांची मते जाणून घ्यावी, असे वाटत होते. मंत्रिमंडळात आपली वर्णी लागावी यासाठी मुख्यमंत्र्यांभोवती गोंडा घोळण्याची, त्यांच्याशी लांगूल चालन करण्याची, तोंडपुजेपणा करण्याची प्रवृत्ती फार वाढू लागली आहे त्याला आळा घालण्याचा एक उपाय म्हणून मी १९ जानेवारी १९७८ रोजी एका जनता केंद्रात भाषण करताना एक विचार मांडला होता. आमदारांनी मुख्यमंत्री निवडल्यानंतर मंत्रिमंडळ बनविण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांवर सोपविण्याऐवजी आमदार व पक्ष यांनी मंत्रिपदाकरिता काही नावे सुचवावीत. त्या यादीतून नेत्याने मंत्री निवडावेत म्हणजे पक्षाला महत्त्व येईल आणि मंत्रिमंडळात आपलाही सहभाग आहे, ही भावना आमदारात येईल. त्यामुळे मुख्यमंत्र्याभोवती घुटमळणे, त्यांना खूष करण्याचा आटापीटा काही प्रमाणात कमी होईल, असे मी वरील भाषणात सुचविले होते. उद्धवरावांपुढे २० जानेवारी १९७८ रोजी हा विचार ठेवला आणि त्यांचे यासंबंधीचे मत विचारले. त्यांना माझा विचार आवडला.

'मुख्यमंत्र्याने मंत्री निवडण्याऐवजी पक्षाने मंत्र्यांची यादी सुचविण्याची कल्पना चांगली आहे. अजूनही पक्षाचे नियंत्रण मंत्रिमंडळावर असत नाही. पक्षाच्या कार्यकारिणीच्या सल्ल्याने मंत्र्यांची यादी तयार केल्यास सध्याचे दोष टाळता येतील. हे दोष टाळण्याचा हा एक पर्याय होईल. पंतप्रधान व मुख्यमंत्री यांच्याभोवती पिंगा घालून मंत्रिमंडळात वर्णी लावून घेण्याची विकृत मनोवृत्ती तयार झाली आहे. त्याऐवजी पक्षाच्या कार्यकारिणीने दिलेल्या यादीतून मंत्र्यांची निवड करण्याची प्रथा निर्माण करावी', असे उद्धवराव म्हणाले.

मंत्रिमंडळाच्या रचनेविषयी उद्धवरावांची मते वेगळी वाटतील. 'कोणते खाते महत्त्वाचे मानता?' असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी खात्याला गौणत्व दिले. 'मंत्रिमंडळ म्हणजे एक चमू. संघ असे त्याचे स्वरूप असले पाहिजे. मंत्रिमंडळातील माणसे 'इंटिग्रिटी'ची असली पाहिजेत. कार्यक्रमावर श्रद्धा ठेवून त्याची अंमलबजावणी करण्याचा ध्यास असलेली व सामान्य माणसाविषयी सहानुभूती ठेवणारी माणसे मंत्रिमंडळात असली की, कोणते खाते महत्त्वाचे हा प्रश्न राहणार नाही. समाजाचे प्रश्न, समाजाची गरज विचारात घेऊन निःपक्षपाती कारभार करणारे मंत्रिमंडळ असले पाहिजे, हे आमचे मत आहे. त्या दृष्टीने आम्ही विचार करीत असल्याने एखादे विशिष्ट खातेच महत्त्वाचे व बाकीची कमी महत्त्वाची असा विचार आम्ही करीत नाही', असे उद्धवराव म्हणाले.

धोरणापासून मंत्रिमंडळाच्या ठाण्यापर्यंत चर्चा केल्यानंतर आणखी प्रश्न राहिले नव्हते. रात्रही बरीच झाली होती. शेवटची गाडी चुकल्यामुळे कसे जावे, टॅक्सी मिळेल की नाही, असा विचार करीत शेवटी न परवडणाऱ्या त्या वाहनाने कुर्ला गाठले.



कॅप्टन मोहिते

शे. का. प. चिटणीस मंडळाचे एक प्रमुख सदस्य कॅप्टन शंकरराव मोहिते कऱ्हाडच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसशी सामना देत आहेत. विजयाची अर्थातच त्यांना खात्री आहे. आगामी निवडणुकीतील हा एक अटीतटीचा सामना ठरू पाहत आहे. काँग्रेसतर्फे अर्थमंत्री श्री. यशवंतराव मोहिते त्यांचे प्रतिस्पर्धी आहेत.

# पुणे ते कऱ्हाड

सोलापूरच्या शेतकरी मेळाव्याचा विषय निघाला तेव्हा कुठे कॅप्टन मोहिते थोडे-फार मोकळे झाले. आमच्या संभाषणाला अनौपचारिकपणा येऊ लागला. तोवर नुसती प्रश्नोत्तरे चालू होती. तासभर तरी होऊन गेला होता. गाडीत आम्ही दोघेच होतो. पुण्याहून कऱ्हाडला चाललो होतो. शिरवळ–खंडाळा ओलांडले तरी चर्चेला–संभाषणाला रंग चढत नव्हता.

उद्धवराव पाटील यांना मुंबईला मी जो प्रश्न विचारला होता तोच कॅप्टन मोहिते यांनाही विचारला होता. 'तीस वर्षे तुमचा शे. का.पक्ष स्थापन होऊन झाली. या पक्षाची माहिती सर्वसाधारण मराठी माणसाला, राजकीय विचारवंताना, तरुणांना अजिबात कशी नाही? तुम्ही महाराष्ट्राच्या मुख्य राजकीय प्रवाहापासून दूर कसे राहिलात? का राहिलात?'

उद्धवरावांनी उभयपक्षी घोटाळा आहे हे मान्य केले होते. शेतकरी कामगारांच्या पक्षाने मध्यमवर्गापासून तुटून अलग राहणे उद्धवरावांना योग्य वाटले नव्हते; पण कॅप्टन मोहिते यांना या अलग पडण्यात शे. का. पक्षाकडून काही चूक झालेली आहे असे वाटत नव्हते.

प्रथम त्यांनी सांगितले, शे. का. पक्ष काही विशिष्ट भागातच काम करीत आहे, त्यामुळे हे घडले. मी शिवसेनेचे उदाहरण पुढे केले. 'शिवसेना फक्त मुंबईत व थोडीफार पुण्यात राहिली. तरी तिच्याविषयी उलटसुलट बरेच लिहिले-बोलले गेले. ती चर्चाविषय होऊ शकली. तसे तुमच्या पक्षाबाबत का झाले नाही?'

कॅप्टनसाहेबांचे यावर उत्तर – 'शिवसेना शहरी भागातली चळवळ असल्याने तिला अधिक प्रसिद्धी मिळाली,' असे आले.

मी नंतर धुळे जिल्ह्यातील शहादा चळवळीचे उदाहरण दिले. पुण्यामुंबईपासून खूप दूर, एका टोकाला, अगदी उपेक्षित अशा आदिवासी समाजाची ही चळवळ. तिचेही अस्तित्व जाणवले. लोक तिच्यामुळे प्रभावित झाले. 'तेव्हा चळवळ ग्रामीण की शहरी हा फरक निर्णायक महत्त्वाचा कसा मानता येईल?' या माझ्या प्रश्नावर कॅप्टन मोहिते इतकेच म्हणाले : 'शहादा चळवळीत शहरातील आपल्या चांगल्या नोकऱ्याचाकऱ्या सोडून तरुण गेले म्हणून तिला उठाव आला.'

शे. का. पक्ष स्वतःला मार्क्सवादी पक्ष म्हणवतो. त्यामुळे शहाद्यावरून संभाषणाचा ओघ साहजिकच माओ आणि मार्क्सवाद याकडे वळला; पण आमचे दोघांचे त्याबाबत कुठेच नीट जमेना. माओ विचारांचा त्यांच्यावरील पगडा मात्र स्पष्ट जाणवत होता. मोहिते स्वतः चीनला जाऊनही आलेले आहेत. 'तिथली माणसे किती काम करतात हो! कुठल्याही खेड्यात जा. माणसे उद्योगात रमलेली तुम्हाला दिसतील!' मोहिते सहज आठवले ते सांगत होते. 'आपल्याकडे हे सध्या तरी शक्य नाही,' याची हळहळ–खंत त्यांच्या शब्दांतून व्यक्त होत होती.

'कारण?' माझा प्रश्न.

'चीनच्या खेड्यापाड्यातील हे चैतन्य सहकारी शेती, कम्यून्स यांच्यामुळे निर्माण झाले. मीही सहकारी शेतीवर एक प्रबंध लिहिलेला आहे. मी या पद्धतीचा पुरस्कर्ता आहे; पण ती यशस्वी व्हायची तर जमिनीची खाजगी मालकी जायला हवी. इस्रायलचा दौरा करून आल्यावर तर माझी याबाबत खात्रीच पटली. इस्रायलमध्ये सहकारी जीवनपद्धतीचे बरेच प्रकार अस्तित्वात आहेत. किबुत्स हा यापैकी एक; पण तिथे सर्व जमीन ही सरकारी मालकीची आहे.

त्यामुळे या सहकारी जीवनपद्धतीला यश लाभले. आपल्याकडे अशी स्थिती नाही. म्हणून सहकारी शेतीचे प्रयोग अयशस्वी ठरले !'– मोहिते.

मोहित्यांना एक विसंगती जाणवत असावी. ते हळू आवाजात म्हणाले, 'आमचंही जायला हवं असं आम्हाला वाटतं. बंगले, शेतीवाडी !'...

मोहित्यांना, का कुणास ठाऊक, एकदम रत्नागिरीच्या अप्पासाहेब पटवर्धनांची आठवण आली. मोहिते रत्नागिरीला काही काळ कलेक्टर म्हणून होते. त्यावेळी त्यांचा व अप्पासाहेबाचा संबंध आला. 'सब भूमी गोपालकी' असं अप्पासाहेब म्हणत होते ते मोहित्यांना आजही पटत होतं. 'खरी मोठी माणसं ती ! प्रत्येक बाबतीत मूलभूत चिंतन करायची. आम्ही त्यांच्या मानाने खरोखर लहान माणसं !'... एक वेगळेच मोहिते या क्षणी जाणवत होते.

अप्पासाहेबाचे भगीमुक्ति आंदोलन, निर्भंगी संडास योजना, मेलेल्या प्राण्यांची कातडी सोलण्याचा त्यांचा उद्योग, मलमूत्रापासून हिराखत तयार करण्याची त्यांची कल्पना ... मोहिते अगदी रगून गेले होते या सर्वांची थोरवी गाताना. आपल्या ग्रामीण भागाचा कायापालट या सर्व योजना–कल्पना अंमलात आणल्या गेल्या तर होऊ शकतो यावर त्यांनी भर दिला. चीन–जपानची उदाहरणे दिली. 'नवीन खते वगैरे हवीत; पण या मानवी व नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर केल्याशिवाय शेतकरी कधीही स्वावलंबी होऊ शकणार नाही !' हेही त्यांनी आग्रहाने सांगितले.

मोहित्यामधला शेतकरी फार लहानपणापासून जागा झाला होता. त्यांच्या घरची शेतीवाडी वगैरे जरी भरपूर असली तरी त्यांचे शिक्षण कऱ्हाडला मामाकडे झाले. 'सुटीत घरी जावे तेव्हा चगळ. दुधातुपाची रेलचेल आणि कऱ्हाडला मामाच्या घरी दैना का ?' हा त्यांना नेहमी प्रश्न पडे. एकदा लहान असतानाच मोहिते काही मित्रांबरोबर शिकारीला गेले होते. शिकार पळाली. गावापासून पोरे बरीच लांब भरकटत गेली. खूप दमल्याभागल्यावर शेवटी त्यांना एक वस्ती आढळली. तेथे त्यांना दूध मिळाले. प्यायला पाणी मात्र मिळाले नाही. दूध पिताना पोरांच्या लक्षात आले की, पाणी दुधातच मिसळलेले आहे. घरातील मुलगी दुधासाठी ओरडत होती. तिला आईने थोडे दूध देऊन गप्प केले. मुलांनी मग चौकशी केली. घरचा मालक कुठनं तरी उसनवार पैसे काढून कोर्टाच्या कामासाठी तालुक्याच्या गावी गेलेला होता. दूध त्यामुळे विकले गेले नव्हते. बाई सगळं दूध विकून पैसे करायच्या मागे होती. आपल्या मुलीलाही घरचे दूध न देऊ शकणारी आई बघून लहान मोहिते कुठे तरी अस्वस्थ झाला. कोर्टकचेऱ्यांपायी गोरगरीब कसा नाडला जातो आहे याचीही या लहान वयातच त्याला विदारक जाणीव झाली. मोहिते यांच्या पुढील सर्व विचारात व प्रत्यक्ष व्यवहारात शेतकरी हा मध्यबिंदू ठरला. त्याला ही लहानपणीच झालेली जाणीव फार कारणीभूत ठरली असावी, असे त्यांच्या बोलण्यावरून मला वाटले.

सोलापूरला पुढे कलेक्टर म्हणून असताना मोहित्यांनी शेतकऱ्याला या कोर्टबाजीतून वाचवण्याचा खूप प्रयत्न केला. 'कुदळ–खोरे लवाद' कलेक्टर असेच नाव त्यांना पडले होते. गावातली भांडणे गावात मिटवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. भांडणाऱ्या दोन्ही गटांना मान्य होईल असा लवाद ते भांडणाऱ्यांकडून ठरवून घेत. 'अशी सर्वमान्य होईल अशी एकही व्यक्ती गावात नसेल तर गाव जगायच्याच लायकीचे नाही,' असे ते गावकऱ्यांना सुनवीत. याचा परिणाम होऊन लवाद निवडला जाई व त्याचा तोडगा स्वीकारला जाई. इतकी प्रकरणे अशा मार्गाने मोहिते यांनी त्याकाळी मिटवली की सरकारला काम नाही म्हणून २१३ मॅजिस्ट्रेट कोर्टे गुंडाळावी लागली. वकीलवर्ग अस्वस्थ झाला. भांडणे मिटवणे आणि गावाला एकत्र करून सर्वांच्या श्रमशक्तीतून गावात एखादी शाळा, एखादे समाजमंदिर, एखादा रस्ता तयार करणे यामुळे मोहिते कलेक्टर हे त्या काळी गावकऱ्यांचे एक श्रद्धास्थान होऊन बसले होते. त्यापूर्वी कोणत्याही कलेक्टरने हातात कुदळ–खोरे घेतले नव्हते. स्वतः गावकऱ्यांबरोबर तो राबलेला नव्हता. एक चळवळच यातून सोलापुरात निर्माण झाली. खेड्यापाड्यामध्ये कामाची स्पर्धा लागली आजही जा. अनेक गावांतून या मोहिते–स्कीममधून उभ्या राहिलेल्या शाळा दिसतील, समाजमंदिरे आढळतील. लोकांनीच या चळवळीला 'मोहिते स्कीम' असे नाव दिले. सरकारचा वाटा यात फार थोडा. पडून राहिलेली गावची श्रमशक्ती नीट एकत्र केली की काय चमत्कार घडू शकतो, याचे ही चळवळ म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. मोहित्यांसारखा योजक मात्र हवा. हातात सत्ता असणारा आणि शेतकऱ्यांमध्ये मिसळू शकणारा. त्यांना आपलासा वाटणारा. त्यांचा विश्वास संपादन करणारा. मोहित्यांच्या आयुष्यातील हा एक सुवर्ण कालखंड होता. ताया झिन्किन या मँन्चेस्टर गार्डियनच्या प्रतिनिधी लेखिकेने 'Leaders of New India' या आपल्या पुस्तकात मोहिते यांच्या या कर्तृत्वावर संपूर्ण एक प्रकरण लिहिलेले आहे. आजही त्या काळच्या आठवणीत ते रंगून जातात.

पुढे ॲग्रिकल्चरल कमिशनर म्हणून नेमणूक झाल्यावर कलेक्टर झुबेरी यांच्या साहाय्याने त्यांनी नगर जिल्ह्यातील पाथर्डी–पारनेर या दुष्काळी भागात बंडिंगच्या कामाची अशीच एक लाट उसळवून दिली होती. सरकारी अधिकारी असूनही गावचे मन ते जिंकू शकत होते. गावची मनगटे एकत्र करून विकासकार्याचे डोंगर ते उभे करीत. मध्यंतरी त्यांचा डेन्मार्क वगैरे परदेशात दौरा झाला. तेथे त्यांना Farmers' Associations चे काम पाहण्याची संधी मिळाली. या शेतकरी संघटनाच्या कामामुळे ते फारच प्रभावित झाले व आपल्याकडे ही चळवळ रुजवण्याच्या त्यांच्या प्रयत्नातूनच पुढे १९६०-६१ साली सोलापूरला तो सुप्रसिद्ध शेतकरी मेळावा भरवण्यात आला. पं. नेहरू या मेळाव्याला उपस्थित राहिले होते. सबंध सोलापूर शहर त्या १२दिवसात मेळाव्याने नुसते फुलून गेलेले होते. दीड–दोन लाख शेतकरी. निळे सदरे घातलेले. हा त्यांचा गणवेष होता. जणू उसळणारा एक समुद्रच. मीही हा समुद्र त्यावेळी डोळे भरून पाहिलेला होता.

पुन्हा त्या आठवणी निघाल्या. त्या दृश्यामुळे प्रभावित झालेले पं. नेहरू आठवले. संयुक्त महाराष्ट्र झालेला असल्याने मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणही होते. दोघांची अप्रतिम भाषणे. महाराष्ट्र, सारा देश असा फुलवण्याचे आवाहन...

आम्ही दोघेही खूप रंगत गेलो.

गाडी कऱ्हाडला–मुक्कामाला केव्हा पोचली ते कळलेसुद्धा नाही.

–श्री. ग. मा.

# तर मग उत्तर–दक्षिण वाद निर्माण होतील....

एक जाणकार राजकीय कार्यकर्ते, उर्दू पत्रकार श्री. मोईनुद्दीन हॅरीस यांनी आगामी निवडणुकांविषयी व्यक्त केलेले काही विचार.

◘ मागच्या व आताच्या निवडणुकीतला फरक म्हणजे भारतीय मतदार प्रगल्भ झाला आहे. स्वतःच्या मताची किंमत जाणून बरेवाईट तो ठरवू शकतो. कदाचित तो चुका करतोही; पण योग्य वेळ येताच त्या चुका सुधारतो. त्याच्या या जागृतीला चालना मिळायला हवी.

◘ पैसा फारसे काम करू शकत नाही, हे लोकसभा-निवडणुकांनी सिद्ध केले, तरीही लाखो रुपये खर्च होतात. हे थांबायला हवे. प्रत्येक निवडणूक ही एक लाटच असते. कधी या निवडणुकीवर नैसर्गिक आपत्ती, वातावरणही परिणाम करते; पण लोकांना आणीबाणीबद्दल चीड होती. योग्य वेळेवर ही सुप्त चीड उफाळून आली.

◘ तिकिट-वाटपाच्या गोंधळामुळे उत्तरेत जनता पक्षाची काही मते कमी झाली. वेळ फार कमी असल्याने तेथे गोंधळ झाला ! महाराष्ट्रात अनेक दिवस हे काम चालू आहे. त्यामुळे योग्य उमेदवारांना तिकिटे दिली गेली पाहिजेत.

◘ गेली अडीच तपे कॉंग्रेसने जे अत्याचार केले, हुकुमत गाजवली, त्या पार्श्वभूमीवर जनता पक्षाने आज केलेली लोकशाहीची पुनर्स्थापना ग्रामीण लोकांनाही महत्त्वाची वाटते. भाकरी व स्वातंत्र्य सारखेच महत्त्वाचे असल्याचे त्यांना पटले आहे. ती त्याची अपेक्षा पूर्ण झाली. येत्या अर्थसंकल्पात जनता सरकार काही समाजवादी पावले टाकील, असा विश्वास वाटतो. हजाराच्या नोटा रद्द करणे ही त्याला मिळालेली दिशा आहे. जनता पक्षामुळे गांधीवादाच्या नावाने का होईना, खरा आवश्यक, basic विचार सुरू झालाय.

◘ केवळ निवडणुकीसाठी कोणाशीही युती करणे तत्त्वतः योग्य नाही; परंतु आज कॉंग्रेस पक्ष पदच्युत होणं राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे आहे. उत्तर हिंदुस्थानात जनता पक्ष सत्तेवर आला आहे. दक्षिणेत मात्र लोकसभेसाठी तो मागे पडला. जर येथेही जनता पक्ष सत्तेवर आला नाही तर त्याला अखिल भारतीय पक्ष म्हणून स्वरूप येणार नाही. मग उत्तर–दक्षिण वाद निर्माण होईल. आजच्या परिस्थितीत सत्तेवर येण्यासाठी 'जनता 'ने केलेल्या तडजोडी क्षम्य आहेत.

◘ अब्दुल्ला बुखारी (शाही इमाम) वगैरे धर्मगुरूंच्या प्रचारामुळे फारसा फरक पडणार नाही.

◘ ६७ सालानंतर पुन्हा आज ७७ मध्ये मुस्लिम मतदार कॉंग्रेसेतर पक्षाकडे वळतो आहे आज जनता पक्षाला मुस्लिमांची सहानुभूती आहे.

◘ अंधश्रद्धा केवळ मुसलमानामध्येच नाहीत. हा आपल्या समाजाचाच Basic Defect आहे. लोकसभेच्या वेळी मुस्लिमांनी हिंदूप्रमाणेच मतदान केले. धर्म त्यामध्ये आड आला नाही.

◘ खरा मागासलेला आहे दलित व आदिवासी, मुस्लिम नव्हे.

◘ बंडखोरांचा तत्त्वांचा उद्घोष फक्त निवडणुकीपुरताच असतो. बंडाळीचा फारसा फायदा होणार नाही.

◘ मुस्लिम नेत्यांनी आजवर फक्त संघर्ष केला. आजचा मुस्लिम तरुण रचनात्मक कामाकडे वळतो आहे.

◘ सरकारी सप निवडणुकीवर फारसा परिणाम करू शकणार नाही.

◘ शिवसेनेला लोकसभेच्या वेळी कॉंग्रेसकडून पैसा मिळाला. चांगल्या शिवसेना नेत्यांनी राजकीय पक्षात जावे.

◘ दलित पँथरने केवळ दलितांपुरते मर्यादित न राहता विशाल दृष्टिकोन स्वीकारावा.

प्रेषक :

**निखिल वागळे**

मुंबई

स. न. वि. वि.

' माणूस ' चा दिवाळी अंक थोडा उशीरा वाचला. खूपच आवडला. या अंकातील विनय हर्डीकर यांचा ' आम्ही आणि वदमाप काळ ' हा लेख अत्यंत सडेतोड व नेटका वाटला.

या लेखावरील प्रभाकर पाध्ये व श्री. ना. पेंडसे यांच्या प्रतिक्रियाही वाचल्या. श्री. ना. पेंडसे यांची प्रतिक्रिया हर्डीकरांएवढीच सडेतोड व प्रामाणिक वाटली.

११ जानेवारी १९७८

**प्रा. झुंबरलाल कांबळे**
( डॉ. आंबेडकर कॉलेज, महाड )

वरील स्वरूपाचे अभिप्राय अनेकांनी आजवर लेखी व तोंडी स्वरूपात कळविले. काही अभिप्राय ' माणूस ' अंकात प्रसिद्धही झाले.

मराठीत आजवर प्रसिद्ध झालेल्या आणीबाणीसंबंधीच्या लिखाणात बहुतेकांच्या मते सर्वोत्कृष्ट ठरलेला हा ' वदमाप काळाचा शोध ' संपूर्णपणे पुस्तकरूपात आता लवकरच प्रकाशित होत आहे.

# जनांचा प्रवाहो चालिला

## लेखक : विनय हर्डीकर

**' राजहंस प्रकाशन ' चे आणखी एक वैशिष्टयपूर्ण प्रकाशन**